


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, शुक्रवार २७ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# संकट: आज सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली असून, संध्याकाळी ६.३० च्या सुमारास व्हिडिओ कॉन्फ्रन्सिंगच्या माध्यमातून होणा-या या बैठकीमध्ये पंतप्रधान मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणात आहेत. पश्चिम आशियामध्ये अमेरिका आणि इस्त्राइलने इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धाला आता एक महिना होत आला आहे. हा महिनाभर चाललेल्या संघर्षामुळे भारतासह अनेक देशांसमोर इंधन टंचाईचं मोठं संकट आ वासून उभं राहिलं आहे. त्यातच गॅस आणि पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरत असल्याने गॅस एजन्सी आणि पेट्रोल पंपांसमोर रांगा लागत आहेत. सरकाकडून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे आणि घाबरून न जाण्याचं आवाहन केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली असून, संध्याकाळी ६.३० च्या सुमारास व्हिडिओ कॉन्फ्रन्सिंगच्या माध्यमातून होणा-या या बैठकीमध्ये पंतप्रधान मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणात आहेत.

या बैठकीमध्ये या संकटाच्या काळात राज्यांनी केलेली तयारी आणि योजनांचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीचा हेतू देशभावनेंतर्गत सर्व प्रयत्नांमध्ये परस्पर ताळमेळ सुनिश्चित करणे हा आहे. मात्र आचार संहिता लागू झालेली असल्याने निवडणुका असलेल्या राज्यांमधील मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत सहभागी करून घेतलं जाणार नाही. या राज्यांच्या मुख्य सचिवांसोबत कॅबिनेट सचिवालयाच्या माध्यमातून स्वतंत्र बैठकीचं आयोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, आखातातील संघर्षामुळे देशात निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये माहिती दिली होती. तेल आणि गॅसचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी मेड इन इंडिया जहाजे आणि साठवणीचा रोडमॅप अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला होता. तसेच साठेबाजांवर कारवाई करण्याचे आवाहन मोदींनी राज्य सरकारांना केलं होतं.

### छिंदवाड्यात मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाहून परतणा-या बसची ट्रकला धडक

# भीषण अपघातात 10 ठार




**छिंदवाडा/प्रतिनिधी :** मध्य प्रदेशमध्ये मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमातून परत येताना ४१ जणांच्या बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये १० जणांचा मृत्यू झालाय. तर २० गंभीर जखमी आहेत. मध्य प्रदेशमधील छिंदवाडातील सेमरिया हनुमान मंदिरासमोर गुरु वारी संध्याकाळी दुर्दैवी अपघात झाला. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या 'लाभार्थी परिषदे'तून परत येत असताना बसने एका ट्रकला जोरदार धडक दिली. अपाघातामध्ये २० जण गंभीर जखमी झाले असून त्यांना जवळच्या रू ग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींची प्रकृती पाहाता मृताची संख्या वाढू शकते. मिळालेल्या माहितीनुसार, गुरु वारी संध्याकाळी सात वाजण्याच्या आसपास उमरानालात हा अपघात घडला. समोरासमोर ही धडक इतकी भीषण आणि भंयकर होती की बसवरील नियंत्रण सुटले आणि ती उलटली. भंडारकुंड, कारेर येथून ही बस निघाली होती. अपघातानंतर बसच्या आतमध्ये अनेक प्रवासी अडकले होते. प्रत्यक्षदर्शींच्या मते, अपघात इतका भीषण होता की एका प्रवाशाचा हात तुटला, तर इतर अनेक जण डोक्याला गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये सहा पुरु ष, (पान २ वर)

# राज्यात 15 दिवसांचा मद्य साठा

**नागपूर/प्रतिनिधी :** इराण आणि अमेरिकेमध्ये अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम विविध उद्योगांवर होत आहे. सुरु वातीला



सिलिंडरचा साठा मर्यादित झाल्याने अनेक खानावली आणि हॉटेल व्यवसायिक अडचणीत आले. त्यानंतर पेट्रोलचा साठाही कमी झाल्याच्या बातम्या आल्याने रोज पेट्रोल पंपावर रांगा दिसतात. त्यानंतर आता मद्य उद्योगावर संकट निर्माण झाले आहे. काचेच्या बॉटल्स येणे बंद झाल्याने मद्य निर्मिती करण्यात अडचणी येत आहेत. आता पंधराच दिवसांचा साठा शिल्लक असल्याची माहिती आहे. त्यामुळे तळीरामांवर संकट ओढवण्याची शक्यता आहे.

**भीती का निर्माण झाली-**बिअर, सलाईन तसेच विविध क्षेत्रात वापरल्या जाणा-या काचेच्या बाटल्या तयार करणा-या 'कॅनपॅक' कंपनीस ' एलपीजी ' गॅस न मिळाल्यास सुरक्षेचे प्रश्न निर्माण होतील. या कंपनीमध्ये काच गरम करण्यासाठी लागणारी उष्णता बंद करण्याची प्रक्रिया बटन दाबल्यासारखी केली जाउ शकत नाही तसे केल्यास सुमारे ६०० कोटीचे नुकसान होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. राज्यात अनेक जिल्ह्यात मद्य निर्मितीचे कारखाने असून मद्य व बिअरच्या बाटल्या भरण्यास अडचणी निर्माण होतील अशी भीती व्यक्तकरण्यात येत आहे. परिणामी राज्याच्या महसूलातही मोठी घट होउ शकते.

**असे आहे संकट-**काचेच्या बाटल्या तयार करण्यासाठी तापमान १७०० अंशापर्यंत वाढवत न्यावे लागते. त्यामुळे तापमान कमी करण्याचा कालावधी एक महिना लागतो. पुढे तेवढी तापमान वाढ करण्याचा कालावधी (पान २ वर)

# एलपीजी घेउन 'सी बर्ड' येतेय!

## आठ वर्षानंतर पहिल्यांदाच भारताने इराणकडून खरेदी केला गॅस

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा विपरित परिणाम भारताला होणा-या इंधन पुरवठ्यावर झाला आहे. एकीकडे स्वयंपाकाच्या गॅससाठी वितरण एजन्सींसमोर रांगा लागल्या आहेत, तर दुसरीकडे पेट्रोल, डिझेलसाठी पेट्रोल पंपांसमोरही रांगा लागल्या आहेत. या इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून सुमारे आठ वर्षांनंतर भारताने इराणकडून एलपीजी खरेदी केला आहे. भारताचे सी बर्ड गॅस टँकर जहाज लवकरच भारतीय किना-यावर पोहचणार असल्याची माहिती मिळाली आहे.



सरकारी तेल कंपनी असलेल्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने हा गॅस खरेदी केला असून, त्यात इंडियन ऑईलसोबत भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियमचीही भागीदारी आहे. भारताने याआधी जून २०१८ मध्ये इराणकडून शेवटचा एलपीजी खरेदी केला होता. त्यानंतर भारताने इराणकडून खरेदी बंद केली होती. त्यानंतर अमेरिकेने लावलेल्या कठोर निर्बंधांमुळे भारताचा इराणसोबत असलेला व्यापार पूर्णपणे बंद झाला होता. मात्र आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. सध्या सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून जाणा-या मार्गाची इराणने नाकेबंदी केली आहे. त्यामुळे जगभरातील तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाला (पान २ वर)

# रेशनकार्डधारकांना मिळणार 3 लिटर केरोसीन;सरकारचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रतिनिधी आखाती देशांमध्ये सुरू असणा-या युद्धाचा जगावर परिणाम होत आहे. यामुळे इंधनाचा आणि एलपीजी गॅसचा काही प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारने एक महत्त्वाचे पाउल उचलले आहे. सध्या एलपीजी गॅसच्या किमती वाढल्या आहेत, तसेच एलपीजी गॅस बुकिंगचा कालावधी वाढला आहे त्यामुळे नागरिकांना खूप वाट पाहावी लागते. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठे पाउल उचलले आहे. केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे.राज्यातील नागरिकांना केरोसीन वापरण्यास परवानगी मिळाली आहे. आता रेशन कार्डधारकांना केरोसीन मिळणार आहे. केरोसीनचा वापर करून स्टोव्हवर जेवण बनवू शकता, या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. एलपीजी गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरत्या स्वरू पात केरोसीन वाटप केले जाणार आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय केरोसीन वितरण निश्चित करण्यात आले आहे.मार्च-एप्रिल २०२६ मध्ये केरोसीन वाटप राज्यात तिन्ही तेल कंपन्यांकडून केले जाणार आहे. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि (पान २ वर)



# ज्येष्ठ इतिहास संशोधक, लेखक डॉ. जयसिंगराव पवार कालवश

**कोल्हापूर / प्रतिनिधी-**महाराष्ट्रातील ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज निधन झाले. आज पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. ते ८५ वर्षांचे होते. आज सकाळी ९.१५ वाजता कोल्हापूरातील साने गुरु जी वसाहत येथील त्यांच्या निवासस्थानाहून अंत्ययात्रा निघेल अशी माहिती आहे.ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, विचारवंत आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून बरी नव्हती. त्यांच्यावर कोल्हापूरातील आधार हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. अखेर आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने मराठेशाहीचा इतिहासकार हरपला अशी भावना व्यक्त होत आहेत.इतिहास घडवणा-यांच्या पुढच्या पिढ्यांनी इतिहास लिहिला नाही असे म्हणतात.



डॉ.जयसिंगराव पवार या व्यक्तिमत्वाने कोल्हापूरच्या मातीत राहून आपल्या लेखणीतून याला छेद देउन अनेक संदर्भासह माहिती पुढे आणली. इतिहास उलगडणार एक विद्यापीठ कायमचे हरपले, अशा भावना व्यक्तहोत आहेत.

डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे झाला. डॉ. जयसिंगराव पवार यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम.ए. आणि पीएच.डी. पदवी संपादन केली. तीन दशकांहून अधिक (पान २ वर)

# सार्वजनिक कार्यक्रमामध्ये वंदे मातरमची सक्ती नाही

## गृह मंत्रालयाच्या परिपत्रकाविरुध्दची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सुप्रीम कोर्टाने बुधवारी राष्ट्रीय गीत वंदे मातरम गाण्याबाबत गृह मंत्रालयाच्या परिपत्रकाविरु द्ध दाखल केलेली याचिका फेटाळली. न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जारी केलेले हे निर्देश बंधनकारक नाहीत. परिपत्रकाला आव्हान देणारी याचिका वेळेपूर्वीच दाखल करण्यात आली आहे.

या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जायमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. खंडपीठाने म्हटले की, गृह मंत्रालयाच्या सल्ल्यामध्ये वंदे मातरम न गायल्यास कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. हे दिशानिर्देश केवळ एक प्रोटोकॉल आहेत आणि त्यांचे पालन करणे बंधनकारक नाही. जेव्हा याचिकाकर्त्याविरु द्ध दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा त्याला गाणे बंधनकारक केले जाईल, तेव्हा आम्ही या सर्व गोष्टींवर लक्ष देउ, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सल्ला



देण्याच्या बहाण्याने वंदे मातरम गाण्यास भाग पाडले जाईल, असे याचिकेत म्हटले होते. या प्रकरणी मोहम्मद सईद नूरी यांनी ही याचिका दाखल केली होती. यासंदर्भात न्यायालयाने म्हटले की, आम्हाला ती नोटीस दाखवा, ज्यात तुम्हाला राष्ट्रीय गीत वाजवण्यासाठी भाग पाडले गेले आहे. तुम्ही एक शाळा चालवता, ती मान्यताप्राप्त आहे की नाही, हे देखील आम्हाला माहीत नाही. याचिकाकर्त्याच्या वतीने जो व्यक्ती वंदे मातरम गाण्यास किंवा राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहण्यास नकार देतो, त्याच्यावर नेहमीच खूप मोठा भार असतो. सल्ला देण्याच्या बहाण्याने लोकांना सोबत गाण्यास भाग पाडले जाउ शकते, असे म्हटले.

**नोटीस आल्यास न्यायालयात या-** यावर न्यायमूर्ती बागची यांनी हा केवळ एक दृष्टिकोन आहे आणि लोक याच्याशी असहमत असू शकतात. जर तुमच्या विरोधात कोणती कारवाई झाली, नोटीस आली, तर तुम्ही पुन्हा न्यायालयात येउ शकता. सध्या ही याचिका भेदभावाच्या एका अस्पष्ट भीतीशिवाय दुसरे काहीही नाही, असे न्यायालयाने म्हटले.

# ठाकरे गटाच्या बैठकीत राडा; प्रियंका चतुर्वेदी भडकल्या

**मुंबई/प्रतिनिधी-** शिवसेनेत (ठाकरे) राज्यसभेच्या जागेवरून धुसफूस असल्याचे समोर येत आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सात जागांसाठी बिनविरोध निवडणूक झाली. या निवडणुकीत शिवसेनेच्या वाट्याला येणारी जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला सोडण्यात आली.



महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून पवारांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली, तर भाजपचे चार आणि शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) यांचा प्रत्येकी एक उमेदवार यांची बिनविरोध निवड झाली. शिवसेनेच्या (ठाकरे) मावळत्या राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी बैठकीत आक्रमक झाल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेना नेते संजय राउत यांनी हे वृत्त फेटाळले आहे, मी त्या बैठकीला नव्हतो, मात्र तिथे असे काही घडलेले नाही असे ते म्हणाले.

शिवसेनेची (ठाकरे) बैठक मुंबईत झाली. या बैठकीची सुरु वात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. ते म्हणाले की, माझा तुमच्यावर विश्वास आहे. मला भाजप, एनसीपीचे लोक सांगतात, तुमचे खासदार फुटणार आहेत. पण माझा तुमच्यावर विश्वास आहे, ही सर्व लढाई मी तुमच्या भरवशावर लढत आहे, असे निवेदन उद्धव ठाकरे यांनी केले.

**राज्यसभेवरून प्रियंका चतुर्वेदी भडकल्या-** उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रातील राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, के. सी. वेणुगोपाल आणि महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चन्नीथला यांनी फोन केला होता. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार विरोधी पक्षनेतेपदाच्या संख्येसाठी ही जागा काँग्रेसला द्या. काँग्रेसच्या या मागणीवर उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसला तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेसशी (शरद पवार) (पान २ वर)

# मुंबई, दिल्ली, अमृतसरकडे जाणा-या गाड्या रद्द

**नागपूर/प्रतिनिधी :** उन्हाळ्यात शाळा, महाविद्यालयांना सुटी सुरू झालेल्या आणि लग्न स-हाईत सुरू असलेल्या काळात रेल्वे प्रवाशांसाठी मोठा फटका येणार आहे. गोंदिया स्थानकावरील लाईन क्र. ५ (प्लॅटफॉर्म क्र. ३) वर वाशेबल एप्रन काढून बॅलेस्टेड ट्रॅकमध्ये रूपांतर करण्यासाठी ५ एप्रिल २०२६ पासून ट्रॅफिक ब्लॉक लागू होणार आहे. या कामामुळे मुंबई (एलटीटी), हजरत निझामुद्दीन, अमृतसरकडे जाणा-या गाड्यांना फटका बसणार आहे. त्यामुळे प्रवाशांना त्रासाला सामोर जावे लागणार आहे.

**या गाड्या रद्द-**मध्य रेल्वेकडून सूचित करण्यात आले आहे की ट्रॅफिक ब्लाक कालावधीत अनेक प्रमुख गाड्या रद्द राहणार आहेत. यामध्ये १८०३० शालीमार - लोकमान्य टिळक टर्मिनस



एक्सप्रेस (४ एप्रिल ते २४ एप्रिल) आणि १८०२९ लोकमान्य टिळक टर्मिनस - शालीमार एक्सप्रेस (६ एप्रिल ते २६ एप्रिल) यांचा समावेश आहे. याशिवाय १८२३७ कोरबा - अमृतसर एक्सप्रेस (५ एप्रिल ते २५ एप्रिल), १८२३८ अमृतसर- बिलासपूर एक्सप्रेस (७ एप्रिल ते २७ एप्रिल) देखील प्रभावित आहेत. हजरत निजामुद्दीन -रायगड एक्सप्रेस, रायगड- हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस, तसेच लोकमान्य टिळक टर्मिनस -शालीमार व शालीमार -लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस रद्द राहतील. विशाखापट्टणम -हजरत निजामुद्दीन व त्याचा परतप्रवास करणा-या गाड्या ५ एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान रद्द राहतील. या बदलामुळे प्रवाशांनी तिकीट बुकिंग किंवा प्रवासाची योजना आधी तपासावी.

**स्थानिक गाड्यांवर परिणाम-** स्थानिक मेमू गाड्यांनाही ब्लाकमुळे परिणाम होईल. बल्लारशाह -गोंदिया मेमू पॅसेंजर ५ एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान रद्द (पान २ वर)

# नियमावलीत अडकले पेट्रोल; दुपारी 3 नंतर ऑर्डर बंद!

**नागपूर :** पेट्रोलियम कंपन्यांनी अग्रीम रक्कम भरल्याशिवाय इंधन न देण्याच्या धोरणानंतर आता दुपारी ३ नंतर इंधनाच्या ऑर्डर स्वीकारणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या दुहेरी अटींमुळे शहरात पेट्रोल-डिझेलची कोंडी अधिकच तीव्र झाली असून अनेक ठिकाणी इंधनटंचाई आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसू लागल्या आहेत. या प्रकरणाबाबत आपण सविस्तर जाणून घेउ या.पंपचालकांच्या संघटनेनुसार, बँक व्यवहारातील विलंब ही कोंडी वाढण्यामागील प्रमुख अडचण ठरत आहे. पंपावरील रात्री व सकाळच्या विक्रीतून जमा झालेली रक्कम सकाळी बँकेत भरल्यानंतर ती खात्यात दिसणे आणि त्यानंतर आरटीजीएसद्वारे कंपन्यांकडे वळती करणे या प्रक्रियेला तीन ते चार तास लागतात. परिणामी, अनेकदा दुपारी ३ वाजेपर्यंत ऑर्डर नोंदवणे शक्य होत नाही.दरम्यान, आखाती देशांतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्याचे आव्हान केंद्र सरकारसमोर आहे. अशा परिस्थितीत पेट्रोलियम (पान २ वर)



# SITकडून मिरगावातील ब्रह्मसदन बंगल्याची तपासणी

**नाशिक/प्रतिनिधी :** महिला अत्याचार प्रकरणात अटकेत असलेल्या अशोक खरात याच्या सिन्नर तालुक्यातील मीरगाव येथील ब्रह्मसदन या आलिशान बंगल्यावर विशेष तपास पथकाने (एसआयटी) मंगळवारी (दि.२४) रात्री उशिरा तपासणी केली. न्यायालयात खरातला हजर केल्यानंतर एसआयटी पथक थेट मीरगाव येथे दाखल होत ईशानेश्वर मंदिर परिसरातील या बंगल्याची तपासणी करण्यात आली. तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण मानल्या जाणा-या या बंगल्याभोवती पथकाने परिसराची छाननी करत विविध बाबींची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. या कारवाईमुळे प्रकरणाच्या तपासाला वेग आला असून, पुढील काही दिवसांत अधिक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यापूर्वी स्थानिक पोलिसांनी याच बंगल्यावर झडती घेतली असता एक रिव्हाल्व्हर व काही काडतुसे जप्त केल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे या बंगल्याचा या प्रकरणाशी असलेला संबंध अधिक गडद झाला आहे. या पार्श्वभूमीवर एसआयटीने केलेली तपासणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. नेमके काय आढळले, कोणते पुरावे हस्तगत करण्यात आले याबाबत गोपनीयता पाळली जात आहे.



भोंदूबाबा अशोक खरातच्या लैंगिक शोषणाच्या गुन्ह्यांचा एसआयटीकडून सखोल तपास केला जात आहे. दररोज खरातचे वेगवेगळे कारनामे उघड होत आहेत. सिन्नरच्या मिरगावात त्याने उभारलेल्या मंदिरात अघोरी प्रकारासाठी वन्य प्राण्यांची हत्या (पान २ वर)


## नादाला लागाल तर तुमचे नामोनिशाण नष्ट करू

सध्या भोंदू अशोक खरात याच्याविषयी पीडित महिलांच्या तक्रारी दाखल होत असून, त्याव्यतिरिक्त अनेकांनी आपल्याला धमक्या दिल्याच्या तक्रारीही केल्या आहेत. आता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने देखील खरातने हे प्रकरण उघड करू नये यासाठी सुमारे वीस वर्षांपूर्वी धमक्या दिल्या होत्या, असा दावा केला आहे. खरातने या धंद्यात जम बसविला, तेव्हा २००७ मध्ये अंनिसकडे एक तक्रार आली होती. त्यानुसार अंनिसचे कार्यकर्ते महेंद्र दातरांगे व प्रा. सुदेश घोडेराव हे खरातच्या कार्यालयात गेले होते. तो करत असलेले कृत्य हे अंधश्रद्धायुक्त असून चुकीचे आहे, अशी जाणीव कार्यकर्त्यांनी त्याला करून दिली. त्यावर मी निवृत्त कॅप्टन आहे. माझ्याकडे रिव्हाल्व्हर आहे, अशी धमकी त्याने कार्यकर्त्यांना दिली; पण कार्यकर्त्यांनी न घाबरता आव्हान दिले. त्यावर त्याने सावध राहा, अशी धमकी दिली होती. त्यावेळी भोंदू खरात त्याने त्याचे उद्व्याप सुमारे तीन महिने बंद ठेवले होते. मात्र, काही दिवसांनी त्याने पुन्हा त्याचे कृत्य सुरू केल्याचे अंनिसने म्हटले आहे.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राम मंदिरात रामनवमी निमित्त भक्तांची मांदियाळी











**अमरावती/प्रतिनिधीः-** 'कुलभूषणा दशरथ नंदना, बाळा जो जो रे...' असे पाळण्याचे मंगल स्वर गुरुवारी शहरातील सर्व राम मंदिरात निनादले. श्रीराम जन्म सोहळ्यासाठी मंदिरात आकर्षक रांगोळी, पायघड्या आणि फुलांची उधळण करण्यात आली.

गुरुवारी दुपारी शहरातील सर्व राम मंदिरामध्ये श्रीराम नवमी साजरी होताच भाविकांनी प्रभू श्रीरामाचा जयघोष केला. यामुळे मंदिर परिसरातील वातावरण राममय झालं होतं. जागोजागी दर्शनासाठी भक्तांची गर्दी दिसली. भक्तांमध्ये अपार उत्साह पाहायला मिळाला. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामाचा जन्मोत्सव गुरुवारी सर्वत्र उत्साहाने साजरा करण्यात आला. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले होते. शहरातील भक्तीधाम, सतीधाम, काळाराम मंदिर, काठेवाडी राम मंदिर, अंबापेठ येथील मंदिरासह इतर मंदिरांमध्ये भक्तांची गर्दी होती.

कालाराम येथील प्राचीन मंदिरामध्ये खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी पत्नीसह महाआरती केली. संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सतीधाम मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. येथे भक्तांची गर्दी दिसली. राम जन्म झाल्यानंतर भक्तांना पंजरी, हलवा, रामफल ,लस्सीचा प्रसाद वितरीत करण्यात आला. राम दरबारामध्ये आकर्षक शृंगार करण्यात आला होता. तसेच भक्तीधाम मध्ये पण रामधूनसह विविध कार्यक्रम घेण्यात आले. सकाळी साडेअकरा वाजता गजर करण्यात आला. त्यानंतर बारा वाजता जन्मोत्सव आरती करण्यात आली. भक्तांच्या रांगा येथे पाहायला मिळाल्या. अंबापेट येथील राम मंदिरात राम जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला. भक्तांनी राम ललाला झोके दिले. किर्तनही यावेळी झाला. याव्यतिरिक्त शहरातील इतर मंदिरांमध्ये राम जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला.

# चांगापूर अंडरपास हनुमान जन्मोत्सवापूर्वी त्वरित दुरुस्त करा

## अन्यथा जनआंदोलन पेटणार!

### स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांचा रेल्वे प्रशासनाला इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** रेल्वे प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे चांगापूर येथील रेल्वे अंडरपास हनुमान भक्तांसाठी जीवघेणा ठरत आहे. २ एप्रिल रोजी होणाऱ्या हनुमान जन्मोत्सवापूर्वी हा अंडरपास संपूर्णतः दुरुस्त करावा, अन्यथा मोठे जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

अमरावती-नरखेड रेल्वे मार्गावरील चांगापूर नरेश हनुमान मंदिराकडे जाणारा गेट क्र. ८ वरील रेल्वे अंडरपास मार्ग नागरिकांच्या सोयीऐवजी डोकेदुखी ठरला आहे. हा रस्ता सरळ ठेवण्याऐवजी 'यु-टर्न'सारखा वळवल्यामुळे समोरून येणारे वाहन दिसत नाही. तसेच, ५ मीटरच्या या अरुंद रस्त्यावर धुळीचे लोट आणि रेती-सिमेंट साचल्याने दुचाकीस्वारांचे अपघात होत आहेत.

येत्या २ एप्रिल रोजी चांगापूर येथे परंपरेनुसार हनुमान जन्मोत्सवाचा मोठा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या चांगापूर नरेश हनुमानाच्या दर्शनासाठी आतापासूनच भाविकांची गर्दी सुरू झाली आहे. या तीर्थक्षेत्राला जाण्यासाठी सध्या रेल्वे अंडरपासचाच मार्ग उपलब्ध आहे. मात्र, या मार्गाच्या सदोष नियोजनामुळे भक्तांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब हनुमान भक्तांनी स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या निदर्शनास आणून दिली. स्वतः हनुमान भक्त असलेल्या अनिल अग्रवाल यांनी प्रत्यक्ष चांगापूरला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी जिल्ह्याचे खा. बळवंतराव वानखडे व राज्यसभा खा. डॉ. अनिल बोंडे यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा केली आहे.

लाखो भक्तांची अडचण दूर करण्यासाठी रेल्वेने हनुमान जयंतीपूर्वी हा अंडरपास त्वरीत दुरुस्त करावा किंवा पूर्वीप्रमाणेच रेल्वे क्रॉसिंग मार्ग खुला करून भाविकांना येण्या-जाण्याची सुलभ सोय करून द्यावी. रेल्वे प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास जिल्ह्यातील खासदारांना सोबत घेऊन जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा अनिल अग्रवाल यांनी दिला आहे.

# भीषण आग; थ्रेशर मशीनसह दोन एकरातील गहू जळून खाव

## -दारापूर शेतशिवार परिसरात हरम मार्गावरील घटना



अचलपूर/प्रतिनिधीः-

तालुक्यातील दारापूर शेतशिवार परिसरात हरम रोडवर गुरुवारी भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत सवाईपूरा येथील शेतकरी प्रितेश सोनवणे यांचा काढणीला आलेला सुमारे दोन एकर गहू जळून खाक झाला, तर अनुप अशोकराव काळे यांचे थ्रेशर मशीनही आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रितेश सोनवणे यांचे दारापूर शेतशिवारातील हरम रोडलगत शेत असून गुरुवारी गव्हाच्या पिकाची काढणी सुरू होती. याच दरम्यान अचानक आग लागली. कोरडे पीक आणि वाऱ्याचा वेग जास्त असल्याने आगीने क्षणात रौद्ररूप धारण केले. पाहता पाहता दोन एकरमधील उभा गहू पूर्णपणे जळून खाक झाला. आग लागली तेव्हा शेतात असलेले अनुप काळे यांचे थ्रेशर मशीनही आगीच्या विळख्यात सापडले आणि ते पूर्णतः जळून भस्म झाले. वर्षभर कष्ट करून पिकवलेले पीक हाताशी येत असताना झालेल्या या दुर्घटनेमुळे शेतकरी प्रितेश सोनवणे यांचे मोठे नुकसान झाले असून थ्रेशर जळाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

अनुप काळे यांच्या उपजीविकेवरही संकट आले आहे .आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्ट सर्किटची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी तसेच अचलपूर नगरपालिका अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. या घटनेचा महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामा करून बाधित शेतकरी व थ्रेशर मालकास शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

स्टेजमध्ये आहे, असे सांगितले. त्या नुसार भंडारी यांनी आरोपीच्या वेगवेगळ्या खात्यामध्ये १३ लाख ८७ हजार ६०० रुपये जमा केले. परंतु पैसे भरल्यावरही त्यांना लोन मिळाले नाही. काही दिवसाने आरोपीचा नंबरही बंद होता. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच भंडारी यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध दाखल केला.

## घरफोडीचे आरोपी ताब्यात

१ ग्रॅम, किंमत ७,००० असा एकूण ५२,५०० चा मुदेमाल चोरीला गेला होता. पोलीस तपासात डीबी पथकाने आरोपींचा मागोवा घेऊन मो. जावेद शेख नईम (वय १९, अबुबकर कॉलनी) आणि आदील खान अकील खान (वय १८, अलीमनगर) यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष चौकशी दरम्यान दोघांनी गुन्हा कबूल केला. जप्त केलेल्या मुदेमालामध्ये तीन सोने-पटया (१.५ ग्रॅम प्रत्येक, ३१,५००), एक सोने-पेंडॉल (२ ग्रॅम, १४,०००) आणि एक सोने-आवळे (०.५ ग्रॅम, ३,५००) यांचा समावेश आहे. एकूण जप्त केलेला मुदेमाल ४९,००० एवढा आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. नागपुरीगेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, निशांत देशमुख, डीबी पथक प्रमुख पोहेकॉ इरफान रायलीवाले, प्रविण ढेंगेकार, इमरान खान, मोहन चौव्हान व संदीप माकोडे यांनी ही कारवाई केली.

## 'जय श्रीराम! कब मिलेगा हिंदू

प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी आहे. कर्जमाफीबाबत शासनाचे आभार मानतानाच उर्वरित मागण्यांसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वी झालेल्या शेतकरी कर्जमाफी आंदोलनात ज्यांनी ज्यांनी साथ दिली, उपोषणात सहभागी झाले, रस्त्यावर उतरून आंदोलन केले, आर्थिक मदत केली किंवा विविध स्वरूपात पाठिंबा दिला अशा सर्व शेतकरी, नागरिक व कार्यकर्त्यांचा या उपोषणादरम्यान सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यामुळे या आंदोलनाला केवळ मागण्यांचा स्वरूप न राहता कृतज्ञतेची जोडही मिळणार आहे.

दरम्यान, पूर्वी जाहीर करण्यात आलेली रॅली रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, कार्यक्रम केवळ एकदिवसीय उपोषणापुरताच मर्यादित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष या उपोषणाकडे केंद्रीत झाले आहे.

एकंदरीत, बच्चू कडू यांच्या या आंदोलनाच्या घोषणेमुळे अमरावती जिल्ह्यात पुन्हा एकदा शेतकरी प्रश्न ऐरणीवर आले असून, २७ मार्च रोजी होणाऱ्या या उपोषणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राम नवमी निमित्य निघाली भव्य

मध्ये दिसत होते. लाठीकाठी चे प्रदर्शनही यावेळी करण्यात आले जागोजागी आतिषबाजी करण्यात आली. अंबा नगरी राममय झाली होती. शोभायात्रेमध्ये उद्योजक रोहित देशमुख, चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया, संजय बत्रा ,पुरुषोत्तम बजाज, राजेश शादी, डॉ. प्रकाश विश्वकर्मा, रविराज देशमुख, प्रवीण सावले ,नगरसेविका लविना हर्षे,एड.प्रशांत देशपांडे, खामगाव बँकेचे संचालक विशाल कुलकर्णी, सुधीर बोपुलवार ,अमर लुल्ला, आकाश पाली ,गुरुदयासिंह बावरी, दुर्गेश ठाकूर ,अश्विन चौधरी ,शुद्धमती आसरे ,वैष्णवी सोनवणे ,अमृता दहातोंडे ,भैय्या आवारे, लक्ष्मीकांत खंडेलवाल, पवन श्रीवास्तव ,संदीप बाजड, नानकराम नेभनानी, डॉ.रवी भूषण, विनोद कोष्टी, डॉ. अरुण मुंडे, कार्यकारणी सदस्यांमध्ये रवी सेठ पंजापी, रामचंद्र गुप्ता, जयेश राजा, एड. सचिन देवरकर,निर्मल बजाज, निरंजन दुबे ,चेतन शिरभाते, दिलीप पोपट, सचिन डहाके, हेमंत मालवीय, निलेश टवलारे ,सागर व्यास, कैलास गिरोळकर ,पप्पू जोशी, अशोक बसेरिया, विनय शिंगरे, निशाद जोध, अनिल शर्मा यांच्यासह हजारोच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. शोभायात्रा मध्ये मातृशक्ति, दुर्गा वाहिनी, प्रखंड कार्यकारिणी स्वयंसेवक यांनी आपली सेवा दिली. शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी अनिल साहू, विशाल राऊत, आदित्य रोडे,सुरेश चिकटे, बंटी पारवानी, राजीव देशमुख, अर्चना देवडिया, लिना शर्मा, सिध्दु सोलंके, शंतनु भंडारकर, विजय शर्मा, विशाल राऊत, विजय खडसे, शरद अग्रवाल, दीपक पाठक, ज्ञानेश्वर पातसे, आदित्य रोडे, कैलाश कंकरानिया प्रवीण गोनयका, जयप्रकाश अग्रवाल, श्रीरंग वडनेरकर, योगिता कळंबे, वैशाली शेलारे, निखिल विश्वकर्मा, दुर्गेश ठाकुर, सतिश कुरील, यश गुप्ता, मयुर जयस्वाल, अनिल शर्मा, विजय शर्मा, दीपक पारवानी आदींनी प्रयत्न केले. शोभायात्रा राजकमल चौकात पोहोचल्यावर मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. जोरदार घोषणाबाजी यावेळी येथे करण्यात आली.

## श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने

चौक,रामजीबाबा चौक येथील सादर करण्यात आलेला देखावा प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरले. सिंभोरा रोडवर असलेल्या वृंदावन मंगल कार्यालयापासून दि.२६ मार्च रोजी संध्याकाळी ६ वाजता या भव्यदिव्य शोभायात्रा रॅलीची सुरुवात करण्यात आली.

सर्वप्रथम नगराध्यक्ष प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने, तहसीलदार सागर ढवळे,ठाणेदार राहुल आठवले यांच्या शुभहस्ते श्रीरामाच्या मूर्तीची पूजा अर्चा करून रॅलीची सुरुवात करण्यात आली.ही रॅली छत्रपती शिवाजी चौक, जयस्तंभ चौक,व्यापारी बाजारपेठ,गांधी चौक, गुजरी बाजार,सूर्योदय मंडळ,कामगार चौक रामजीबाबा चौक ते थेट अंगनानी मंगल कार्यालय येथे रॅलीची सांगता करण्यात आली.शोभायात्रेदरम्यान विविध ट्रॅक्टर सजविण्यात येऊन त्यावर श्रीराम मूर्ती रथ,श्रीराम दरबार, संभाजी महाराज,श्री स्वामी समर्थ, कालीमाता झॉकी, केदारनाथ झॉकी,खाटू श्याम बाबा झॉकी, कोल्हापुरी महालक्ष्मी, हनुमानजी विराट क्रोधित रूप,लेझीम पथक,श्रीरामजी विविध प्रकारच्या साकारण्यात आलेल्या झॉक्यामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. या शोभायात्रा रॅलीचे जागोजागी फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशाच्या निदानात स्वागत करण्यात आले. दरम्यान विविध सामाजिक संघटनेच्या वतीने रॅली मार्गावर शरबत मठ्ठ्याची व्यवस्था करण्यात आली होती.स्थानिक श्रीराम मंदिर परिसरात कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन उमाळे यांच्यातर्फे थंड शरबत वितरित करून भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या शोभायात्रा रॅली मार्गावर युवक,युवती,महिला, भगिनी यांनी पाणी सडा रांगोळ्या टाकून रस्ता सुशोभित करण्यात आला होता.छत्रपती शिवाजी चौक,जयस्तंभ चौक व रामजीबाबा मंदिर चौक येथे नागरिकांना विशेष झॉकीचे दर्शन प्राप्त झाले.शोभायात्रा रॅली मार्गावर दोन्ही बाजूंनी शहरातील व गाव खेड्यातील महिलांनी विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी रॅली बघण्यासाठी मोठी गर्दी केली होती. गजबजलेल्या चौकातील तीनही झॉक्या नागरिकांच्या डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या होत्या. यावेळी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या शोभायात्रा रॅलीसाठी श्रीराम उत्सव समितीचे सर्वपदाधिकारी,सदस्य, सर्वपक्षीय कार्यकर्ते, मोर्शी शहरासह तालुक्यातील नागरिक इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

## मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम नवमी

शहरात आयोजित विविध ठिकाणी श्रीराम नवमी कार्यक्रमाला घेऊन आयोजित स्थळी त्यांनी भेट दिली. सर्वप्रथम आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, यश खोडके यांनी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेस नमन - पूजन - वंदन व माल्यार्पण केले. रामनवमी 'च्या मंगल दिनाचे औचित्य साधून, प्रभू श्रीरामांच्या जीवनातून मिळणारे काही अमूल्य धडे आपण आयुष्यात उतरवले पाहिजेत. अशी सामूहिक प्रार्थना करीत खोडके दाम्पत्यांनी यावेळी विश्वमांगल्याची कामना केली. यावेळी जागोजागी ' सियावर रामचंद्र की जय ' चा सामूहिक जयघोष करीत सर्व भाविकभक्तांनी श्रीरामनवमी चा जल्लोष उत्साहात साजरा केला. याप्रसंगी ठिकठिकाणी देवालयात - गाभाऱ्यात तसेच आयोजन स्थळी मनमोहक फुलांची आरास करण्यात आली होती. चित्तवेधक तोरणे, ध्वज- पताका या उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरल्या होत्या.पंजिरी प्रसादाचे वितरण, रामनामाचे संकीर्तन, महाप्रसादाचे आयोजन, अखंड रामधून तसेच आयोजन स्थळी आयोजित धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमात आमदार सुलभा खोडके यांनी सहभाग नोंदवला होता. शेवटी विज्ञानयुगातील प्रगती माणसाला सुविधा वेग आणि प्रचंड सामर्थ्य देऊ शकते. परंतु जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी नैतिक मूल्यांची आवश्यकता असते. मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांचे जीवन हे सत्य, कर्तव्यनिष्ठा, संयम, प्रेम, त्याग, न्याय आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण आहे. आधुनिक मानवाने विज्ञानाच्या प्रगतीसोबत प्रभू श्रीरामांच्या आदर्श आचरणाचा स्वीकार केला, तर मानवजातीचे भविष्य अधिक संतुलित, नैतिक आणि सुखी होऊ शकते. त्यामुळे विज्ञानयुगातही प्रभू श्रीरामांचे आदर्श हे केवळ पौराणिक कथा नसून आधुनिक जीवनाला दिशा देणारी चिरंतन मूल्ये आहेत यात शंका नाही.

यावेळी आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, यश खोडके यांनी अमरावती येथील शहराच्या परकोटाच्या आतील कुंभारवाडा - बुधवारा परिसर स्थित पट्टाभि श्रीराम मंदिर संस्थान, दहिसाथ चौक येथील हंबर्डे परिवार द्वारे संचालित श्रीराम मंदिर तसेच राजापेठ येथील दिपार्चन परिसर स्थित श्रीराम मंदिर यासोबतच व्हिएमव्ही मार्ग स्थित मोहन नगर तसेच कठोरा रोड स्थित स्वावलंबी नगर, राजकमल चौक, बालाजी प्लॉट, शिवार्पण कॉलनी, श्री शिवसाई मंदिर, यशोमंगल कॉलनी, श्रीराम मंदिर, खरैय्या नगर - महेंद्र कॉलनी, सौरभ गृहनिर्माण संस्था, अमरावती, व्हिएमव्ही रोड स्थित सौरभ कॉलनी येथील श्रीराम जन्मोत्सव २०२६ व अखंड हरीनाम ( वीणा ) या ठिकाणी भेट देऊन प्रभू श्रीरामचंद्र चरणी सर्व भाविकभक्तांच्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी मनोमन प्रार्थना केली. याप्रसंगी कुंभारवाडा,दहिसाथ चौक,राजापेठ, मोहन नगर, स्वावलंबी नगर,राजकमल चौक, बालाजी प्लॉट, शिवार्पण कॉलनी, यशोमंगल कॉलनी, खरैय्या नगर - महेंद्र कॉलनी, सौरभ कॉलनी, हमालपूरा येथील भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १ व १० वरिल उर्वरित

## भीषण अपघातात १० ठार

तीन महिला आणि एका मुलाचा समावेश आहे. बस आणि ट्रकच्या अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथकाने तात्काळ घटनास्थळावर धाव घेतली. २० रूग्णवाहिकाही घटनास्थळावर दाखल झाल्या होत्या. पोलिसांकडून गर्दीवर नियंत्रण मिळवण्यात आले, तर बचावपथकाकडून मदतकार्य सुरू करण्यात आले. महामार्गावरच अपघात झाल्यामुळे ५ किमी पर्यंत रांगा लागल्या होत्या. पोलिस प्रशासनाकडून वाहतूककोंडी दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अपघातग्रस्त बसमध्ये एकूण ४१ जण प्रवास करत होते. सर्वजण लाभार्थी परिषदेतून परत येत होते. अपघातामधील सर्व जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. छिंदवाडामध्ये लाभार्थी परिषदेत सहभागी होण्यासाठी ही बस गेली होती. या कार्यक्रमात मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर बस प्रवाशांसह उमरानालाकडे परत जात होती. पण त्याचवेळी काळाने घाला घातला. अपघाताची बातमी कळताच मुख्यमंत्री यादव यांनी दुख व्यक्त केले आहे. त्यांनी सर्व मदत करण्याच्या सूचना पोलिसांना आणि प्रशासनाला दिल्या आहेत.

## रेशनकार्डधारकांना मिळणार

हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांद्वारे केरोसीन दिले जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरा दिवसांत सोडण्याचे राज्य सरकारचे आदेश आहेत. शिधापत्रिका असलेल्या ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. त्याचसोबत ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही अशा कुटुंबांनादेखील केरोसीन मिळणार आहे. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक केरोसीन मिळवण्यासाठी पात्र असतील.

## ठाकरे गटाच्या बैठकीत राडा;

बोला, आमच्या खांद्यावर बंदूक ठेवून काय होणार? असं सांगत आपण शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील (शरद पवार) संभाव्य वाद कसा टाळला याची माहिती देत असताना अचानक प्रियंका चतुर्वेदी यांनी आक्रमक पवित्रा घेतला. संजय राउत यांनी शरद पवार यांचे नाव का घेतले? असा सवाल प्रियंका चतुर्वेदी यांनी केला.

## राज्यात १५ दिवसांचा

सहा महिन्याचा असू शकतो. या कंपनीमध्ये एक हजार कामगार काम करतात. कंपनी बंद पडली तर त्यांच्यासमोर नवे प्रश्न निर्माण होतील. तापमान वाढविण्यासाठी दररोज या कंपनीस १२ मेट्रीक टन एलपीजी गॅसची आवश्यकता आहे. तापमान कमी करण्याचे काही प्रयोग हाती घेण्यात आले आहेत. मात्र, हाताशी केवळ चार दिवस एवढाच गॅस पुरवठा आहे.

## एलपीजी घेउन 'सी बर्ड'

आहे. सद्यस्थितीत भारत आपल्या एलपीजीच्या गरजेपैकी दोन तृतियांश एलपीजीची आयात करतो. तसेच त्यापैकी ९० टक्के गॅस हा आखाती देशांमधून आयात केला जातो. अशा परिस्थितीत जेव्हा पुरवठा साखळी तुटू लागल्याने भारतात गॅसचा तुटवडाही जाणवू लागला आहे. अनेक ठिकाणी लोक पुन्हा एकदा चुकीच्या वापराकडे वळले आहेत. तर अनेक ठिकाणी एलपीजी सिलेंडरसाठी लोकांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत.

## ज्येष्ठ इतिहास संशोधक, लेखक

काळ प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. महाविद्यालयातील एम.ए.पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २० क्रमिक पुस्तके लिहिली. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू व इतिहास संशोधक डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. जयसिंगराव यांच्या संशोधन कारकिर्दीला १९६४ मध्ये सुरुवात झाली. या काळात त्यांनी विद्यापीठातील इतिहास विभागात ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास केला.

## मुंबई, दिल्ली, अमृतसरकडे

राहील, तसेच गोंदिया - बल्लारशाह मेमू पॅसेंजरही रद्द राहणार आहे. प्रवाशांनी यासाठी पर्यायी बस सेवा किंवा इतर ट्रेन पर्यायांचा विचार करावा. स्थानिक प्रवाशांसाठी हे मोठे अडथळे निर्माण होउ शकतात, त्यामुळे वेळेपूर्वी नियोजन करणे आवश्यक आहे.

## नियमावलीत अडकले पेट्रोल;

कंपन्यांनी अग्रीम रकमेची अट लागू केल्याने पंपचालकांना अचानक मोठी रक्कम उभी करावी लागत आहे. त्यातच ऑर्डरची वेळ दुपारी ३ पर्यंत मर्यादित केल्याने अडचण अधिकच वाढली आहे. पूर्वी रात्री ११ वाजेपर्यंत ऑर्डर स्वीकारल्या जात होत्या. पंपचालकांच्या मते, स्थानिक प्रशासनाने बँक व्यवहाराची प्रक्रिया गतिमान केल्यास या समस्येवर काही प्रमाणात तोडगा निघू शकतो. सध्या तीन ते चार तास लागणारी प्रक्रिया एक तासावर आणल्यास पंपचालकांना वेळेत अग्रीम रक्कम भरून ऑर्डर देता येईल आणि इंधनपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल. सध्या मात्र या निर्णयामुळे शहरात इंधनपुरवठ्याचा ताळमेळ बिघडला असून नागरिकांना त्याचा फटका बसत आहे. शासन आणि प्रशासन याकडे लक्ष देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## SITकडून मिरगावातील

करून त्यांच्या अवयवांचा वापर केल्याचा सुद्धा संशय तपास पथकाला आहे. यामुळे आता त्या दिशेनेही तपास केला जात असून, नाशिक पश्चिम वन विभाग सुद्धा एसआयटीच्या संपर्कात आहे. भोंदू अशोक खरात याने त्याच्याकडे येणा-या लोकांना हरणांची कस्तुरी देण्याचा प्रकार केल्याची चर्चा आहे. कस्तुरी त्याने कोठून व कशी मिळविली? याचा तपास करायचा असल्याचे सरकार पक्षाकडून न्यायालयात मंगळवारी सांगण्यात आले होते. तसेच हरणांची यासाठी शिकार केली गेली का? असाही संशय तपास पथकाला आहे. यामुळे आता भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार भोंदू खरातविरुद्ध कलमवाढ केली जाते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**खरातप्रकरणी कुरघोडीचे राजकारण सुरूच**-भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून विविध राजकीय नेत्यांकडून टीकेची झोड उठत आहे. विरोधी नेते सरकारला या मुद्द्यावरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत, तर दुसरीकडे राष्ट्रवादी (अजित पवार)च्या रूपाली ठोंबरे यांनी रूपाली चाकणकर यांच्यावरील टीकास्त्र अव्याहत सुरू ठेवले आहे.

**डझनभर मंत्री तुरुंगात जाण्याची शक्यता**-महाराष्ट्रात जे काही सध्या चालले ते हास्यास्पद आहे. काही मंत्र्यांनीही खरातकडे अघोरी पूजा केली आहे. या प्रकरणी डझनभर मंत्री, दोन डझन अधिकारी तुरुंगात जातील. - हर्षवर्धन सपकाळ, प्रदेशाध्यक्ष,

## क्यूआरटी जवानाची गोळी झाडून

तो रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला.

मूळचे मोर्शी तालुक्यातील धामणगाव काटपूर येथील रहिवासी असलेले विजय २०१४ बॅचचे पोलिस कर्मचारी होते. मागील चार वर्षांपासून ते क्यूआरटीमध्ये कार्यरत होते. त्याआधी त्यांनी एसआरपीएफमध्येही सेवा दिली होती. कुटुंबात दोन भाऊ असून त्यापैकी एक भाऊही पोलिस दलात कार्यरत आहे. आईच्या निधनानंतर ते काहीसे अंतर्मुख झाले होते, अशी माहिती सहकाऱ्यांकडून समोर आली आहे. विजय यांच्याकडे असलेल्या ग्लॉक पिस्टलमधून त्यांनी एकाच गोळीने आत्महत्या केली. पिस्टलमध्ये १५ राउंडची क्षमता असूनही जिवंत काडतुसे त्यांच्या जवळ सापडली. पोलिसांनी शस्त्र व मोबाईल जप्त करून तपास सुरू केला आहे.

पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले, 'प्राथमिकदृष्ट्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. वैयक्तिक किंवा आर्थिक अडचणींचा कोन तपासात आहे. मोबाईल व बँक व्यवहारांची पडताळणी सुरू आहे.' या घटनेनंतर पोलिस दलात शोककळा पसरली आहे. कर्तव्यदक्ष आणि शांत स्वभावाचा म्हणून ओळख असलेल्या विजयच्या अचानक जाण्याने सहकारी स्तब्ध झाले आहेत. शहरातही या घटनेबाबत विविध चर्चा रंगत असून, नेमके कारण काय याबाबत सर्वांचे लक्ष तपासाकडे लागले आहे.

## कारची उभ्या ट्रकला मागून

तिवसा आणि मोझरी पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी नॅशनल हायवे रुग्णवाहिकेने जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवले. या अपघातात कारमधील एका अनोळखी प्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर नरेंद्र सिंग (वय ५०, रा. अमृतसर, पंजाब) गंभीर जखमी असून, त्यांना अधिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. तसेच कार चालक उमेश यादगिरे किरकोळ जखमी झाले आहेत. तपासात समोर आले आहे की, चालकाला प्रवासादरम्यान झोप येत होती; मात्र गाडी थांबवून विश्रांती घेण्याऐवजी प्रवास सुरू ठेवल्याने हा अनर्थ घडला. तिवसा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

## लोन देण्याच्या नावावर

पास करण्यासाठी अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागते असे भंडारी यांना सांगण्यात आले. तीस लाख रुपयाचे लोन तुमचे फायनल

अकोला । वाशिम । बुलडाणा

**जनमाध्यम**

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, २७ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# सर्वांनी निर्धारित मार्गदर्शक सूचनांचे व नियमावलीचे काटेकोर पालन करावे - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिरास उत्साहात सुरुवात

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्याचा मूलभूत पाया आहे, त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**



जनगणना संचालनालय व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज दि. २६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात करण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले की, जनगणना प्रक्रियेत वेळेचे आणि अचूकतेचे विशेष महत्त्व आहे. मागील तीन महिन्यांपासून जनगणनेची पूर्वतयारी सुरू असून यंत्रणा सक्षमपणे कार्यरत आहे. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने या प्रशिक्षणात गांभीर्याने सहभागी होऊन उद्भवणाऱ्या शंकांचे त्वरित निरसन करून घ्यावे. तसेच इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचे वारंवार वाचन करून निर्धारित मार्गदर्शक सूचनांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

प्रास्ताविक करताना जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी सांगितले की, यंत्रणेतील टॉप-टू-बॉटम सर्व घटकांसाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. जनगणना २०२७च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या या विशेष प्रशिक्षण शिबिराला आजपासून उत्साहात सुरुवात झाली आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना अडचणींवर मात करण्यासाठी प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे.

# जुन्या वादातून तरुणाची हत्या ; आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव येथील जुन्या वादातून झालेल्या खून प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस आजीवन सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या निर्णयामुळे परिसरात मोठी चर्चा रंगली असून न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या प्रकरणाची माहिती अशी की, दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी फिर्यादी आकाश कैलास पवार यांनी मालेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शुभम सुभाष चव्हाण (रा. मालेगाव, जि. वाशिम) याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ५६७/२०२४ अन्वये कलम १०९ बी.एन.एस तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कलम ३(२)(न) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेत गंभीर जखमी झालेला रोहित कैलास पवार याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या गुन्ह्यात पुढे भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अंतर्गत खुनाचे कलम वाढविण्यात आले.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान आरोपीस तत्काळ अटक करण्यात येऊन त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवून भौतिक व तांत्रिक पुरावे गोळा करण्यात आले. तपासात जुन्या वादातून आरोपीने रोहित पवार याची हत्या केल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणाचा दोषारोपपत्र जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथे सादर करण्यात आला. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. माधुरी मिसर (व्यास) यांनी प्रभावी युक्तिवाद केला, तर कोर्ट पैरवी अधिकारी संतोष इंगोले यांनी साक्षीदार व पंचांना योग्य मार्गदर्शन केले. एकूण ८ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अमरावती येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल देखील आरोपीविरुद्ध ठोस ठरला. सर्व पुरावे व साक्षींचा विचार करून मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम (डीजे-०३) यांनी दि. २४ मार्च २०२६ रोजी आरोपी शुभम चव्हाण यास आजीवन सश्रम कारावास व १०,००० रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक अनुज तारे व अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांनी केला. तपासात पोलीस कर्मचारी आतीश काळमुंधळे व गणेश जाधव यांनीही मोलाची मदत केली.

# आत्मदहनाचा इशारा मागे ; पण लढा कायम – गणेश अहिर

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**



नगरपंचायतीतील ऑफलाईन टेंडर प्रकरणावरून २३ मार्च रोजी आत्मदहनाचा इशारा देणारे नगरसेवक गणेश रामप्रसाद अहिर यांनी अखेर प्रतिष्ठित नागरिकांच्या मध्यस्थीनंतर आपला निर्णय स्थगित केला आहे मात्र, 'माघार नाही, तर लढा कायम' असा स्पष्ट संदेश देत त्यांनी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांना नवीन निवेदन सादर करत सखोल चौकशीची जोरदार मागणी केली आहे अहिर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, १८ मार्च रोजी त्यांनी ऑफलाईन टेंडर प्रक्रियेवर गंभीर आक्षेप घेत कामांना स्थगिती न दिल्यास आत्मदहनाचा इशारा दिला होता यानंतर २० मार्च रोजी नगरपंचायतीकडून टेंडर प्रक्रिया नियमांनुसार झाल्याचे उत्तर देण्यात आले मात्र हे उत्तर असमाधानकारक असल्याचे स्पष्ट करत अहिर यांनी प्रशासनावर प्रश्नचिन्ह कायम ठेवले आहे.प्रतिष्ठित नागरिकांची मध्यस्थी; निर्णय स्थगित दरम्यान, शहरातील काही प्रतिष्ठित नागरिकांनी हस्तक्षेप करत अहिर यांना समजावून सांगितल्यामुळे त्यांनी त्यांच्या मानाचा आदर राखत आत्मदहनाचा निर्णय तात्पुरता स्थगित केला यामुळे शहरात निर्माण झालेला तणाव काही प्रमाणात निवळला असला तरी प्रकरण अजूनही तापलेलेच आहे.

**चौकशीची मागणी अधिक तीव्र :** नवीन निवेदनात अहिर यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे खालील महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत ऑफलाईन टेंडरची निविदा सूचना फलकावर लावली होती का? याची चौकशी टेंडर प्रक्रिया नियमाप्रमाणे उघडण्यात आली का? याची खात्री

सुरू असलेल्या कामांमध्ये वापरलेल्या साहित्याची क्वालिटी कंट्रोलमार्फत तपासणी वापरलेल्या गौण खनिजांवर शासनाची रॉयल्टी भरली आहे का? याची पडताळणी या सर्व प्रकरणाची १५ दिवसांत सखोल चौकशी इतकेच नव्हे, तर चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही कामाचे बिल अदा करू नये, अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे.

# क्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे प्रचारक मेळावा



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

अखिल भारतीय गुरुदेव सेवा आश्रमाच्या वतीने क्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे दिनांक २८ मार्च रोजी शनिवार सकाळी ११ वाजता विभागातील प्रचारकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आगामी एप्रिल महिन्यात होणाऱ्या महाराजांच्या ११७व्या जयंतीनिमित्त या मेळाव्याचे विशेष महत्त्व अधोरेखित झाले आहे.

महाराजांची जयंती ही 'ग्रामजयंती' म्हणून साजरी केली जाते. त्या पार्श्वभूमीवर या मेळाव्यात विविध विषयांवर सखोल विचारविनिमय व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच कार्यक्रमादरम्यान 'ग्रामगीता' मधील एका अध्यायाचे सामूहिक पठणही करण्यात येणार असून, उपस्थितांमध्ये आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती निर्माण होणार आहे.

उपस्थित राहावे, असे आवाहन सुनील दशमुखे, ज्योती उगले, हर्षा अंधारे, रामबकस, डेंडुले अंधारे गुरुजी, गणेश गांजरे, संतोष केळकर, आशा व्यवहारे, विजय खंदार, आशाताई भिवरकर, मनिषा वानखेडे आदींनी केले आहे.

# डॉ. मोनिका कालापाड यांची प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

तालुक्यातील पार्डी आसरा येथील रहिवासी असलेल्या डॉ. मोनिका रामकृष्ण कालापाड यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. त्यांची प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ (एम.एस.) या पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. समनक जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण कालापाड यांची धाकटी कन्या असलेल्या डॉ. मोनिका यांनी एमबीबीएस ही पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी प्रयत्न सुरू ठेवले होते. वैद्यकीय क्षेत्रात सखोल ज्ञान मिळवून समाजातील गरजू रुग्णांची सेवा करण्याचा त्यांचा दृढ निश्चय यामागे होता.

# माहेश्वरी महिलांचा गणगौर उत्सव उत्साहात



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परंपरेनुसार माहेश्वरी महिलांनी लोकप्रिय गणगौर महोत्सव उत्साहात साजरा केला. समाजाची परंपराची माहिती भावी पिढीला हवी व समाजाची उत्सव त्यांना माहित आह याकरिताम असे आयोजन दरवर्षी करण्यात येत असतात. माहेश्वरी महिला मंडळ, विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला मंडळ आणि माहेश्वरी बहू मंडळाच्या सख्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्थानिक श्रीराम मंदिरापासून शोभायात्रा काढण्यात आली. चैत्रातील ऊन पाहता, वाटेत नवयुवकांकडून कुल्फी आणि आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. शोभायात्रेत ईसर-गौरा आणि कलश घेऊन सहभागी झालेल्या सर्व सख्यांना भेट म्हणून 'टिफिन बॉक्स' वाटण्यात आले.

सायंकाळी ६:३० वाजता महेश भवनात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. गणगौर हा १६ दिवसांचा सण आहे, ज्यामध्ये शिव आणि पार्वतीची (ईसर आणि गौरा) पूजा केली जाते. सुहागन महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि कुमारीका सुयोग्य वर मिळण्यासाठी हा सण साजरा करतात.

# विद्याभारती शाळेची अग्निशमन दल येथे शैक्षणिक क्षेत्रभेट



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम येथील विद्याभारती प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच अग्निशमन दल येथे शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. या वेळी शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भेटीच्या प्रारंभी अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आग प्रतिबंधक उपाययोजना आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी तसेच अग्निशमन दलाच्या कार्यपद्धतीची माहिती देणे हा होता.

या प्रसंगी शाळेतील शिक्षिका कीर्ती कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना आग कशी लागते ती विझवण्यासाठी कोणती साधने वापरली जातात तसेच अग्निशमन गाडीची रचना व तिचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पाण्याच्या फवाऱ्याचा वापर कसा करतात हेही दाखवून दिले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांचे धाडस तत्परता आणि समाजसेवेची भावना पाहून विद्यार्थी प्रभावित झाले.

# राजकुमार पडघान बहुजन रत्न पुरस्काराने सन्मानित

## उल्हासनगर मुंबई येथे मान्यवरांचे हस्ते थाटात पुरस्कार वितरण

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**



येथून जवळच असलेल्या अडोळी येथील आंबेडकरी चळवळीतील अग्रणी नेतृत्व तथा सामाजिक कार्यकर्ते, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांचे सामाजिक कार्य विचारात घेऊन त्यांची परिवर्तन एक लोकचळवळ या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व विविध अंगाने काम करणारी महाराष्ट्र भर कार्य करणाऱ्या संघटनेच्या वतीने राजकुमार पडघान यांची बहुजन रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.या पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून विविध क्षेत्रात व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २१ मान्यवरांची निवड करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने वाशीम जिल्ह्यातील अडोळी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांना उल्हासनगर मुंबई येथील देविका लोखंडे सभागृहात दि.२१ मार्च २०२६ रोजी मान्यवरांच्या हस्ते मोठ्या थाटात पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी दि.२१ मार्च रोजी उल्हासनगर मुंबई येथे परिवर्तन एक लोकचळवळ वतीने १६ वे अधिवेशन घेण्यात आले.त्यामध्ये पाहीले सत्र हे आंबेडकरी चळवळीतील आजी माजी अधिकारी यांनी सहभागी होवून बुद्ध, फुले, शाहू व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रबोधन करून सुंदर असे गीते सादर केली.नंतर महीलांचा वैचारिक संवाद कार्यक्रम झाला.यामध्ये परिवर्तन एक लोकचळवळीच्या लत्ता पडघान, महानगर पालिकेच्या नगरसेविका अंजली सावळे, से. नि. मुख्याधिपीका अनुराधा वानखेडे, यांनी सहभाग नोंदविला. नंतर अधिवेशनाचे उद्घाटक डॉ.चंद्रकांत सावळे,तर स्वागताध्यक्ष देविदास भोईर, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.मिलींद रणवीर तर प्रमुख उपस्थिती म्हणून से.नि.अप्पर सचिव मोरे साहेब, नगरसेविका अंजली सावळे,थोरात साहेब, कृषी अधिकारी संतोष गिरी, पॅंथर राहूल हंडोरे,डी.एन.कांबळे, महेंद्र साबळे,आणि कार्यक्रम संयोजक राजकुमार सुर्वे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर,डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

# हरिष सारडा यांना अंतरिम जामीन; ३० मार्चच्या सुनावणीकडे लक्ष

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**



वाशिम शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपी हरिष सारडा यांना वाशिम जिल्हा न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे सारडा यांना तात्पुरता मोठा दिलासा मिळाला असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० मार्च रोजी होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणात दाखल असलेल्या जामीन अर्जावर न्यायालयाने प्राथमिक स्तरावर सुनावणी घेतली. या सुनावणीत दोन्ही बाजूंचा प्राथमिक विचार करून न्यायालयाने सारडा यांना अंतरिम जामीन मंजूर केला. तथापि, हा दिलासा तात्पुरता असून, प्रकरणातील कायदेशीर प्रक्रिया अद्याप सुरूच आहे.

न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी ३० मार्च ही तारीख निश्चित केली आहे. त्या दिवशी तपास अधिकाऱ्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाणार आहे. तसेच, दोन्ही बाजूंचे सविस्तर युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालय या प्रकरणात अंतिम निर्णय देणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# वन्य प्राण्यांमुळे पिकांचे अतोनात नुकसान

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

येथून जवळच असलेल्या धामणी (मानोरा) येथील महिला शेतकरी सौ सोनू दीपक ठाकरे यांचे शेतातील रब्बी हंगामातील हरभरा या पिकाचे वन्य प्राण्यांनी धुडघूस घालून अतोनात नुकसान केले आहे. या नुकसानी ची भरपाई देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन वनविभाग कार्यालय , मानोरा यांना देण्यात आले आहे.

धामणी येथील महिला शेतकरी सौ सोनू दीपक ठाकरे यांचे शेत गट क्रमांक ९३ धामणी शिवारात असून या शेतामध्ये त्यांनी रब्बी हंगामात हरभरा पिकाची पेरणी केली होती. हरभऱ्याचे पीकही चांगले होते. मात्र बहरलेल्या पिकामध्ये रोही (नीलगाय) व रानडुक्कर या वन्य प्राण्यांनी मोठ्या प्रमाणावर धुडगूस घालून पीक फस्त केले आहे.


**Change In Name**

My old name was **Simran kaur charan** palsingh Sachdev. It is changed to **Simran kaur** charanpal singh Sachdeo resident of Near Shivaji school, Bakliwal chal, patni Chowk Washim 444505


# भायजी महाराज यात्रा उत्सवामध्ये भाविकांची मंदियाळी

**- लाखो भाविक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ**

**- श्रीराम नवमी उत्सव उत्साहात साजरा**

**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**



श्रीराम नवमी निमीत्त संत भायजी महाराज तिर्थक्षेत्र पिंपळखुटा संगम येथे गुरुवार २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव, शोभायात्रा, भव्य महाप्रसाद व इतर कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशितील लाखो भाविक भक्तांनी घेतला आहे.

सव्वाशे वर्षापूर्वी अडाण व मडाण या पवित्र नद्याच्या संगम असलेल्या मंगरूळपीर तालुक्यातील पिंपळखुटा संगम येथे संत भायजी महाराज हे महान संत होऊन गेले. त्यांनी 'भुकेल्याला अन्न व तहानलेल्याला पाणी' देण्याचा मूलमंत्र आपल्या भाविक भक्तांना दिला आहे. हे अन्नदान अविरत सुरू ठेवण्याकरिता त्यांनी अडाण मडाण नद्यांच्या संगमावर भव्य श्रीराम जन्मोत्सव सुरू केला. या उत्सवामध्ये ते भाविक भक्तांना सुरवातीला पुरणाची पोळी व तुपाचा महाप्रसाद देत होतो. कालांतराने या उत्सवाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे राम लाडू व भाजी असा महाप्रसाद देण्याची प्रथा सुरू झाली. पिंपळखुटा येथे यावर्षी १३५ वा श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या श्रीराम नवमी उत्सवात गुढीपाडव्यापासून रामनवमी पर्यंत 'रामकृष्ण विठ्ठल हरि नारायण' नामाचा गजर करण्यात आला. तसेच गुरूवार २६ मार्च रोजी सकाळी ६ वाजता काकड आरती व त्यांनतर मंदीर प्रदक्षिणा म्हणजेच शोभा यात्रा उत्सवामध्ये संपन्न झाली. त्यानंतर राम तऱ्हाळकर अकोला व प्रकाश महाराज गावंडे यांच्या हस्ते श्रीराम,सिता, लक्ष्मण मृती व संत भायजी महाराज, शालवाले महाराज,बैरागी महाराज व नामदेव महाराज यांच्या समाधीचे पुजन करण्यात आले. दुपारी ११.३० वाजता परमपूज्य पद्माकरची तऱ्हाळकर यांच्या उपस्थितीत राम तऱ्हाळकर अकोला यांच्या सुमधूर वाणीतून वाणीतून श्रीराम कथा प्रवचन व दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. दुपारी ३ वाजता दहिहांडी उत्सव व मंदीर प्रदक्षिणा करून दुपारी ४ वाजतापासून भाविक भक्तांना पंक्तीत बसून महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या महाप्रसादाचा लाखांवर भक्तांनी लाभ घेतला आहे.

**पहिली पंगत महिलांची..!**

संत भायजी महाराज यांनी सुरू केलेल्या श्रीराम जन्मोत्सवामध्ये महिलांना सर्वप्रथम महाप्रसाद वितरित करण्याची प्रथा आहे. महाप्रसाद करण्याची जबाबदारी देखील पुरुष मंडळी वरच आहे. त्यामुळे येथे साजरे होणाऱ्या प्रत्येक धार्मिक उत्सवांमध्ये पहिल्यांदा महिलांना महाप्रसाद देण्यात येतो.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११९ ■ शुक्रवार, २७ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# हत्तीरोग निर्मूलनासाठी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) मोहिमेला वेग- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई जनमाध्यम दि.२६ :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ‘मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन’ (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी ‘ट्रीपल ड्रग थेरपी’ (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, ‘आयडीए’ उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी ( आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# गांजा तस्करीचा पर्दाफाश; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले असून गांजा विक्री करणाऱ्या दोन आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली. या कारवाईत १ किलो ६० ग्रॅम गांजा व मोबाईलसह सुमारे ५६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार २४ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हिंगणी येथील वार्ड क्रमांक १ मधील घरावर छापा टाकण्यात आला.

या कारवाईत गिताबाई हरिभाऊ चुटके व तिचा नातजावई रौशनकुमार उर्फ रोशनसिंग तुलसी सहाणी (रा. हिंगणी, मूळ रा. लुधियाना, पंजाब) यांना गांजा विक्री करताना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १ किलो ६० ग्रॅम गांजा जप्त केला.

तपासादरम्यान सदर गांजा गणेशनगर, सातगाव बुट्टीबोरी येथील मधु गुजरकर याच्याकडून आणण्यात आल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध सेलू पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर व त्यांच्या पथकाने पार पाडली.

# तिसऱ्या दिवशी पेट्रोल नॉर्मल, गॅससाठी अजूनही जनता रस्त्यावर

## इराण-इजराइल सावटात वर्ध्यात सिलेंडरची झुंबड कायम




**वर्धा जनमाध्यम :** इराण-इजराइल युद्धाच्या सावटाने देशभर चिंतेचे ढग दाटले असताना त्याचे पडसाद आता वर्ध्यातही उमटताना दिसत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून पेट्रोल पंपांवर उसळलेली तुफान गर्दी अखेर तिसऱ्या दिवशी, गुरुवारी काहीशी ओसरली. पंपांवरील स्थिती नॉर्मल झाली असली, तरी घरगुती गॅस सिलेंडरच्या टंचाईने मात्र नागरिकांचे हाल अजूनही संपलेले नाहीत.

शहरातील राठी अँड लखोटिया गॅस एजन्सी येथे आज सकाळी पहाटे सहा वाजल्यापासूनच नागरिकांनी रांगा लावल्या होत्या. स्वयंपाकघर पेटवण्यासाठी सिलेंडर मिळावा, या आशेने महिला-पुरुषांची झुंबड उडाली होती. सकाळी आठच्या सुमारास वाटप सुरळीत सुरू झाले; मात्र एजन्सीकडे फक्त १२० सिलेंडर उपलब्ध असल्याने अवघ्या दीड तासातच साठा संपला.

सिलेंडर संपल्याची वार्ता समजताच संतप्त नागरिकांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. दोन-दोन दिवसांपासून वाट पाहतोय, तरीही सिलेंडर मिळत नाही, अशी हतबल प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. वाढता तणाव लक्षात घेता अखेर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होताच परिस्थिती नियंत्रणात आणली आणि वातावरण शांत झाले.

दरम्यान, पेट्रोल पंपांवरील गर्दी ओसरली असली तरी गॅस टंचाईमुळे नागरिकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम होत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# रामभक्तांच्या जल्लोषात खासदार अमर काळे यांचा सहभाग

**हिंगणघाट जनमाध्यम :** तालुक्यातील वडनेर येथे रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने खासदार अमर काळे यांनी उपस्थित राहून रामललांचे दर्शन घेतले व आयोजित कार्यक्रमात सहभाग नोंदवला.



दि. २६ मार्च रोजी सकाळी वडनेर येथे रामनवमीच्या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार काळे यांनी रामरायांच्या मूर्तीची विधिवत पूजा करून दर्शन घेतले. तसेच गावात काढण्यात आलेल्या भव्य बाईक रॅलीतही त्यांनी सहभाग घेतला.

रॅलीमध्ये गावातील तरुण-तरुणी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक व आकर्षक पोशाख परिधान करून युवकांनी ‘जय श्रीराम’च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून टाकले. खासदार काळे यांनी रॅलीत सहभागी झालेल्या युवक-युवतींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाला सरपंच राजूभाऊ वानखेडे, ग्रामपंचायत सदस्य, गावातील नागरिक तसेच मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वडनेर पोलीस ठाण्याचे अधिकारीही उपस्थित होते.

# भीषण अपघातात जखमींना तात्काळ उपचार; आपत्कालीन टीमची वेगवान कामगिरी

**वर्धा जनमाध्यम :** खरागंणा परिसरात झालेल्या भीषण रस्ता अपघातात जखमी झालेल्या रुग्णांवर आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय येथील आपत्कालीन विभागाने तत्परतेने उपचार करून जीव वाचवण्याची शर्थ केली. या अपघातात दोन जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर ११ जण गंभीर व किरकोळ जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, लग्नाच्या बँड पथकाला घेऊन जाणाऱ्या टेम्पोची दुसऱ्या टेम्पोशी समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघाताची माहिती मिळताच रुग्णालयातील आपत्कालीन विभागाने तातडीने उपचाराची तयारी सुरू केली. डॉक्टर, निवासी डॉक्टर, नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचाऱ्यांनी त्वरित प्रतिसाद देत जखमींवर उपचार सुरू केले.

रुग्णालयात आणलेल्या ११ जखमींना त्यांच्या प्रकृतीनुसार चार ट्रायज गटांमध्ये विभागण्यात आले. ‘रेड’ गटातील दोन रुग्णांची प्रकृती अत्यंत गंभीर होती. त्यांना तात्काळ व्हेंटिलेटरवर ठेवून मेंदूचा सीटी स्कॅन करण्यात आला. तपासणीत गंभीर दुखापत झाल्याचे स्पष्ट झाले. एका रुग्णाच्या छातीला झालेल्या दुखापतीमुळे न्यूमोथोरॅक्स झाल्याचे निदान झाले असून त्यावर तातडीने उपचार करण्यात आले.इतर गंभीर रुग्णांना स्थिर करून पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले, तर किरकोळ जखमींवरही वेळेत उपचार करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत शस्त्रक्रिया, न्यूरोसर्जरी व ऑर्थोपेडिक्स विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांनी समन्वय साधत महत्त्वाची भूमिका बजावली.

रुग्णालयातील आधुनिक सुविधा, आयसीयू व्यवस्था व प्रशिक्षित कर्मचारी यांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी उपचार करण्यात यश आले. या घटनेतून रुग्णालयाच्या आपत्कालीन यंत्रणेची सज्जता आणि कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे.

# भरदिवसा धाडसी चोरी; दीड लाखांची पिशवी हिसकावली

**वर्धा जनमाध्यम :** शहरात भरदिवसा घडलेल्या धाडसी चोरीच्या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गोजी जामणी येथील रहिवासी गजानन गोमाजी बोरकर यांच्या हातातील दीड लाख रुपयांची रोकड असलेली पिशवी दोन अज्ञात चोरट्यांनी दुचाकीवरून येत हिसकावून नेल्याची घटना डॉक्टर कश्यप यांच्या हॉस्पिटलजवळील कृषक विद्यालय परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरकर यांनी हिंगणघाट बाजार समितीत २७ क्विंटल कापूस विक्री करून मिळालेली रक्कम बॅचलर रोडवरील भारतीय स्टेट बँकेत जमा केली होती. त्यानंतर त्यांनी बँकेतून १ लाख रुपये काढले. याशिवाय त्यांच्या जवळ ५० हजार रुपये होते. एकूण दीड लाखांची रोकड त्यांनी पिशवीत ठेवून औषध खरेदीसाठी ते डॉ. कश्यप यांच्या हॉस्पिटल शेजारील मेडिकल दुकानात गेले होते.

औषध खरेदीनंतर ते कृषक विद्यालय मार्गाने गावाकडे परतण्यासाठी निघाले असता, अचानक दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी त्यांच्या हातातील रोकड असलेली पिशवी हिसकावून क्षणार्धात पळ काढला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, भरदिवसा अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

या प्रकरणी गजानन बोरकर यांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.


## जाहीर सूचना

माझे पती राजेंद्र शंकरराव देवतळे याचे दिनांक 20 नोव्हेंबर 2025 रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे चारचाकी वाहन क्रमांक MH31DC4910 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव पिंकी राजेंद्र देवतळे वय (42) रा. पवनार ता. जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**पिंकी राजेंद्र देवतळे,**
**रा. पवनार ता. जि.**
**वर्धा - ९९७०३३५८५७**

## जाहीर नोटीस

माझे ग्राहक श्री. अंकुश नामदेव ठवले हे मौजा कोल्हापूर (सी), तहसील देवळी व जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत कोल्हापूर (सी) हद्दीत येणाऱ्या गावठाण मालमत्ता क्र. ४२, क्षेत्रफळ ११८.००.चौ. मी. (१२६५.००चौ. फूट) व त्यावर बांधलेले घर यांचे मालक आहेत.

सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत –
पूर्व : श्री. विठ्ठल भोंकुट यांचे घर,
पश्चिम : रस्ता,
उत्तर : रस्ता,
दक्षिण : सौ. शोभा येनडे यांचे घर,

सादर केलेल्या कागदपत्रांच्या पाहणीतून असे दिसून येते की, मौजा कोल्हापूर (सी), तहसील देवळी व जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत कोल्हापूर (सी) हद्दीत येणारी गावठाण मालमत्ता क्र. ४२, क्षेत्रफळ ११८.००. चौ. मी. (१२६५.०० चौ. फूट) व त्यावरील बांधकाम ही मूळतः श्री. अंकुश नामदेव ठवले यांची मालमत्ता आहे.

श्री. अंकुश नामदेव ठवले हे सन २०१० पासून वरील मालमत्तेचे मालक व धारक आहेत, असे ग्रामपंचायतने दिनांक २३/०३/२०२६ रोजी दिलेल्या प्रोसीडिंग बुक उताऱ्यानुसार दिसून येते.

श्री. अंकुश नामदेव ठवले यांनी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

सर्वसामान्य जनतेस याची जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास हरकत असल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो. नं. ९८२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझी ग्राहक सौ. शकुंतला सदाशिव पराते, सौ. अरुणा पुंडलिकराव बारवड, सौ. सुनीता विलास बारापात्रे व श्री. अनिल सदाशिवराव पराते हे मौजा हिंगणी, तहसील सेलू व जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत हिंगणी हद्दीत येणाऱ्या, मौजा क्रमांक १७५, पी.एच. क्रमांक ४, वार्ड क्रमांक १ मधील फील्ड सर्वे क्र. २५३ मधील प्लॉट क्र. १२/अ क्षेत्रफळ १४४.०० चौ. मी. (१५४९.४४ चौ. फूट) चे मालक आहेत. सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत –
पूर्व : प्लॉट क्र. १२/३ के चा उर्वरित भाग,
पश्चिम : लेआउट रस्ता,
उत्तर : प्लॉट क्र. ७
दक्षिण : प्लॉट क्र. १२/२ बी.

श्री. राजेंद्र लक्ष्मणराव पोकळे यांनी दिनांक १३/१२/२००४ रोजी दस्तऐवज क्र. १५०१/२००४ अन्वये प्लॉट क्र. १२/अ क्षेत्रफळ १४४.०० चौ. मी. हा श्री. सदाशिव लक्ष्मणरावजी पराते यांना विक्रीखताद्वारे, नमूद केलेल्या मोबदल्यावर व आवश्यक मुद्रांक शुल्क भरून विक्री केला आहे. त्यानंतर श्री. सदाशिव लक्ष्मणरावजी पराते यांचे दिनांक २१/०४/२०२५ रोजी निधन झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस श्री. अनिल सदाशिव पराते, सौ. शकुंतला सदाशिव पराते सौ. अरुणा पुंडलिकराव बारवड व सौ. सुनीता विलास बारापात्रे यांनी महसूल प्राधिकरणाकडे म्युटेशन नोंद क्र. १४२४ अन्वये दिनांक ०४/०७/२०२५;रोजी आपली नावे नोंदवून घेतली आहेत. सध्या माझ्या ग्राहकांनी वरील प्लॉट क्र. १२/अ क्षेत्रफळ १४४.००. चौ. मी. बाबत कर्जदार सौ. निशा अरविंद वाणी यांच्यासोबत विक्री करार (Sale Agreement) केला आहे. तसेच सौ. निशा अरविंद वाणी यांनी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

सर्वसामान्य जनतेस याची जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत किंवा कायदेशीर वारसांच्या नावावर झालेल्या म्युटेशन बाबत कोणास हरकत असल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो. नं. ९८२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे ग्राहक श्री. नितीन पांडुरंग फुलझले हे मौजा सावंगी मेघे, तहसील व जिल्हा वर्धा येथील, ग्रामपंचायत सावंगी मेघे हद्दीत येणाऱ्या, मौजा क्र. १३८, पी.एच. क्र. १९, फील्ड सर्वे क्र. जुना १४३ व नवीन २०३ मधील प्लॉट क्र. १ पैकी क्षेत्रफळ १८४.४७ चौ. मी. (१९८४.८९ चौ. फूट) चे मालक आहेत.

सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत –
पूर्व : ७ लेआउट रस्ता
पश्चिम : प्लॉट क्र. १३ व १४,
उत्तर : प्लॉट क्र. २, दक्षिण : रस्ता,

श्री. पांडुरंग दोमाजी फुलझले यांनी दिनांक १४/०१/२०२५ रोजी दस्तऐवज क्र. २०१/२०२५अन्वये प्लॉट क्र. १ क्षेत्रफळ १८४.४७ चौ. मी. हा श्री. नितीन पांडुरंग फुलझले यांच्या नावे भेटपत्र (उर्ƒ आ) करून दिलेला आहे.

माझ्या ग्राहकांचा दिनांक २६/१२/२००३ चा मूळ लिंक विक्रीखत (ऍेत आ) दस्तऐवज क्र. ६१९९/२००३ हरवलेला आहे. सध्या माझ्या ग्राहकांनी वरील मालमत्तेबाबत कर्जदार सौ. रिता विश्वासराव ठूल यांच्यासोबत विक्री करार (Sale Agreement) केला आहे. तसेच सौ. रिता विश्वासराव ठूल यांनी द टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे. सर्वसामान्य जनतेस याची जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास हरकत असल्यास किंवा वरील नमूद मूळ लिंक विक्रीखत कोणास आढळल्यास, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो. ९९२२४२६१६८**

## उपवनसंरक्षक, वर्धा वनविभाग, वर्धा यांचे कार्यालय

पत्ता - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या पाठीमागे, सिव्हील लाईन, वर्धा
दुरध्वनी नं.०७१५२-२४०१७०
Email Id : dycfwardha@mahaforest.gov.in/dycfwardha@gmail.com

जा.क्र.कक्ष-३/योजना/कॅम्पा/२३४९/२०२५-२६ — वर्धा दिनांक २४.०३.२०२६

### सन २०२५-२६ ई-निविदा जाहीरात - (१)

महाराष्ट्र शासनाचे सा.बां.विभागाचे पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारांकडून ब विवरण पत्राप्रमाणे ई-निविदा प्रपत्रात उपवनसंरक्षक, वर्धा वनविभाग, वर्धा यांचे अधिनस्त वनपरिक्षेत्रातील खालीलप्रमाणे असलेल्या कामाच्या टक्केवारी ई-निविदा पध्दतीच्या माध्यमातून ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदासह दिनांक २७.०३.२०२६ पासून ते ०४.०४.२०२६ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | विभाग | वनपरिक्षेत्र | कामाचे नांव | कामाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्धा | वनविभाग, वर्धा | हिंगणी | वनपरिक्षेत्र हिंगणी, मौजा सुकळी, सर्व्हे क्र.७०/१, ७०/२ येथील पुर्व पावसाळी रोपवन क्षेत्रात Chain Link Fencing उभारणे कामाबाबत | २०३०८५९/- | वर्धा जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांना ई-निविदा द्वारे वाटप करावयाची कामे |
| २. | वर्धा | वनविभाग वर्धा | वर्धा | वनपरिक्षेत्र वर्धा, मौजा सेलु मुरपाड सर्व्हे क्र.९९ येथील पुर्व पावसाळी रोपवन क्षेत्रात Chain Link Fencing उभारणे कामाबाबत | २६१८६५४ | |
| | | | | एकुण | ४६४९५१३ | |

ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन निविदा प्रसिध्द करणे | २७/०३/२०२६ | दुपारी १२.०० वाजता |
| २. | ऑनलाईन निविदा सादर करणे | २७/०३/२०२६ | दुपारी १२.०० वा.पासून |
| ३. | ऑनलाईन निविदा बंद होण्याची तारीख | ०४/०४/२०२६ | दुपारी ३.०० वाजता |
| ४. | ऑनलाईन निविदा उघडणे | ०६/०४/२०२६ | दुपारी ३.०० वाजता |


स्वाक्षरी/-
उपवनसंरक्षक
वर्धा वनविभाग, वर्धा

(क्र.जिमाका-वर्धा/२५२/२०२५-२६)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमेरिकेसह 20 देशांत अचानक कोरोना परतला

**वॉशिंग्टन/नवी दिल्ली :** अमेरिकेसह जगभरात २० हून अधिक देशात पुन्हा कोरोनाच्या केस वाढत आहेत. अमेरिकेत कोविडच्या व्हेरिएंट सार्स-कोव्ह-२ बीए.३.२ ची प्रकरणे समोर आली आहेत. गेल्या काही महिन्यांपासून या वेरिएंटच्या केस



सातत्याने वाढत आहेत. अमेरिकेच्या सीडीसींचे म्हणणे आहे की हा व्हेरिएंट पाय पसरत आहे. हळूहळू केस वाढत आहेत. अशात प्रश्न निर्माण होत आहे की अन्य देशात कोविडच्या केस वाढू शकतात का? पुन्हा मास्क घालण्याची वेळ येउ शकते ? कोविडचा सार्स-कोव्ह-२ बीए.३.२ हा व्हेरिएंट काही नवा नाही. साल २०२४ मध्ये दक्षिण आफ्रीकेत या व्हेरिएंटच्या अनेक केस आल्या होत्या. परंतू हा आता अमेरिकेत पसरत आहे. बीए.३.२ व्हेरिएंटमध्ये स्पाईक प्रोटीनवर सुमारे ७५ म्युटेशन आढळले होते. याचा अर्था हा व्हेरिएंट वेगाने आपले रु प बदलत आहे. आणि याच मुळे तो पुन्हा एक्टीव्ह झाला आहे, सातत्याने होत असलेल्या बदलांमुळे हा व्हेरिएंट इम्युन सिस्टीमला चकवा देण्यात सक्षम होउ शकतो.मास्क संदर्भात बोलयाचे झाले तर सध्या तर मास्क संदर्भात कोणतेही अनिवार्य मार्गदर्शक तत्वे नाहीत. मात्र, गर्दीच्या ठिकाणी मास्क लावणे काही वाईटही नाही. खासकरु न ह?स्पिटल, सार्वजनिक वाहतूक आणि गर्दीच्या ठिकाणी मास्क घातल्याने तुम्ही अनेक अन्य आजारांपासूनही स्वतःचा बचाव करु शकता. डा. किशोर कहते म्हणतात अमेरिकेत कोविडच्या केस वाढत आहेत. त्यामुळे अन्य देशातही कोविड वाढण्याची शक्यता असू शकते. परंतू कोविड पासून कोणत्याही प्रकारचा धोका असणार नाही. साथींच्या आजाराचे तज्ज्ञ डा. जुगल किशोर म्हणतात की सध्या भारतान नव्या व्हेरिएंटच्या कोणत्याही केस नाहीत. बहुतांश नागरिकांनचे लसीकरण झालेले आहे. अशात कोविडची गंभीर लक्षणे होण्याची कोणतीही शंका नाही. या व्हेरिएंटची लक्षणे देखील खूप हलकी असतात, त्यामुळे घाबरण्याची गरज नाही. परंतू तरीही काळजी घेण्याची गरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पुढचे चार दिवस 'अवकाळी'चे संकट

**मुंबई :**राज्यात मार्च महिन्याच्या अखेरीस उष्णतेचा पारा चांगलाच वाढलेला असतानाच आता हवामानात मोठा बदल पाहायला मिळत आहे. प्रखर उन्हामुळे नागरिक त्रस्त झालेले असताना दुसरीकडे अवकाळी पावसाची चाहूल लागली




आहे. पुढील तीन ते चार दिवस राज्यातील काही भागांत अवकाळी पाउस हजेरी लावणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासोबतच ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी बाहेर पडताना काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर तसेच मराठवाड्यातील परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ येथेही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांत गारपीटही झाली असल्याने शेतक-यांसमोर नव्या संकटाची स्थिती निर्माण झाली आहे.

## व्यासंगी इतिहास संशोधक हरपला

### ◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली

**मुंबई:** ज्यांच्या व्यासंग आणि संशोधनपूर्ण मांडणीमुळे नव्या पिढीसाठी शिव-



शाहू चरित्रांचा अमुल्य असा ठेवा उपलब्ध झाला. अशा डा.जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे आपण इतिहास संशोधन क्षेत्रातील तत्वनिष्ठ, व्यासंगी मार्गदर्शकाला मुकलो आहोत, अशी शोकमग्न भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डा. जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. पवार यांनी इतिहास संशोधन आणि अभ्यासाला वाहून घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्रांचा अनेक अंगांनी वेध घेणारी मांडणी त्यांनी केली. विशेषतः शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून त्यांनी इतिहास लेखन, संशोधन- प्रकल्पांना चालना दिली. त्यामुळेच शिवचरित्रासह, छत्रपती संभाजी महाराज, जिजाउ माँसाहेब ते महाराणी ताराराणी आणि राजर्षी छत्रपती शाहू यांच्याविषयी विपुल संदर्भ साहित्याची निर्मिती झाली. डा. पवार यांच्या पुढाकारामुळे राजर्षी शाहू छत्रपती यांचे कार्य इंग्रजीसह, अन्य विदेशी तसेच भारतीय भाषांमध्ये पोहोचले. यातून निर्माण झालेली ग्रंथसंपदा ही महाराष्ट्रासाठी संचित ठरणारे आहे. डा पवार यांच्या निधनामुळे इतिहास संशोधन क्षेत्रातील व्यासंगी मार्गदर्शक हरपला आहे. ही महाराष्ट्राची मोठी हानी आहे. त्यांच्या निधनाने पवार तसेच त्यांच्या संशोधक विद्यार्थी परिवारावर दुःखाचा आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे नमूद करु न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## इतिहास संशोधनातील दीपस्तंभ हरपला

### ◆ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे शिवचरित्राचा आणि मराठा इतिहासाचा वस्तुनिष्ठ मागोवा घेणारा एक व्यासंगी संशोधक हरपल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.डॉ. जयसिंगराव पवार यांनी आयुष्यभर महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास लोकांसमोर मांडण्याचे काम केले. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर त्यांनी केलेले संशोधन मार्गदर्शक ठरले आहे.



त्यांच्या निधनामुळे ऐतिहासिक संशोधन क्षेत्राची कधीही भरू न न येणारी हानी झाली आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.डॉ. जयसिंगराव पवार यांनी केवळ इतिहास लिहिला नाही, तर तो पुराव्यांच्या आधारे जनमानसात रु जवला. कोल्हापूरच्या मातीत राहून त्यांनी शिवकाल आणि शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा जागतिक पातळीवर नेला. त्यांच्या लेखणीत एक वेगळीच धार आणि सत्याचा आग्रह होता. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत योगदान देणारा एक दीपस्तंभ गमावल्याचे आपल्या शोकसंदेशात उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी म्हटले आहे.

## मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला

### ◆ उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**मुंबई :** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून महाराष्ट्रासाठी ही मोठी हानी आहे. मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शोक व्यक्तकरत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात



की, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराराणी, छत्रपती राजाराम महाराज, संताजी-धनाजी, राजर्षी शाहू महाराज, रामचंद्र पंत अमात्य ते क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा सखोल अभ्यास करू न डॉ. जयसिंगराव पवार यांनी वस्तुनिष्ठ आणि दस्तऐवजांवर आधारित इतिहास लेखन केले. मराठेशाहीतील इतिहासावरील गैरसमज दूर करू न वास्तववादी इतिहास समाजासमोर मांडण्याचे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे.

# सुजलाम सुफलाम सावनेरच्या विकासाच्या दिशेने दमदार सुरुवात-मुख्यमंत्री

■ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 31 कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन

■ विश्व शांतीसाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विश्व महाआरतीचा गिनिज बुक रेकॉर्ड





**नागपूर/प्रतिनिधी :** सावनेरच्या मुख्य रस्त्याचे सौंदर्यीकरण व मौनीबाबा आश्रमाचे भूमिपूजन आज झाले. खत आणि कोल गॅसिफिकेशन असे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार आहेत यातून ४० हजारावर रोजगार निर्मिती होणार आहे. या सर्व प्रकल्पांमधून सुजलाम-सुफलाम सावनेर होण्याच्या दिशेने सुरु वात झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. जगात युद्धाची परिस्थिती असताना भारत विश्वशांतीच्या दिशेने विचार करतो आणि विश्वशांतीसाठी विश्व महाआरतीचे सावनेर मध्ये झालेले आयोजन भूषणावह असल्याच्या भावना व्यक्त करू न महाआरतीच्या गिनिज बुक ऑफ रेकार्डसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

श्री रामनवमीच्या पवित्र पर्वावर सावनेर नगरपरिषद मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती विश्व विक्रमी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच विकास कामांचे ऑनलाईन भूमिपूजनही त्यांचा हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्य मंत्री अड आशिष जयस्वाल,आमदार डा. आशिष देशमुख ,माजी मंत्री रणजित देशमुख आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रभु राम हे आपले आदर्श आहेत. समाजात कोणी लहान मोठे नसून सर्व समान असल्याची शिकवण देउन त्यांनी युगधर्म मांडला. त्याच प्रभु रामांच्या जन्मदिनी रामनवमीला सावनेरचा मुख्य रस्ता सौंदर्यीकरण प्रकल्प आणि रघवी समाजाचे थोर संत मौनीबाबा यांच्या आश्रमाचे बांधकाम व सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन झाले. सावनेर मतदार संघाचे आमदार डा. आशिष देशमुख यांनी या भागात कोल गॅसीफिकेशन प्रकल्प आणि खत प्रकल्पसाठी केंद्र व राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला. येत्या काळात हे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार असून याद्वारे जवळपास ४० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या सर्व कामांद्वारे या भागाच्या विकासाला चालना मिळेल व हा भाग सुजलाम- सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय रस्ते निधीच्या २६ कोटी रु पयातून सावनेर मुख्य रस्ता सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे तर ५ कोटी खर्चातून मौनीबाबा आश्रम उभारणी व सौंदर्यीकरण होणार आहे.

तत्पूर्वी ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री तथा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांच्यासह ४९११ भक्तांनी गणपतीची महाआरती केली. याच कार्यक्रमात गिनीज बुक ऑफ रेकार्डच्या भारतातील अधिका-याने या महाआरतीचा हा गिनीज बुक ऑफ रेकार्ड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आमदार डा आशिष देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

# प्रभू श्रीराम हे जीवनाचा आदर्श-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पश्चिम नागपूर, पोद्दारेश्वर राम मंदिराच्या शोभायात्रांना उपस्थिती





**नागपूर/प्रतिनिधी :** समाजात सर्व प्रकारचे आदर्श प्रस्थापित करण्याचे कार्य प्रभू श्रीरामचंद्र यांनी केले. त्यामुळेच श्रीराम हे आपल्या सर्वांच्या जीवनाचा आदर्श असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी केले. पश्चिम नागपूर नागरिक संघातर्फे श्रीराम नवमी निमित्त काढण्यात येणा-या शोभयात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

रामनगर येथील श्रीराम मंदिर परिसरात हा कार्यक्रम झाला. समाजात समता असली पाहिजे हे प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून दाखवून त्याच प्रकारे कार्य केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगतानाच उपस्थिताना श्रीराम नवमीच्या शुभेच्छा दिल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. विकास ठाकरे, खा. मायायताई इवानते यावेळी अतिथी म्हणून उपस्थित होते. सायंकाळी मंदिरात आगमन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर अतिथींच्या हस्ते पालखी पूजन व आरती करण्यात येउन शोभायात्रेला सुरु वात करण्यात आली. यावेळी पश्चिम नागपूर नागरिक संघाचे अध्यक्ष रवी वाघमारे, सरचिटणीस राजीव काळेले, मनपा स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, योगेश पाचपोर, अनिरुद्ध पालकर, प्रवीण महाजन प्रभृती उपस्थित होते.

पोद्दारेश्वर राम मंदिर-नागपूर नगरीचे ठळक वैशिष्ट्य असलेल्या पोद्दारेश्वर राम मंदिरातर्फे काढण्यात येणा-या शोभयात्रेतही मुख्यमंत्री फडणवीस सहभागी झाले होते. या शोभायात्रेचे यंदा साठावे वर्ष आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खा. मायाताई इवानते, आ. प्रवीण दटके, महापौर नीता ठाकरे, माजी मंत्री रमेश बंग, माजी महापौर दयाशंकर तिवारी, प्रा. अनिल सोले यांच्या हस्ते प्रारंभी राम, लक्ष्मण, सीता माई यांच्या मूर्तीची पूजा करून श्रीरामाची आरती करण्यात आली. त्यानंतर जय श्रीरामच्या जयघोषात अतिथिनी रथ ओढून शोभायात्रेचा शुभारंभ केला.

# महिला व बालकांच्या पोषणात मोठी सुधारणा करण्याचे लक्ष्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाउल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनयांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.महिला व बाल विकास विभागाचे सचिव डा. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी तर्फे चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.



प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरु वातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून राज्यस्तरावरही तांत्रिक सहाय्य दिले जाणार आहे. तसेच, CIFF कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करू न प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १,००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक सहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचा-यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाईम निरीक्षण, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मानिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होउन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार आहे.

# भावाशी खासगीत संपर्क साधल्याने सीजेआय सुर्यकांत नाराज

**नवी दिल्ली :** मेडिकल प्रवेशासंदर्भातील एका केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने आज कडक भूमिका घेतली. याचिकाकर्त्याच्या वडिलांकडून मुख्य न्यायाधीशांच्या कुटुंबियांशी संपर्क करण्याचा प्रयत्न झाल्याने कोर्टाने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.



मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी हा न्याय प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रकार आहे. हा प्रकार कोर्टाचा अवमान का समजला जाउ नये याबाबत विचार करण्यात येईल असे देखील ते म्हणाले. एकूणच या प्रकरणावर सीजेआय सूर्यकांत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणाच्या सुनावणीवेळी सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्याच्या वकिलांना सांगितले की त्यांच्या अशिलाच्या वडिलांनी आदेश देण्यात आल्यानंतर माझ्या भावाला फोन केला. भावाला अशा प्रकारचा आदेश कसा काय देण्यात आला असे विचारण्यात आले. कोर्टाने हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे सांगत, तुमच्या अशिलाच्या वडिलांविरूद्ध कोर्टाच्या अवमान प्रकरणी कारवाई का करण्यात येउ नये? तुम्ही त्यांनी काय केलें हे माहिती आहे का? मला ओपन कोर्टमध्ये सर्व सांगावे लागेल. त्यांनी माझ्या भावाला फोन करण्याची हिंम्मत केली. त्यांनी सीजेआयने असा आदेश कसा दिला असं विचारले. आता ते मला आदेश देणार का? या गोष्टीची तुम्ही खातरजमा करू न घ्या.सूर्यकांत पुढे म्हणाले, तुमचा अशिल चुकीचे वागत आहे. वकील या नात्याने तुम्ही या केसपासून स्वतःला वेगळे केले पाहिजे. अशा व्यक्ती भारताबाहेर जरी लपल्या तरी त्यांना कशा प्रकारे धडा शिकवायचा हे मला माहिती आहे. तुम्ही मला धमकी देत आहात. असे करण्याची हिम्मत करू नका.

# पहिल्या पूरक यादीत 13 लाख नावे वगळली

### आतापर्यंत 76 लाख मतदार यादीतून वगळले

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजनच्या पहिल्या सप्लिमेंटरी यादीतून १३ लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. यासह, राज्यात एकूण वगळलेल्या मतदारांची संख्या सुमारे ७६ लाख झाली आहे.निवडणूक आयोगाच्या एका अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, अंडर ॲडज्युडिकेशन मध्ये ठेवलेल्या सुमारे ६० लाख मतदारांपैकी ३२ लाख नावांची तपासणी झाली आहे. यापैकी सुमारे ४०ऽ मतदार यादीतून वगळण्यात आले आहेत. तर, अजूनही सुमारे २८ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यांवर निर्णय होणे बाकी आहे. या प्रकरणांची सुनावणी राज्यात तैनात असलेले ७०५ न्यायिक अधिकारी करत आहेत. एसआयआरच्या एन्युमरेशन टप्प्यात डिसेंबरमध्ये ५८ लाख नावे वगळण्यात आली होती, ज्यामुळे एकूण मतदारांची संख्या ७.६६ कोटींवरू न ७.०८ कोटींवर आली होती. त्यानंतर २८ फेब्रु वारी रोजी जारी केलेल्या मतदार यादीत ही संख्या घटून ७,०४,५९,२८४ (सुमारे ७.०४ कोटी) झाली. या यादीत ६० लाखांहून अधिक नावे अंडर ॲडज्युडिकेशनमध्ये ठेवण्यात आली होती. अंडर ॲडज्युडिकेशनमध्ये अशा मतदारांना ठेवण्यात आले होते, ज्यांच्या कागदपत्रांवर किंवा पात्रतेवर शंका होती.

**पहिली पूरक यादी मध्यरात्री जारी-** निवडणूक आयोगाने सोमवारी रात्री उशिरा न्यायप्रविष्ट मतदारांची पहिली पूरक यादी जारी केली होती. ज्यात सुमारे १० लाख



नावे वेबसाइटवर अपलोड करण्यात आली. मात्र, या यादीत किती नावे वगळण्यात आली किंवा किती प्रकरणांचा निपटारा झाला, हे स्पष्ट करण्यात आले नाही. अधिका-यांच्या मते, ज्या प्रकरणांमध्ये ई-साइन प्रमाणीकरण पूर्ण होउ शकले, फक्त तीच नावे यादीत समाविष्ट करण्यात आली. सुमारे २९ लाख प्रकरणांवर प्रक्रिया करण्यात आली होती, परंतु तांत्रिक कारणांमुळे सर्व नावे एकाच वेळी जारी करता आली नाहीत. उर्वरित नावे टप्प्याटप्प्याने जारी केली जात आहेत. आता दर शुक्रवारी नवीन पूरक यादी जारी केली जाईल.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी ट्रीपल ड्रग थेरपी (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषत? दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरु वात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषत? विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषत? विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश



आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी ट्रीपल ड्रग थेरपी (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, आयडीए उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचा-यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय फिलेरियासिस निर्मूलन शक्य नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील या आजाराचा प्रादुर्भाव हा नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टवके रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.ट्रीपल ड्रग पालिसी ( आयडीए) यशाचा दरः नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## युद्धविराम कधी?

युद्ध आता लवकरच संपेल, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले होते. परंतु त्यांचा 'लवकर' केव्हा उजाडणार, याची कल्पना नाही. युद्ध सुरू झाल्यापासून इराणमध्ये १५०० पेक्षा जास्त आणि लेबनॉनमध्ये हजारावर लोकांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत इराणने इस्रायलवर ४०० क्षेपणास्त्रे डागली असून, त्यापैकी ९२ टक्के निकामी करण्यात आल्याचा इस्रायलचा दावा आहे. अमेरिका व इस्रायलच्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये पाणी व ऊर्जा क्षेत्रांतील इराणच्या पायाभूत सुविधांची अपरिमित हानी झाली आहे. अणुकेंद्रांजवळ हल्ले केले जात असल्याने हे युद्ध धोकादायक टप्प्यावर आल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला असला, तरी याची कोणालाही फिकीर नाही. इराणच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी इस्रायलची हवाई सुरक्षा भेदून दिमोना आणि अराद या शहरांना रविवारी लक्ष्य केले. ही दोन्ही शहरे इस्रायलच्या अणुप्रकल्पापासून जवळ आहेत. इराणच्या नतांझ अणुप्रकल्पाला लक्ष्य केल्याचा सूड इराणने उगवलेला दिसतो. इस्रायलमध्ये उत्सर्जनाचा कोणताही धोका नसल्याचे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाने म्हटले असले, तरी उद्या तो निर्माण होऊच शकणार नाही, याची शाश्वती नाही. एकीकडे इराणविरोधातील लष्करी कारवाई आटोपती घेण्याचा आपण विचार करत आहोत, असे ट्रम्प यांनी पुन्हा म्हटले असले तरीदेखील त्यांच्या प्रशासनाने युद्धासाठी २०० अब्ज डॉलरचा अतिरिक्त निधी मंजूर करण्यासाठी काँग्रेसकडे विनंती केली आहे.इराणच्या लष्कराने हिंद महासागरातील दिएगो गार्सिया येथील ब्रिटन आणि अमेरिकेच्या हवाई तळांवर हल्ला चढवला. चगोस बेटाचा भाग असलेले दिएगो गार्सिया इराणपासून ४००० किलोमीटर अंतरावर असूनही इराण हा हल्ला घडवू शकला. याचा अर्थ इराणच्या क्षेपणास्त्र क्षमतेत वाढ झाली आहे. इराणची क्षेपणास्त्र क्षमता आपण संपुष्टात आणली असल्याचा अमेरिकेचा दावा बोगस असल्याचे सिद्ध झाले आहे. पश्चिम व दक्षिण आशिया आणि पूर्व आफ्रिकेतील सुरक्षात्मक कारवायांसाठी दिएगो गार्सिया हवाई तळ अमेरिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. यापूर्वी व्हिएतनाम, इराक, अफगाणिस्तान तसेच येमेनवर हल्ले करण्यासाठी अमेरिकेने या तळाचा वापर केला होता. इराणने दिएगो गार्सिया तळावर केलेल्या हल्ल्यातून त्यांची युरोपात आतपर्यंत जाण्याची आणि संपूर्ण जगाला संकटात टाकण्याची क्षमता स्पष्ट झाली आहे. इराण आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारी मार्ग रोखून संपूर्ण जगाला वेठीस धरत आहे, अशी टीका इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केली आहे. मात्र इराणची कुरापत प्रथम आपणच काढली याचा त्यांना सोयीस्कर विसर पडला आहे. थोडक्यात, या युद्धाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आवाहनास कोणीही भीक घालत नाही, अशी परिस्थिती आहे.चीनचा आणि खास करून रशियाचा पूर्ण पाठिंबा असलेला इराण, दीर्घकाळ चालणाऱ्या या युद्धात इस्रायल-अमेरिकेकडून पराभूत होणे हे अवघड असल्याचे आरंभापासूनच स्पष्ट झाले होते. नवरोजनिमित्ताने इराणला शुभेच्छा संदेश पाठवताना रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी, आम्ही इराणचे निष्ठावान सोबती आहोत, असे उद्गार काढले आहेत. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि सर्वोच्च धार्मिक नेते अयातुल्ला मुज्तबा खामेनी यांना पुतीन यांनी खास संदेश पाठवले आहेत. अली खामेनी यांच्या हत्येचा पुतीन यांनी पुन्हा एकदा धिक्कार केला आहे. रशिया-इराण युती अंतर्गत रशिया इराणला अमेरिकन आणि इस्रायली लष्करी तळांची, युद्धनौकांची आणि विमानांची रिअल टाईम गुप्तचर माहिती पुरवत आहे. मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या लष्करी मालमत्तांना लक्ष्य करण्यासाठी इराणला या माहितीचा उपयोग होत आहे. अमेरिकन सैन्याची ठावठिकाणे, रडार व हवाई सुरक्षा यंत्रणेचे अचूक तपशील रशिया पुरवत आहे. रशियाने अत्याधुनिक लष्करी सामग्री इराणला पुरवली आहे. अझरबैझानमार्गे इराणला मदत पाठवून रशियाने उभय देशांमधील मैत्रीपूर्ण संबंध दृढ केले आहेत. रशिया इराणला डी- ३५ लढाऊ विमानांच सुटे भाग आणि एस- ३०० क्षेपणास्त्र प्रणालीच्या दुरुस्तीसाठी मदतही करणार आहे. रशियाच्या तेल विक्रीवरील निर्बंध उठवण्यात आल्यामुळे या युद्धात रशियाची चांदी झाली आहे.रशियाच्या केंद्र सरकारच्या महसुलात हायड्रोकार्बन उत्पन्नाचा वाटा ४० ते ४५ टक्के इतका आहे. म्हणूनच तेलाचे भाव जसजसे वाढत आहेत, तसतशी रशियाच्या तिजोरीत भर पडत आहे. शिवाय अमेरिकन आणि इस्रायली कारवायांमध्ये प्रिसिजन गाइडेड शस्त्रे, पॅट्रिएट इंटरसेप्टर्स आणि अन्य सामग्री मोठ्या प्रमाणात पुरवली जात आहे. ही सामग्री एरवी युक्रेनच्या संरक्षणासाठी वापरली जाऊ शकली असती. त्यामुळे यादृष्टीनेही मॉस्कोचा फायदाच आहे. सीरियामधील बशर अल असद राजवटीच्या पतनानंतर तेथील रशियाचा प्रभाव कमी झाला. युद्धात इराणमधील ड्रोन उत्पादन सुविधा उद्ध्वस्त झाली असून, त्यामुळे रशियाच्या दृष्टीने महत्त्वाची पुरवठासाखळी विस्कळीत झाली आहे. उद्या इराणमधील विद्यमान सत्ता कोसळल्यास रशियाला मध्य पूर्वेतील एक महत्त्वाचा भागीदार गमवावा लागणार आहे.यापूर्वी रशियाने केवळ अफगाणिस्तान आणि सीरियातील युद्धात थेट उडी घेतली होती. इतरवेळी रशिया कायम मुत्सद्देगिरी आणि तटस्थतेवर भर देत असतो! शिवाय असद राजवट संकटात सापडली असताना रशिया तिच्या मदतीला धावून गेला नव्हता. इस्रायल-इराणच्या युद्धात रशियाने थेट उडी घेतलेली नाही. याचे कारण रशियाला त्या भागातील राजेशाही देशांशी संबंध बिघडवायचे नाहीत किंवा इस्रायलशी असलेले संबंधही तोडायचे नाहीत. रशियाने इस्रायलचा निषेध केला असून, हा संघर्ष थांबवण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. गेल्या जानेवारीत रशिया व इराण यांनी सर्वसमावेशक सहकार्याचा करार केला होता. परंतु युद्धाच्या परिस्थितीत लष्करी मदत नसेल, असा उल्लेख त्यात होता. गेल्यावर्षी इस्रायलने पहिल्यांदा इराणवर हल्ला केला, तेव्हा रशियाने इराणला प्रगत हवाई संरक्षण प्रणाली दिल्या नाहीत. त्यामुळे इराण नाराज झाला होता. रशियाचे हात युक्रेनमधील युद्धामुळे बांधले गेले आहेत आणि ताज्या युद्धात मर्यादित मदत करण्याचेच धोरण रशियाने अवलंबले आहे. रशियाने सर्व सामर्थ्यानिशी इराणच्या युद्धात भाग घेणे, हे जगाच्या दृष्टीने नवी आपत्तीच ठरेल. मात्र या युद्धामुळे जगासमोर ऊर्जासंकट निर्माण झाले असून या जगात जबाबदार देशांनी तरी मध्य युगाप्रमाणे वागता कामा नये!

# राज्याचा अर्थसंकल्प:वाढ, कर्ज आणि असमतोलाचा आलेख

**महाराष्ट्राचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प आकाराने मोठा आणि महत्त्वाकांक्षी असला तरी त्यातून काही गंभीर आर्थिक प्रश्नही समोर येतात. हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांपुरता मर्यादित न राहता, व्यापक धोरणात्मक बदलांची गरज अधोरेखित करतो.**




राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच महाराष्ट्राचा २०२६-२७ साठी अर्थसंकल्प सादर केला. प्रस्तुत अर्थसंकल्पाचा आकार सुमारे ७,६९,३५६ कोटी रुपये इतका आहे. सध्या राज्याच्या वस्तू व सेवांचे एकूण मूल्य (सकल राज्य उत्पन्न) सुमारे ५१ लाख कोटी रुपये आहे आणि या आर्थिक वर्षाच्या अखेरीस ते ५४ लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. सरकारचे स्वत:चे महसुली उत्पन्न ६,१६,००० कोटी रुपये इतके अपेक्षित असून महसुली खर्च सुमारे ६,५६,००० कोटी रुपये असेल. त्यामुळे महसुली तूट ४०,५५२ कोटी रुपये आहे. भांडवली उत्पन्न-खर्चातील तूटही विचारात घेतल्यास एकूण वित्तीय तूट सुमारे १,५०,००० कोटी रुपये इतकी होते.

**राज्याचा कर्जभार**

राज्याचे सार्वजनिक कर्ज २०१८-१९ मध्ये ४.०७ लाख कोटी रुपये होते. त्यानंतर २०२३-२४ पर्यंत दरवर्षी सुमारे अर्धा ते पाऊण लाख कोटी रुपयांनी त्यात वाढ होत गेली; मात्र २०२३-२४ नंतर ही वाढ दरवर्षी सुमारे १ लाख ते दीड लाख कोटी रुपयांनी वाढून ११.०२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. ही कर्जवाढ मेट्रो आणि इतर विकास योजनांवर खर्च करण्यासाठी होत असली तरी कर्जफेडीचा वेग हा कर्जवाढीच्या वेगापेक्षा कमीच राहिला आहे. कर्जफेडीचा भार सरकारी करांद्वारे सर्व नागरिकांवर समानपणे पडतो असे गृहीत धरले तरी प्रादेशिक दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत कमी उत्पन्न असलेल्या प्रदेशांवर हा बोजा अधिक प्रमाणात पडतो, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्याचे आतापर्यंत साठलेले कर्ज हे राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या १७९ टक्के इतके आहे. त्यामुळे हे कर्ज कमी करण्यासाठी केवळ वार्षिक हप्ते आणि व्याज भरण्याची पद्धत पुरेशी ठरणार नाही; त्यासाठी विशेष कार्यक्रम आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**शहरीकरणाची घोडदौड**

महाराष्ट्र शहरीकरणाच्या बाबतीत देशातील अग्रगण्य राज्यांपैकी आहे आणि याचा अभिमान सरकार व नागरिक दोघांनाही आहे. प्रस्तुत अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदूही कारखाने, मेट्रोचे जाळे इत्यादी माध्यमांतून शहरीकरणाला चालना देणे हाच दिसून येतो. तथापि, महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण व शहरीकरणाचे केंद्रीकरण प्रामुख्याने मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक याच त्रिकोणात होत असल्याचे दिसते. जसे या अर्थसंकल्पात मागील वर्षाच्या तुलनेत महा-मुंबईत सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पासाठी निधी २० टक्क्याने वाढवून तो ४,५३५ कोटी रुपये इतका संकल्पित आहे. पूर्वीच्या एका मुंबईऐवजी आज अलिबागजवळ तिसरी आणि रायगड परिसरात चौथी मुंबई उभारण्याचे संकेत दिले जात आहेत. तेच पुण्याच्या बाबतीत! सातत्याने शेजारची खेडी पुण्यामध्ये घेऊन त्यांचे शहरीकरण मोठ्या प्रमाणात चालू आहे. याचा अभिमान व आनंद वाटला तरी या औद्योगिकीकरणाच्या गरजांमुळे इतर प्रदेशांचे औद्योगिकीकरण मागे पडते; सुशिक्षित तरुण-तरुणींचे लोंढे सातत्याने पुणे-मुंबईकडे वाहत असतात आणि विदर्भ-मराठवाड्यासारख्या प्रदेशांचे औद्योगिकीकरण बाजूलाच राहते. रेल्वे, विमान सेवा व रस्ते सेवा यांमध्ये निश्चितच वाढ झाली आहे. परंतु त्यामुळे औद्योगिकीकरण अल्पविकसित प्रदेशांमध्ये सरकते आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. उच्चशिक्षित तरुणांना त्या अनुरूप उद्योग स्थानिक पातळीवर उपलब्ध नसल्यामुळे स्थलांतर हाच पर्याय त्यांच्यासमोर उरतो. अनेकदा त्यांच्या मागोमाग आई-वडिलांनाही स्थलांतर करावे लागते. परिणामी विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश स्थलांतरप्रधान प्रदेश म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.

विदर्भाची दीर्घकाळ प्रलंबित असलेली चित्रनगरीची मागणी या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आली आहे. ही चित्रनगरी आधुनिक व्यवस्थापन पद्धती व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियोजनबद्ध पद्धतीने उभारली गेल्यास तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या राज्यांसह एकंदरीत मध्य भारताला त्याचा लाभ होऊ शकतो. झाडीपट्टीतील लोककला आणि कलाकारांनाही या प्रकल्पामुळे नवे व्यासपीठ मिळू शकते. म्हणूनच तरुणांनी महानगरांकडे स्थलांतर करावे की उद्योगांनीच अप्रगत भागांकडे जावे, या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. निदान भारतीय परिप्रेक्ष्यात तरी यापलीकडे महानगरांमधील केंद्रीकरण कसे थांबवावे या महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर कधी तरी आपल्याला द्यावेच लागेल.

पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय ही अर्थसंकल्पातील सकारात्मक बाब. मात्र 'पात्रता' निश्चित करताना कोणते निकष लावणार, हे महत्त्वाचे आहे. याबाबत तेलंगणाकडून शिकण्यासारखे आहे. महाराष्ट्रात भाड्याने जमीन वाहणाऱ्याच्या कर्जाची रक्कम जमीन मालकाकडे दिली गेली पण तेलंगणात जमीन कसण्यासाठी कर्ज घेणाऱ्या कुळालासुद्धा ती दिली गेली, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्या अल्प आहेत.

**कृषी व संलग्न क्षेत्रांकडे दुर्लक्ष**

राज्याच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार कृषी क्षेत्रात सुमारे ५ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे. पाऊस व हवामानाच्या अनिश्चिततेमुळे पिकांचे उत्पादन कमी-जास्त होणे हे गृहीत धरले पाहिजे; परंतु महाराष्ट्र तांत्रिकदृष्ट्या खूप पुढे गेलेले राज्य असेल तर त्याचा व तांत्रिक शिक्षण व संशोधन यांचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत कितपत गेला आहे, हे तपासून पाहणे आवश्यक होईल. आणि तांत्रिक शिक्षण संस्थांना ग्रामीण भागात शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याची, त्यांना अद्ययावत माहिती पुरविण्याची आणि शेतकरीसुलभ तंत्रे व यंत्रे विकसित करण्याची जबाबदारी तांत्रिक ज्ञानाचा विस्तार म्हणून दिली पाहिजे. ज्या-ज्या देशांमध्ये कृषीची प्रगती झाली आहे त्या देशांमध्ये तंत्रज्ञान हे शास्त्रज्ञांनी शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष कार्यात नेऊन पोहोचविल्याची अनेक उदाहरणे आपल्याला सापडतील.

कृषीची पाच टक्क्यांनी पीछेहाट म्हणजे बारमाही सिंचन असलेल्या प्रदेशातील शेतीची पीछेहाट आहे की कोरडवाहू प्रदेशातील शेतीची? याचे सरळ उत्तर द्यावयाचे झाल्यास ती पीछेहाट कोरडवाहू प्रदेशातील शेतीची आहे असे म्हणणे चूक होणार नाही. त्याचाच अर्थ कोरडवाहू प्रदेशांमधील शेतकऱ्यांचे व संलग्न व्यवसायांमधील लोकांचे उत्पन्न कमी झाले असा निष्कर्ष निघतो. त्याचे व्यवहारातील दर्शन आपल्याला खर्च-उत्पन्न संतुलित करता येत नाहीत व जुनी कर्जे फेडता येत नाहीत; म्हणून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये दिसून येते. केंद्र सरकार राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागतर्फे राज्यवार शेतकरी आत्महत्यांचे आकडे प्रकाशित करते, त्यामध्ये महाराष्ट्र सगळ्यात वर आहे परंतु त्या घटना साहजिकच सिंचनावर आधारित शेतीच्या प्रदेशांमध्ये होत नाहीत तर कोरडवाहू प्रदेशांमध्ये जास्त होतात. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, अमरावती यांच्या आकडेवारीनुसार शेतकरी आत्महत्या विदर्भात सगळ्यात जास्त आणि त्यापाठोपाठ मराठवाड्यात जास्त आहेत. साहजिकच प्रश्न उद्भवतो की, कर्जाचे समायोजन न झाल्यामुळे कर्त्या पुरुषाने आत्महत्या केली म्हणून शेतीची आणि मुलांची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांवरील आर्थिक, सामाजिक आणि मानसिक ताण कसा वाढतो आहे; कोरडवाहू क्षेत्रांमधील शेतकरी शेतीवर टिकून राहावा म्हणून सरकार काय करीत आहे; या प्रश्नांची उत्तरे शासनाकडून एकात्मिक धोरणाद्वारे मिळणे आवश्यक आहे. विदर्भातील काही भागांमध्ये असे घडत आहे की जे अति लहान शेतकरी आहेत, ते उत्पादन प्रक्रियेतील अडचणीत आणि विक्रीमध्ये सातत्याने किमान आधारभूत किंमत मिळत नसल्यामुळे शेती विकू लागले आहेत. ही प्रक्रिया सुरूच राहिली तर खेड्यांमधून लहान शेतकरी अस्तंगत होण्याची चिन्हे दिसत आहेत व तसे झाल्यास विदर्भ,मराठवाड्यातील ग्रामीण भागातील स्थलांतर अधिक वेगाने वाढू लागेल; त्याचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक परिणाम जे होतील ते वेगळेच! अशी भयावह स्थिती निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील सरकारी आकडेवारीनुसार राज्यात सुमारे २७०० ओसाड गावे आहेत; त्यापैकी सुमारे २३०० गावे एकट्या विदर्भातील आहेत; याचेही स्पष्टीकरण सरकारकडून येणे आवश्यक आहे. खरेतर विदर्भ मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय आणि शेती क्षेत्र स्थिर आणि लाभदायी केल्याशिवाय सुमारे ५५-५६ टक्के लोकांकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत असा याचा अर्थ होईल. सरकार अशा प्रकारचा अभ्यास करेल अशी आशा करू या. सरकारने अर्थसंकल्पाच्या द्वारा सिंचनाची माहिती प्रसारित केली नाही, हे पुरोगामी राज्यात अपेक्षित नाही.

**अर्थसंकल्पातील विभागनिहाय असंतुलन**


अर्थसंकल्पात दिलेल्या सुमारे ४६ विभागांचा २०२५-२६ चा नियतव्यय व २०२६-२७ च्या तरतुदी यामध्ये अनेक विभागांमध्ये सुमारे १२ कोटी लोकसंख्येच्या राज्यात तरतुदींमधील नाममात्र वाढ आणि काही विभागांमध्ये प्रत्यक्ष घट झालेलीसुद्धा दिसून येते. मात्र पायाभूत सुविधांना खूप पाठिंबा आणि लहान गावांमध्येही अनेक दृष्टींनी गैरसोईचे असे सिमेंटचे रस्ते प्रस्तावित आहेत. तरतूद आणि नियतव्यय यामधील जे असंतुलन आहे ते पुढीलप्रमाणे मांडता येईल, नियतव्यय – तरतूद = असंतुलन. (काही ठिकाणी नाममात्र वाढ = नावा)

अनुक्रमे महिला व बालविकास- ७६७५.७२ कोटी रुपये (घट); तंत्रशिक्षण- ७९२.५ कोटी रुपये (घट); मदत व पुनर्वसन- ४.५ कोटी रुपये (घट); उच्च शिक्षण- १२४ कोटी रुपये (घट); जलसंपदा- ६३७.३ कोटी रुपये (नावा); कृषी- १२६.६ कोटी रुपये (नावा); इतर मागास व बहुजन कल्याण- १८३ कोटी रुपये (नावा); गृह (परिवहन)- १४४.४ कोटी रुपये (नावा); शालेय शिक्षण-११८ कोटी रुपये (नावा); वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये- १००.६८ कोटी रुपये (नावा); वने- १००.२८ कोटी रुपये (नावा); नियोजन रोजगार हमी योजना- ८८.२ कोटी रुपये (नावा); अल्पसंख्याक विकास- ३२.५ कोटी रुपये (नावा); कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता- ३२.२८ कोटी रुपये (नावा); अन्न व नागरी पुरवठा- २१ कोटी रुपये (नावा); पशुसंवर्धन- ६२.४ कोटी रुपये (नावा). तुलनेने सामान्य प्रशासन- ५५२ कोटी रुपये (वाढ); सार्वजनिक बांधकाम व इमारती- १६५४ कोटी रुपये (वाढ).

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक समावेशक आणि संतुलित बनवण्यासाठी काही महत्त्वाच्या धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. प्रथम, कृषी क्षेत्रासाठी दीर्घकालीन धोरण तयार करणे आवश्यक आहे. सिंचन, तंत्रज्ञान, बाजार सुधारणा आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांना प्राधान्य दिल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. दुसरे म्हणजे ग्रामीण उद्योग आणि ग्रामीण सेवा क्षेत्र विकसित करणे गरजेचे आहे. कौशल्य विकास आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊ शकतो. तिसरे म्हणजे विदर्भ आणि मराठवाड्यासाठी मूलभूत विकास योजना तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये औद्योगिक गुंतवणूक, सिंचन प्रकल्प आणि पायाभूत सुविधा यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केल्याशिवाय प्रादेशिक असमतोल दूर होणार नाही. चौथे म्हणजे वित्तीय शिस्त राखणे अत्यावश्यक आहे. प्रादेशिक असमतोल, कृषी संकट आणि ग्रामीण बेरोजगारी या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्याच्या विकासाचा पाया कमकुवत राहू शकतो.

**श्रीनिवास खांदेवाले**

# असीम मुनीर यांचे बेजबाबदार वक्तव्य!



पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनिर यांनी रावळपिंडी येथील एका इफ्तार पार्टीत,शिया धर्मगुरूंना उद्देशून बेजबाबदार वक्तव्य केले आहे. इराण बद्दल तुम्हाला (शिया पंथीयांना) एवढे प्रेम असेल तर तुम्ही इराणमध्ये निघून जा.तुमच्यासाठी दरवाजे खुले आहेत.या करता निमित्त झाले ते,अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या इराणवरील हल्ल्यात,इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर. पाकिस्तान मधील शिया पंथीयांनी त्याच्या निषेधार्थ, पाकिस्तानमध्ये जागोजागी काढलेल्या निषेध मोर्चांचे.कराचीमध्ये अमेरिकन वाणिज्य दुतावासावर,शिया पंथीयांनी काढलेल्या मोर्चाने हिंसक वळण घेतले.आंदोलकांनी अमेरिकन दुतावासाच्या आवारात घुसून तेथे तोडफोड केल्यानंतर, तेथील सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात दहाच्या आसपास आंदोलक ठार झाले.आंदोलकांनी स्कार्दू येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयावर हल्ला केला.तेथेही सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात काही आंदोलक ठार झाले.

असीम मुनीर यांच्या या प्रक्षोभक विधानानंतर, पाकिस्तान मधील शिया पंथीयांमध्ये संतापाची लाट उसळली.यामुळे पाकिस्तानातील शिया समाज अतिशय संतप्त झाला असून, त्यांनी मुनीर यांना शिया पंथीयांची माफी मागण्यास सांगितले आहे.त्यांनी मुनीर यांना आठवण करून दिली आहे की, पाकिस्तानचे निर्माते कायदे आझम बॅरिस्टर मोहंमद अली जिना हे शिया मुस्लिम होते.पाकिस्तानचे सध्याचे अध्यक्ष आसिफ अली झरदारी हेही शिया मुस्लिम आहेत.

पाकिस्तानमध्ये शिया मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, जगातील शिया मुस्लिमांची संख्या लक्षात घेता, इराणच्या खालोखाल पाकिस्तानमध्ये सर्वात जास्त शिया मुस्लिम वास्तव्य करत आहेत.पाकिस्तानच्या एकूण लोकसंख्येच्या १५ ते २० टक्के लोकसंख्या शिया मुस्लिमांची असून, साधारणपणे साडे चार कोटी शिया मुस्लिम पाकिस्तानमध्ये सध्या वास्तव्य करत आहेत. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर हल्ला केल्यानंतर, पाकिस्तानची मोठीच कोंडी झाली. विशेषत: पाकिस्तानचा निकटचा मित्र असलेल्या सौदी अरेबियाला जेंव्हा या हल्ल्यांची झळ पोहोचली, तेंव्हा पाकिस्तान स्वस्थ बसणे शक्यच नव्हते.२०२५ मध्ये पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात संरक्षणविषयक करार झाला असून,या दोन्ही देशांपैकी कुणाही एकावर तिसऱ्या देशाने हल्ला केल्यास, त्यांनी एकमेकांच्या मदतीला धावून जाण्याचे करारात नमूद करण्यात आले आहे.इराणने जेंव्हा सौदी अरेबिया,कतार, बहारीन या देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ला केला तेव्हा, तुर्कस्तान, अझरबैजान या देशांबरोबर, पाकिस्ताननेही त्याबद्दल इराणचा निषेध केला होता.

पाकिस्तानचे हितसंबंध मोठ्या प्रमाणात अमेरिकेत गुंतले असल्याने, पाकिस्तानला आंधळेपणे अमेरिकेला पाठिंबा द्यावा लागतो.सध्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात युद्ध सुरू आहे. बलुचिस्तानमधील बंडखोरांनी, पाकिस्तानी सैनिकांवर छुपे हल्ले करून त्यांना जेरीस आणले आहे.त्यात भर म्हणून लष्कर प्रमुख असीम मुनीर यांनी पाकिस्तानमधील शिया समाजाला दुखावल्याने,त्याची प्रतिक्रिया म्हणून पाकिस्तानमध्ये शिया आणि सुन्नी यांच्यात संघर्ष झाला तर त्याला असीम मुनीर हेच जबाबदार रहातील.

**अभय गोखले**

## अक्षय ऊर्जेचा वापर वाढवा

स्वित्झर्लंडमधील गोल्डच शहरातील 'आयक्यू एअर' या स्विस प्रदूषण तंत्रज्ञान कंपनीने नुकताच आठवा वार्षिक जागतिक वायू गुणवत्ता अहवाल २०२५ प्रकाशित केला. या अहवालानुसार भारत हा जगातील सहावा सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. पाकिस्तान हा जगात सर्वात प्रदूषित देश ठरला असून त्यानंतर अनुक्रमे बांगलादेश, ताजिकिस्तान, चाड आणि काँगो या देशांचा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक १० प्रदूषित शहरांपैकी ५ शहरे एकट्या भारतातील आहेत. उत्तर प्रदेशातील लोनी हे जगातील क्रमांक १ चे सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले असून मेघालयातील बर्निहाट दुसऱ्या स्थानी, देशाची राजधानी दिल्ली चौथ्या स्थानी, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) सातव्या स्थानी आणि प. बंगालचे उला (बिरनगर) सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत दहाव्या स्थानी आहे. तसेच सर्वाधिक ५० प्रदूषित शहरांपैकी २९ शहरे भारतातील असून यापैकी अनेक शहरे हरियाणा, उत्तर प्रदेश व बिहार या राज्यातील आहेत. जगातील १४३ देशांतील ९ हजार ४४६ शहरांचा वायू प्रदूषणाच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करून हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

**- प्रदीप मोरे**

**संवाद**

## वन्यजिवांसाठी चारा-पाण्याची सोय

आजच्या डिजीटल युगात सिमेंटची जंगले फोफावत आहेत. परिणामी पशु-पक्ष्यांचा निवारा संकटात आला आहे. वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे, पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत गरजेचे आहे. वाढत चाललेले उन्हाचे चटके, निष्पर्ण होत असलेली झाडे, झुडुपे, दुर्मीळ होत असलेले पाणीसाठे यामुळे मुक्या वन्य प्राण्याना जगविण्यासाठी कसरत करावी लागत आहे.'पक्ष्यांसाठी घराबाहेर पाणी ठेवा' असे संदेश सोशल मीडियावर फिरू लागतात. पण संदेश पाठविणाराच पक्ष्यांसाठी पाणी ठेवत नाही, ही शोकांतिका आहे. यामुळे पशु-पक्षी कमी होऊ लागले आहेत. जागतिक उष्णतामानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतू बदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष,अतिवृष्टी, पुर इत्यादी नैसर्गीक आपत्तीवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे.उन्हाच्या प्रखर झळांमध्ये पक्ष्यांची ससेहोलपट थांबवण्यासाठी वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे गरजेचे बनले आहे.

**राजू जाधव**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# एकाचवेळी १२ पेट्रोल पंप बंद!

## प्रशासनाचे दावे ठरले फोल





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शहरातील आर्णी रोड, शारदा चौक, वनवासी मारोती रोड, दत्त चौक, धामनगाव रोड, दारव्हा रोड यांसह विविध भागांतील सुमारे १२ पेट्रोल पंप एकाचवेळी बंद झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. एका बाजूला जिल्हा प्रशासनाकडून पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा केला जात असताना, दुसऱ्या बाजूला अचानक इतक्या पंपांचे बंद होणे अनेक प्रश्न निर्माण करणारे ठरत आहे.

या घटनेमुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढली असून, संपूर्ण प्रकरणात काहीतरी गैरव्यवहार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत प्रशासनाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पेट्रोल पंप बंद राहण्याचा सर्वाधिक फटका अत्यावश्यक सेवांना बसत आहे. जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना खासगी रुग्णवाहिकांद्वारे जिल्हा रुग्णालय किंवा नागपूरसारख्या मोठ्या शहरांकडे हलवले जाते. शहरात शेकडो रुग्णवाहिका कार्यरत असून, त्यापैकी बहुतांश जुन्या 'ओमिनी' वाहनांवर आधारित असून त्या पेट्रोलवर चालतात. मात्र पेट्रोलच्या उपलब्धतेअभावी या रुग्णवाहिकांनाही पंपांवर तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. परिणामी रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी प्रशासनाकडे या प्रकरणाची तात्काळ दखल घेण्याची मागणी केली आहे. तसेच किमान रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवांसाठी स्वतंत्र पेट्रोल पुरवठा व्यवस्था करण्यात यावी, अशीही मागणी पुढे येत आहे.

### पेट्रोलच्या तिप्पट विक्रीमुळे वाढला ताण

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत पेट्रोलची मागणी अचानक वाढल्याने प्रशासन आणि नागरिक दोघांसमोरही आव्हान उभे राहिले आहे. सामान्य दिवसांच्या तुलनेत सध्या पेट्रोलची विक्री सुमारे तिप्पट झाली असून, पुरवठा व्यवस्थेवर त्याचा मोठा ताण पडत आहे. यामुळे अनेक पेट्रोल पंपांवर वेळेपूर्वीच साठा संपण्याची समस्या निर्माण होत आहे. तसेच वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. या परिस्थितीमुळे काही पंपचालकांनी पंप तात्पुरते बंद ठेवले असावेत, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. अलीकडे पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा पसरल्यानंतर नागरिकांनी गरजेपेक्षा जास्त इंधन खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. मात्र प्रत्यक्षात कुठेही इंधनाची कमतरता नसल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम यांनी स्पष्ट केले आहे.या संपूर्ण घटनाक्रमामुळे शहरात अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# नगरपरिषदेकडून खड्ड्यांना झाकण्याचा प्रयत्न!

## रामनवमीच्या मिरवणुकीत नागरिकांना अडथळे



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - देशभरात रामनवमी निमित्ताने राम जन्म महोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि जल्लोषात साजरा केला जात असताना यवतमाळ शहरात मात्र उत्सवाच्या आनंदावर खड्ड्यांचे सावट दिसून येत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरात भव्य रॅली, आकर्षक झाक्या, तसेच विविध राज्यांतून आलेल्या कलाकारांच्या सहभागाने उत्सव रंगणार असला तरी शहरातील मुख्य रस्त्यांची दयनीय अवस्था या आनंदावर विरजण घालत आहे.

शहरातील प्रमुख मार्ग, चौक आणि अगदी 'व्हीआयपी' परिसरांमध्येही मोठमोठे खड्डे पडले असून, "रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेषतः राम मंदिर परिसर जयहिंद चौक, अप्सरा चौक, मेन लाइन,टिळकवाडी परिसरातील माईंदे चौक ते संकट मोचन मार्ग, हे रस्ते अक्षरशः खड्डेमय झाले आहेत. या भागात प्रमुख लोकप्रतिनिधींची निवासस्थाने असूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. रामनवमीच्या निमित्ताने शहरातून निघणाऱ्या भव्य मिरवणुकांमध्ये मोठमोठ्या ट्रॉलींवर सजवलेल्या झाक्या, ध्वनीप्रणाली आणि कलावंतांचा सहभाग असतो. गोवा, कर्नाटक, तेलंगणा आदी राज्यांतून येणाऱ्या कलाकारांमुळे यवतमाळचा उत्सव राज्यभरात प्रसिद्ध आहे. मात्र, अशा वेळी खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यांमुळे या झाक्यांना आणि वाहनांना अडथळे निर्माण होत असून, अनेकदा सजावटीचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होते. रॅलीत सहभागी होणाऱ्या नागरिकांनाही यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, नगरपरिषदेने खड्डे बुजवण्यासाठी डांबरी रस्त्यांमध्ये मुरूम टाकून तात्पुरती मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे चित्र आहे. ही उपाययोजना अल्पकालीन ठरत असून, काही दिवसांतच पुन्हा रस्त्यांची अवस्था 'जैसे थे' होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जिल्ह्याला तीन विद्यमान मंत्री, तसेच अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी लाभले असतानाही शहरातील रस्त्यांचा कायापालट झालेला नाही.नगर परिषद निवडणुका पार पडूनही विकासाचा ठोस आराखडा दिसत नसल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढत आहे. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तरी मुख्य रस्त्यांची दुरुस्ती करून सुरक्षित व सुकर वाहतूक व्यवस्था निर्माण करणे अपेक्षित असताना, प्रशासनाचे दुर्लक्ष खेदजनक ठरत आहे. रामभक्तीच्या जयघोषात न्हालेल्या या उत्सवात खड्ड्यांचे अडथळे दूर करून शहराचा मान राखणे गरजेचे आहे. अन्यथा, यवतमाळच्या विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## • वेचक

### श्री अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता; काल्याचे कीर्तन उत्साहात संपन्न



महागाव - येथील जुने हनुमान मंदिरात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरू झालेल्या श्री अखंड हरिनाम सप्ताहाची आज गुरुवार, दि. २६ रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. रामनवमी निमित्त आयोजित या सप्ताहात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ह.भ.प. विष्णुदास महाराज वाशिमकर यांचे काल्याचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाला महिला, बालगोपाल, पुरुष मंडळी तसेच भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या सप्ताहात दररोज काकड आरती, कीर्तन व नित्य नियमांचे पालन करण्यात आले. महागावकरांनीही या धार्मिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. भक्ती, नामस्मरण आणि सामूहिक साधनेचा सुंदर संगम असलेल्या या सप्ताहाची सांगता भक्तांच्या समाधानाने आणि आनंदमय वातावरणात पार पडली.

### प्रबोधनपर्व समिती कार्यालयात सम्राट अशोक जयंती उत्साहात साजरी!

पुसद - येथील गेल्या वर्षीपासून नव्याने सुरुवात करण्यात आलेल्या प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव आयोजन समिती प्रबोधनपर्व २०२६ यांच्या वतीने वसंतराव नाईक चौक येथील कार्यालयात प्रियदर्शनी चक्रवर्ती धम्मनायक अशोक सम्राट यांची २३३० जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रा. मिलिंद सोमकुंवर यांच्या हस्ते सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून धम्मनायक सम्राट अशोक यांच्या कार्याची व इतिहासाची पुनरावृत्ती करण्यात आली. त्यांनी बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करतांना सुरुवात आपल्या घरातील कुटुंबापासून करण्यात आली असे प्रा.कल्याण साखरकर यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले. तसेच अशोक सम्राट ह्या राज्याची जयंती ही संपूर्ण भारतभर साजरी करायला पाहिजे परंतु काही विकृत विचाराच्या लोकांनी त्यांचा इतिहास दाबण्यासाठी इतर काल्पनिक असलेल्या राजाची जयंती समोर आणून स्वतंत्र मानवता व समतेच्या मार्गावर चालणारे व त्याच विचारावर राज्य चालविणारे चक्रवर्ती अशोक सम्राट यांचा इतिहास दाबण्याचा प्रयत्न सुरु आहे असे आपले विचार संतोष सुरवाडे यांनी मांडले. तसेच सम्राट अशोकाच्या काळात धम्मचक्र व तीन सिंहाची असलेली मुद्रा ही अशोक सम्राट कालीन असून आज ते आपल्या देशाच्या तिरंग्यावर आहे व प्रशासकीय मुद्रा म्हणून त्याची ओळख आहे असे प्रा.मिलिंद सोमकुवर यांनी इतिहासातील काही बाबी सांगुन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# आदर्श विवाहातून माणुसकीचा संदेश!

## नंददीप फाउंडेशनमध्ये अनोखा सोहळा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे नाते नसून, तो समाजाला दिशा देणारा संस्कार असतो, याची प्रचिती आज नंददीप फाउंडेशनमध्ये पार पडलेल्या एका अनोख्या विवाह सोहळ्यातून आली. चिरंजीव शेखर सरकटे आणि शुभ्रा दारुंडे यांनी आपल्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा क्षण बेघर मनोरुग्ण बांधवांसोबत साजरा करत समाजापुढे आदर्श उभा केला.

नवरदेव शेखर हे यवतमाळ येथील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. बाळकृष्ण सरकटे यांचे सुपुत्र असून सध्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत कार्यरत आहेत. तर नवरी शुभ्रा या घाटंजी येथील रवींद्र दारुंडे यांची कन्या आहेत. उच्चशिक्षित व सुसंस्कृत कुटुंबातील असतानाही या नवदांपत्याने दिखाऊपणाला फाटा देत समाजाभिमुख विचारांना प्राधान्य दिले. नंददीप फाउंडेशनमधील बेघर व मनोरुग्ण बांधवांच्या साक्षीने हा विवाह सोहळा पार पडला.शासकीय अधिकारी व आप्त परिवार यांच्या साक्षीने विवाह संपन्न होताच विवाहानंतर नवदांपत्याने उपस्थित बांधवांमध्ये फळांचे वाटप करून त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण वाटले. या कृतीतून त्यांनी केवळ दानधर्म न करता 'आपलेपणा'ची भावना जपली. त्या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसून येत होता. या सोहळ्यादरम्यान गोमातेचे पूजन करून पारंपरिक संस्कृतीचेही जतन करण्यात आले. नंददीप फाउंडेशनच्या संचालिका नंदिनी शिंदे,संदीप शिंदे तसेच पल्लवी गिराम, गौरी बोटरे, सविता मडावी, बबन घोडेस्वार आणि दोन्ही कुटुंबीयांच्या उपस्थितीत कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला. आजच्या दिखाऊ आणि खर्चिक विवाहप्रथेच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. विवाहासारख्या मंगल प्रसंगी समाजातील वंचित घटकांना सामावून घेऊन त्यांना प्रेम व आधार देण्याचा संदेश या नवदांपत्याने दिला. अशा उपक्रमांमुळे विवाह समारंभ केवळ वैयक्तिक आनंदापुरता मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम ठरू शकतो, हे या उदाहरणातून स्पष्ट झाले आहे. सरकटे व दारुंडे परिवाराच्या या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजानेही अशा आदर्श विवाह पद्धतीचा विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# समता पर्व-२०२६ अंतर्गत 'यवतमाळ आयडॉल' गीत गायन स्पर्धेचे ऑडिशन रविवारी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'समता पर्व-२०२६' अंतर्गत 'यवतमाळ आयडॉल' या विदर्भस्तरीय भव्य गीत गायन स्पर्धेचे ऑडिशन येत्या रविवारी (दि.२९ मार्च) रोजी होणार आहे. स्थानिक संविधान चौकातील 'लॉर्ड बुद्धा' कार्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ही ऑडिशन प्रक्रिया पार पडणार आहे. नवोदित गायक-कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने समता पर्व प्रतिष्ठानने हा उपक्रम हाती घेतला आहे. स्पर्धेचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्षा माधुरी आडे व सामाजिक कार्यकर्ते अनिल आडे यांच्या हस्ते होणार असून प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थुल यांच्यासह डॉ. विलास कनाके, उमेश मेश्राम, प्रमोदनी रामटेके, डॉ. सुमेध देवतळे आणि माजी अध्यक्षा माधुरी वाळके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया १४ ते २८ मार्च दरम्यान सुरू असून १५ ते ३५ वर्षे वयोगटातील स्पर्धक सहभागी होऊ शकतात. नोंदणी शुल्क ३०० रुपये ठेवण्यात आले आहे. ऑडिशननंतर निवड झालेल्या स्पर्धकांसाठी पहिली फेरी ९ एप्रिल, दुसरी फेरी ११ एप्रिल आणि अंतिम फेरी १३ एप्रिल रोजी समता मैदान, यवतमाळ येथे आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी मुख्य संयोजक धर्मपाल भितकर व काजल तायडे यांच्यासह सहसंयोजक विजय डोंगरे, बळीराम अडागळे व समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

### स्पर्धेची बक्षिसे

स्पर्धेत प्रथम क्रमांक २२०२२ विजेत्यास रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११०११ रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ५,५०५ रुपये रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. ही बक्षिसे अनिल आडे यांनी स्मृतिशेष रामजी आडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कृत केली असून, याशिवाय प्रोत्साहनपर बक्षिसेही वितरित केली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी जया तेलंग, हर्षा बोडखे, माया हलवले, रीना वानखडे, शुभम वाळके, प्रा. विजय डोंगरे, रवी श्रीरामे, रवी बावनगडे, दीपाली बावनगडे, नंदकिशोर निमगडे, शिवदास कांबळे, प्रतिभा दातार आदींचा सक्रिय सहभाग आहे.

इच्छुकांनी नोंदणीसाठी 9881619393 किंवा 8605907635 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आघाडीच्या आंदोलनानंतर टोलनाका प्रश्नावर आज निर्णायक बैठक



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - दारव्हा-कारंजा मार्गावरील टोलनाका प्रश्नावर महाविकास आघाडीच्या आंदोलनानंतर प्रशासन हलले असून, या संदर्भात आज (दि. 27 मार्च) जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत आंदोलनकर्ते व प्रशासन यांच्यात चर्चा होऊन तोडगा निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दारव्हा-कारंजा राष्ट्रीय महामार्गावरील टोलवसुली संदर्भात स्थानिक नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत आहेत. टोलवसुलीत नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप असून, विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी व वाहनधारकांवर आर्थिक भार पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे व जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राहूल ठाकरे यांच्या नेतृत्वात आंदोलन छेडण्यात आले.२ मार्च रोजी प्रशासनाला निवेदन देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने ११ आणि २३ मार्च रोजी आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तसेच इतर पक्षांनीही सहभाग घेतला. आंदोलनाला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळाल्याने प्रशासनाने याची दखल घेत बैठक बोलावली आहे. दरम्यान, या बैठकीसाठी जिल्हा प्रशासनाने संबंधित सर्व विभागांचे अधिकारी तसेच आंदोलनकर्त्यांना निमंत्रित केले असून, नितीन गडकरी यांच्यापर्यंतही हा विषय पोहोचल्याची माहिती आहे.राहूल ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "हे आंदोलन श्रेयासाठी नव्हे, तर लोकांच्या हितासाठी करण्यात आले आहे. टोलनाका प्रश्न मार्गी लागावा, हीच आमची भूमिका आहे." त्यांनी शांततामय पद्धतीने प्रश्न सोडवण्यावर भर देत प्रशासनाशी सहकार्याची भूमिका स्पष्ट केली. आजच्या बैठकीत टोलनाका प्रश्नावर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टिपेश्वर ESZ रिसॉर्ट्स प्रकरण विधानसभेनंतर लोकसभेत गाजणार

## खा. संजय देशमुख उचलणार आवाज

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा : टिपेश्वर ESZ रिसॉर्ट्स प्रकरण विधानसभेनंतर लोकसभेत गाजणार आहे. सदर प्रकरण खासदार संजय देशमुख लोकसभेत उचलणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसरालगत घोषित इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) मध्ये सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर रिसॉर्ट्स, हॉटेल्स व कृषी पर्यटन प्रकल्पांविरोधात गंभीर कायदेशीर आक्षेप नोंदवत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष, ट्रायबल फोरमचे अंकित नैताम यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित प्रकल्प हे केंद्र शासनाच्या 17 जानेवारी 2016 च्या ESZ अधिसूचनेशी तसेच Environment Protection Act, 1986 मधील कलम 3(2)(v) व नियम 5(3) शी विसंगत असल्याची शक्यता आहे. सदर अधिसूचनेनुसार अभयारण्यालगत कोणत्याही नवीन व्यावसायिक प्रकल्पासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी व पर्यावरणीय परिणाम मूल्यमापन (EIA) बंधनकारक आहे. मात्र, अनेक प्रकल्प ESZ क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्याकडे आवश्यक मंजुरी आहे का याबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध नसल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. तसेच Wildlife Protection Act नुसार अभयारण्य परिसरात किंवा त्यालगत कोणत्याही व्यावसायिक उपक्रमासाठी पूर्वपरवानगी आवश्यक असून वन्यजीवांच्या अधिवासाला बाधा आणणारी कोणतीही क्रिया दंडनीय आहे. संबंधित प्रकल्पांनी परवानगीविना कामकाज सुरू केले असल्यास ही बाब फौजदारी स्वरूपाची ठरू शकते, असे निवेदनात नमूद आहे. दरम्यान, दिनांक 03 जून 2022 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार देशातील सर्व अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांभोवती किमान 1 कि.मी. ESZ बंधनकारक करण्यात आले आहे. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर टिपेश्वर परिसरातील प्रकल्पांचे पुनर्मूल्यांकन झाले आहे का, याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

# राम नवमी निमित्त यवतमाळात भव्य मोटारसायकल रॅली

# 'जय श्रीराम'च्या घोषणांनी शहर दुमदुमले





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राम नवमीच्या पावन पर्वानिमित्त शहरात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत शेकडो रामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत भगव्या झेंड्यांनी संपूर्ण शहर भगवामय केले.

रॅली दरम्यान सहभागी युवकांनी "जय श्रीराम"च्या घोषणांनी वातावरण भक्तिमय केले. शहरातील प्रमुख मार्गांवरून रॅली काढण्यात आली असून नागरिकांनीही ठिकठिकाणी उभे राहून या रॅलीचे स्वागत केले. काही ठिकाणी फुलांचा वर्षाव करून रामभक्तांचा उत्साह वाढवण्यात आला. या उपक्रमामुळे शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून राम नवमीचा सण मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला.

### यवतमाळ येथे जिल्ह्यातील दिव्यांगांचा मोर्चा शनिवारी

बाभूळगाव - जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शनिवारी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला प्रारंभ होऊन तो पालकमंत्री संजय राठोड यांच्या कार्यालयावर धडकणार आहे. जिल्हा दिव्यांग संघर्ष समिती व जिल्हा विकलांग मंचच्यावतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांगांना बसस्थानकावर २०० चौ. फूट जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, २५ सप्टेंबर २०२३ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी, तसेच ई-बस सेवेत सवलत देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय बसमधील आरक्षित आसनांचा योग्य वापर, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मानधन १५०० वरून २५०० रुपये करण्याची मागणी, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधी खर्च करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# भारत मुक्ती मोर्चा व ओबीसी मोर्चाच्या आंदोलनात बहुजन समाज रस्त्यावर

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, युजीसी कायदा तात्काळ लागु करण्यात यावा व २०११ पुर्वी जे शिक्षक नोकरीला लागलेले असतील त्यांना शिक्षक पात्रता परिक्षेतुन वगळण्यात यावे या मुद्द्यांवर आज उपविभागीय अधिकारी कार्यालय पुसद येथे भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा वर्ग ओबीसी मोर्चा या सामाजिक संघटनांच्या वतीने तिन पुतळापरिसर,छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालय या मार्गाने रॅली प्रदर्शन करण्यात आले.

भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम व पिछडा वर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांनी तिन मुद्द्यांवर चरणबध्द आंदोलन घोषित केलेलें आहे पहिल्या चरणात निवेदन, दुसऱ्या चरणात धरणे प्रदर्शनआणि आज आंदोलनाचे तिसरे चरण २३ मार्च रोजी भारतात प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय मोर्चाचे आयोजन करून रॅली प्रदर्शन करण्यात आले.आंदोलनाचे चवथे चरण २३ एप्रिल रोजी भारत बंद करण्यात येणार असल्याचे आव्हान राष्ट्रीय अध्यक्षांनी जाहीर केले व आंदोलनातील सर्व मार्गदर्शकांनी तमाम मुलनिवाशी समाज बांधवांनी या आंदोलनात सहभागी होऊन आपले हक्क आणि अधिकार वाचवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन करण्यातआले. आजच्या मोर्चाचे नेतृत्व दिपक कांबळे धानोरकर, गणपत गव्हाळे आणि समाज बांधवांनी व महिलांनी मोठ्या प्रमाणात या राष्ट्रव्यापी मोर्चात सहभागी होऊन साथ सहयोग केला. केंद्र शासनाने ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला असतानाही जनगणनेच्या नोटिफिकेशनमध्ये ओबीसींच्या जातींचा स्वतंत्र कॉलमच न देणे हा ओबीसी समाजाशी केंद्र शासनाने धोखेबाजी केलेली आहे. ओबीसींच्या जातींचा कॉलम वाढविण्यात यावा, अगोदरच अशक्त असा युजीसी इक्विटी रेग्युलेशन हा कायदा केंद्राने बनवला. नंतर सर्वोच्च न्यायालयात कमजोर युक्तीवाद करुन या कायद्याला रोकणे ही सुध्दा अनु.जाती., अनु. जमाती व ओबीसी समाजाशी धोखेबाजी आहे. २०११ पुर्वी नियुक्त केलेल्या सर्व व्यवस्थापन व माध्यमाच्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षेतुन वगळण्यात यावे. या मागण्यासाठी या आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. विविध ओबीसी संघटना व इतर सामाजिक संघटनांचा सक्रिय पाठिंबा घेऊन उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत महामहिम राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करा

**अमरावती-** शेती आणि पूरक क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी विविध कृषी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०२५ सालाकरिता या पुरस्कारांसाठी पात्र शेतकरी, महिला, संस्था आणि कृषी क्षेत्रातील व्यक्तींकडून ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागवण्यात येत असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिली आहे.या पुरस्कारांमध्ये प्रामुख्याने डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण (महिलांसाठी), वसंतराव नाईक शेतीमित्र, उद्यानपंडित, आणि युवा शेतकरी पुरस्कारांचा समावेश आहे. तसेच सेंद्रिय शेतीसाठी कृषिभूषण आणि विभागातील उत्कृष्ट कर्मचाऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. हे सर्व सन्मान महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या हस्ते प्रदान केले जातात.इच्छुक उमेदवारांनी आपले प्रस्ताव कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) असलेल्या 'Agri Award' टॅबद्वारे सादर करायचे आहेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च पर्यंत असून, विहित नमुन्यातील अटी व शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुका किंवा जिल्हा कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### प्रशांत नगर उद्यानाची पाहणी

**अमरावती-** महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी प्रशांत नगर येथील उद्यानाची पाहणी केली आणि त्वरित बागेची साफसफाई सुरू करण्याचे निर्देश दिले. उपमहापौरांच्या भेटीवेळी परिसरातील नागरिकांनी उद्यानातील स्थितीबाबत आपली समस्या आणि निवेदन सादर केले, ज्यावर त्यांनी तत्काळ लक्ष दिले.या भेटीवेळी मार्गदर्शक सुनील राणा, नगरसेविका प्रिती रेवणे, राधाताई कुरील, राजु कुरील, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, बाजार व परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त मंगेश कडू, उदय चव्हाण, निरीक्षक श्रीकांत गिरी, मनपा कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी उपमहापौरांच्या भेटीचे स्वागत केले आणि उद्यान स्वच्छ राहील याची आशा व्यक्त केली.

# महसूल विभागाचा रेती माफियांना पुन्हा दणका

## रेतीसह ६१ लाखांचा मुद्देमाल जप्त;तहसीलदारांच्या नेतृत्वात कारवाई

**चांदूर बाजार/वार्ताहर**

अवैध रेती उत्खनन व वाहतूक विरोधात स्थानिक महसूल प्रशासनाने, आक्रमक पवित्रा कायम घेतला आहे. त्या अनुषंगाने आज २६ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारास ,चांदूर बाजार-मोर्शी मार्गावर महसूल विभागाने धडक कारवाई केली. या कारवाईत वाळू सह दोन वाहने जप्त करून, एकूण ६१ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक महसूल विभागाच्या या कारवाई मुळे, तालुक्यातील रेती तस्करांचे धाबे दणाणले आहे.

स्थानिक महसूल विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुरूवारी पहाटे वाजता, तहसीलदार यांनी चांदूरबाजार - मोर्शी रोडवर सापळा लावला.या सापळ्यात रेतीची चोरटी वाहतूक करणारे टाटा कंपनीचे संशयास्पद दोन ट्रक अलग अडकले.या दोन्ही ट्रक मध्ये 'आव्हान' ची रेती आढळून आली.त्यामुळे नियमानुसार त्यांच्या कडील कागदपत्रांची तपासणी केली असता ते दोन्ही ट्रक, कोणत्याही अधिकृत परवाना रॉयल्टी शिवाय चोरटी रेती व अवैध रेती वाहतूक करत असल्याचे आढळून आले. परिणामी महसूल पथकाने तत्काळ दोन्ही ट्रक जप्त करून, तहसील कार्यालयाचे आवारात लावले .या कारवाईत एकूण ६१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या मध्ये दोन्ही ट्रक मधील एक लाखाचे रेती सह, प्रत्येकी अंदाजे ३० लाखांचा एक ट्रक याप्रमाणे ६० लाखांच्या दोन वाहनांचा समावेश आहे.

ही कारवाई उप विभागीय अधिकारी अचलपूर बळवंत अरखराव यांचे मार्गदर्शनाखाली, तहसीलदार सोनल सुर्यवंशी यांच्या महसूल पथकाने केली.या पथकात तहसीलदार यांचे सह महसूल अधिकारी सुमेध सोनोने, ग्राम महसूल अधिकारी प्रफुल्ल डवरे, निवृत्ती गोरक्षे, विश्वजीत बंगले यांचा समावेश होता.



तालुक्यात कन्हान नदीतील उच्च दर्जाच्या रेतीला मोठी मागणी असल्याने, चोरट्या मार्गाने तिची वाहतूक करण्याचे प्रमाण वाढले असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाली. त्यामुळे कन्हानच्या या चोरट्यां रेती वाहतूकीवर, स्थानिक महसूल प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे.अशा अवैध रेती तस्करांवर महसूल प्रशासन धडक कारवाई करीत आहे.

**सोनल सुर्यवंशी,** तहसीलदार, चांदूरबाजार

## जुळया शहरात ४ पेट्रोल पंप बंद



**अचलपूर/वार्ताहर**

जुळया शहरासह तालुक्यात पेट्रोल आणि डिझेलसाठी ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. इंधन तुटवड्याच्या भीतीमुळे नागरिक धास्तावले असून, वाहनांची टाकी पूर्ण भरण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. या गर्दीमुळे जुळया शहरातील एकूण चार पेट्रोल पंप बंद पडले आहेत.

अमेरिका-इराण युद्ध लांबल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मंगळवारी दुपारी संसदेत केंद्र सरकारने युद्धाची सद्यस्थिती मांडली. यावेळी नजीकच्या भविष्यात भारतावर संकट येण्याची शक्यता वर्तवण्यात आल्याने, नागरिकांनी लगेच पेट्रोल पंपांकडे धाव घेतली. मंगळवार सायंकाळपासूनच जुळया शहरासह ग्रामीण भागातील पंपांवर ग्राहकांची गर्दी वाढली. एका पेट्रोल पंप चालकाच्या मते, प्रत्येक पंपावर त्यांच्या साठवण क्षमतेनुसार चार ते पाच दिवस पुरेल इतका साठा असतो. मात्र, इतक्या दिवसांत येणारे ग्राहक एकाच दिवशी पोहोचल्याने काही पंपांवरील साठा संपला. आणि दुराणी चौक ,बस स्थानक रोडवरील पंप बंद पडणे हे त्याचेच परिणाम आहेत. आवश्यक असलेला इंधनाचा पुरवठा नियमितपणे केला जाईल,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अचलपूर तालुक्यात एकूण १८ पेट्रोल पंप आहे.यामध्ये बीपीसीएलचे , आयओसीएलचे,एचपीसीएलचे,नायराचे आणि रिलायन्सचे पपांचा समावेश आहेत. या सर्व पंपांवर त्यांच्या साठवण क्षमतेनुसार किमान आठवडाभर पुरेल इतका साठा उपलब्ध आहे.तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी नागरिकांना अनावश्यक साठेबाजी टाळण्याचे आवाहन केले आहे.

## पुनर्वसनाच्या जमिनीवरच लेआऊटचा डाव; प्रकल्पग्रस्तांचा संताप उसळला

### पेढी बॅरेज बाधितांच्या पुनर्वसन प्रक्रियेत पुन्हा अडथळे

**अमरावती/का.प्र.**

गेल्या १५ वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पेढी बॅरेज प्रकल्पग्रस्त रोहनखेडा आणि पर्वतापूर येथील ग्रामस्थांच्या समस्या पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्या आहेत. ज्या जमिनीवर त्यांचे पुनर्वसन होणे अपेक्षित आहे, त्याच ठिकाणी खासगी लेआऊट विकसित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठून प्रशासनाला जाब विचारला.

पेढी बॅरेज प्रकल्पामुळे रोहनखेडा व पर्वतापूर ही गावे पूर्णपणे बाधित झाली आहेत. या गावांच्या पुनर्वसनासाठी मौजा रामगाव येथील सर्व्हे क्रमांक ११९ मधील सुमारे ८.७१ हेक्टर जमीन निश्चित करण्यात आली होती.भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत कलम ११, १९ आणि २१ नुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून अधिसूचनाही जारी करण्यात आली होती.

मात्र, प्रत्यक्षात याच जमिनीवर सध्या सपाटीकरणाचे काम सुरू असल्याचे समोर आले आहे. याहूनही धक्कादायक बाब म्हणजे या जागेवर खासगी लेआऊट मंजुरीसाठी प्रस्ताव नगररचना विभागाकडे पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. 'आमच्या पुनर्वसनासाठी निश्चित केलेली जमीनच आमच्यापासून हिरावून घेतली जात आहे,' अशी तीव्र भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



ही बाब समजताच रोहनखेडा व पर्वतापूर येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून केवळ आश्वासने दिली असून आता भूधारकांशी संगनमत केल्याचा संशयही ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी सरपंच वीणा भिलकर, उपसरपंच राजेश तायडे सतीश गोटे, किशोर भिलकर, संजय भिलकर, किरण बरवट, दीपक सरोदे, सचिन ठोंबरे आणि प्रणव तायडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी व नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून वस्तुस्थिती मांडली.

## जिल्ह्यात मुबलक इंधनसाठा उपलब्ध- जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**



गेल्या काही दिवसांपासून इंधन टंचाईबाबत पसरत असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने नागरिकांना महत्वाचे आवाहन केले आहे. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा समाधानकारक साठा उपलब्ध असून पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

इंधन टंचाईबाबत नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या माहितीला बळी पडून घाबरून जाऊ नये. केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. तसेच नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी टाळावी. इंधनाची साठवणूक करण्यात येऊ नये. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, यामुळे सर्वांना इंधनाचा पुरवठा सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे.इंधन कंपन्यांच्या आजच्या सद्यस्थितीनुसार इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि नायरा या कंपन्यांकडून इंधनाचा पुरवठा विनाअडथळा सुरू आहे. भारत पेट्रोलियमकडे पेट्रोल ४०० केएल, डिझेल ४५० केएल, हिंदुस्थान पेट्रोलियमकडे पेट्रोल ३२० केएल, डिझेल २८४ केएल, इंडियन ऑईलकडे पेट्रोल ५०० केएल, डिझेल ५५० केएल, नायराकडे पेट्रोल ३८५ केएल, डिझेल २७५ केएल इंधनसाठा आहे. इंधनाबाबत काही अडचण असल्यास संपर्क अधिकारी जाहिर करण्यात आले आहे. भारत पेट्रोलियमसाठी रवी चव्हाण ८८७९६५६५८२, हिंदुस्थान पेट्रोलियमसाठी अंकित पटेल ९५८९२५७२६०, इंडियन ऑईलसाठी विलास डिग्रसे ९४२३५८५४११, नायरासाठी आकाश मिश्रा ८५३०७५८३६९ यांच्याशी संपर्क साधता येणार आहे. यासोबतच पेट्रोल ५३३ केएल आणि डिझेल ७४२ केएल इंधन मार्गावर असून त्याचा पुरवठा देखील वेळेत होणार आहे. नागरिकांनी इंधन भरण्यासाठी पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

### हुतात्मा दिनानिमित्त अभिवादन व गुणवंतांचा सत्कार

**अमरावती-** हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे हुतात्मा दिनानिमित्त अभिवादन व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन पार पडले. डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन चे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली व्यासपीठावर प्रमुख अतिथी महापौर श्रीचंद तेजवानी, उल्हास बोपोरीकर, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, परीक्षा नियंत्रक डॉ. विजय पांडे, डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, डॉ. संजय तिरथकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांनी मंडळाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अधोरेखित करत राजगुरूंचे मंडळाशी असलेले नाते स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना हुतात्म्यांच्या



विचारातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवत सशक्त व्यक्तिमत्व घडवून देशनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले.प्रास्ताविक डॉ. विजय पांडे संचालन आशिष हटेकर तर आभार प्रदर्शन डॉ. मधुकर बुरनासे यांनी केले.

## धारणी येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती, मॉडेल करिअर सेंटर आणि व्हिजन एज्युकेशन अकादमी, धारणी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच मातोश्री इंदिरा महाविद्यालयाच्या रंग भवन सभागृहात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार केवलराम काळे आणि धारणीचे प्रकल्प संचालक सिद्धार्थ शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या प्रसंगी बोलताना आमदार केवलराम काळे म्हणाले की, मेळघाटमध्ये मोठ्या स्वरूपाच्या रोजगार मेळाव्याचे आयोजन होत आहे. या दुर्गम आणि आदिवासी भागाचा खऱ्या अर्थाने विकास हा तरुणांना रोजगार मिळाल्यानेच होऊ शकतो. त्यामुळे विविध कंपन्यांनी या भागातील उमेदवारांना संधी देऊन मेळघाटच्या प्रगतीला हातभार लावावा.सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आपल्या प्रास्ताविकेत धारणी आणि चिखलदरा सारख्या आदिवासी पट्ट्यात यापुढेही रोजगार मेळावे आयोजित करण्याचे आश्वासन दिले.




मेळाव्यात स्विगी, नवभारत फर्टिलायझर, जावील सर्किट, टी.एस.पी.एल. यांसारख्या एकूण २० नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. ३५५ रिक्त पदांसाठी ५१४ उमेदवारांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी ११३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. ५ उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते तात्काळ नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व्हिजन अकादमीचे राजकिशोर मालवीय होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुणाल मालवीय, सुभाष गुल्हाने आणि महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. संचालन आकांशा प्रभे यांनी तर आभार प्रा. सोनकर यांनी मानले.

## दिव्यांग नोंदणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती-** दिव्यांग तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी जिल्ह्यात विशेष नोंदणी व मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन नुकतेच करण्यात आले. 'कौशल्याचा सन्मान, दिव्यांगांचा स्वाभिमान' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील तीन केंद्रांवर ही सत्रे पार पडली. यामध्ये डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय (चपराशीपुरा), सत्यशोधक बहुद्देशीय शिक्षण संस्था (मासोद) आणि राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था (मार्डी रोड) यांचा समावेश होता. या तिन्ही केंद्रांवर मिळून एकूण २५० दिव्यांग उमेदवारांची नोंदणी पूर्ण करण्यात आली. जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी उपस्थित उमेदवारांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. तसेच, खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि स्वयंरोजगारासाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक पर्यायांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. नयना कडू, कौशल्य विकास अधिकारी संदीप यादव, मुख्याध्यापक महापात्रा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांनी आत्मविश्वासाने स्वावलंबनाकडे वाटचाल करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## मनपाच्या आरोग्य केंद्रांत एचपीव्ही लसीकरण

**अमरावती/क्रा.प्र.**

लसीकरण दिनाचे औचित्य साधून अमरावती महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने शहरात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला (Cervical Cancer) रोखण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या एकूण १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये व्यापक HPV लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून शहरी आरोग्य केंद्र विलास नगर येथे लसीकरण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन महानगरपालिकेचे महापौर तेजवानी तसेच नगरसेवक संजय नरवणे, समाजसेवक कौशिक अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. मुलींचे आरोग्य हेच खऱ्या अर्थाने घराचे आरोग्य असते. भविष्यातील गंभीर आजारांपासून आपल्या लेकींना सुरक्षित ठेवण्यासाठी 'HPV' लस हे एक प्रभावी सुरक्षा कवच आहे. कर्करोगासारख्या आजाराला प्रतिबंध घालणे आता विज्ञानामुळे शक्य झाले आहे. अमरावतीच्या १३ केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध असून, सुजाण पालकांनी १४ वर्ष पूर्ण आणि १५ वर्ष पूर्ण न केलेल्या वयोगटातील आपल्या मुलींना ही लस टोचून देऊन त्यांना निरोगी आयुष्याची भेट द्यावी. महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी आरोग्य केंद्र विलास नगर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिष ठाकरे, डॉ. संतोष तोटे यांनी उपस्थित पालकांना लसीचे तांत्रिक महत्त्व पटवून दिले.



### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत जिल्ह्यातील २४ वे सौर प्रकल्प सुरू

## जिल्ह्याने ओलांडला १०० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचा टप्पा

**अमरावती/का.प्र.**

धारणी तालुक्यातील दिया येथील १० मेगावॅटचा सौर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने, राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०', योजनेत जिल्ह्याने १०० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचा टप्पा पूर्ण केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ३७ हजार ३५५ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळायला सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांची दिवसा विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०' या महत्वाकांक्षी योजनेत विकेंद्रीत स्वरूपाचे सौर प्रकल्प उभारून राज्यात १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे. अमरावती परिमंडळ मध्ये मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती मिळाली आहे.अमरावती जिल्ह्यात या योजनेअंतर्गत ३२८ मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष असून २४ सौर प्रकल्प पूर्ण होऊन सुरू झाल्यामुळे जिल्ह्याची सौर ऊर्जा निर्मितीची क्षमता ११० मेगावॅट झाली आहे. मेळघाटासारख्या दुर्गम क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी या योजनेचे महत्व अधिक असून धारणी तालुक्यात २६ मेगावॅट क्षमता असलेले ३ प्रकल्प सुरू झाले आहे. यामध्ये आज कार्यान्वित झालेला १० मेगावॅट क्षमता असलेला दिया येथे कढाव उपकेंद्रासाठी आणि डाबका उपकेंद्रासाठी ५ मेगावॅट तसेच कळमखार धारणी उपकेंद्रकरिता ११ मेगावॅट क्षमता असलेले असे दोन प्रकल्प याअगोदरच सुरू झाले आहे. त्यामुळे धारणी तालुक्यातील ८ वाहिन्यांवर असलेल्या ३१०९ दिवसा वीज मिळत आहे. दिया सौर प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या ३३ केव्ही कढाव उपकेंद्राला जोडण्यात आली आहे आणि या उपकेंद्राच्या माध्यमातून हरिसाल, दुणी आणि पाटिया या ११ केव्ही वाहिनीच्या माध्यमातून या वाहिनीवरील ११७४ शेतकऱ्यांना दिवसा आणि खात्रीशिर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. याअगोदर २० मार्चला मोर्शी विभागाअंतर्गत ३३ केव्ही बेनोडा उपकेंद्रासाठी ८ मेगावॅट क्षमता असलेला सौर प्रकल्प सुरू झाल्याने जिल्ह्याची वीज निर्मिती क्षमता ९२ मेगावॅट वरून १०० मेगावॅट झाली होती. दिया या १० मेगावॅट सौर प्रकल्पामुळे सौर ऊर्जा निर्मिती क्षमता १० मेगावॅटने वाढून ११० झाली आहे. त्यामुळे दिया आणि बेनोडा या दोन सौर प्रकल्पामुळे दिवसा वीज मिळणाऱ्या शेतकऱ्यात ४ हजार २४७ ने वाढ झाली असून ३७ हजार ३५५ झाली आहे.दिया सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प प्रदीप अंधारे, कार्यकारी अभियंता, अचलपुर विभाग यांचे उपस्थितीत कार्यान्वित करण्यात आला. त्याप्रसंगी देवेंद्र चौधरी, उपकार्यकारी अभियंता, धारणी उपविभाग व पुरुषोत्तम प्रोफाईल कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.



# जैविक कचऱ्यातून इंधननिर्मिती

**आयआयटीच्या रुटॅग विभागाने हल्लीच जैविक कचऱ्यापासून काड्याचे इंधन बनविण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. काड्या इंधन म्हणून वापरता याव्यात म्हणून सुधारित गॅसिफायरची निर्मिती करण्यात आली. आणखी एक व्यवसाय उदयास आला. या गॅसिफायरचा उपयोग समाईक स्वयंपाकगृहासाठी जास्त उपयुक्त ठरतो.**




आपत्कालीन परिस्थितीमध्ये इंधन पुरवठा विस्कळीत होणे, व्यवस्थापन त्रुटी यामुळे विस्कळीत जनजीवन ही परिस्थिती निर्माण होते. सध्याच्या इराण-अमेरिका युद्धामुळे अशा त्रुटी सर्वांनाच जाणवत असतील. त्रुटी आणि पर्यायी व्यवस्था या दुव्यांमध्ये आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञान विकसित होते. नवीन शोध लागतात किंवा जुन्या वळचणींच्या परंपरांना नवीन ऊत येतो. त्यात नवीनीकरण करून वस्तू वापरात आणल्या जातात. अशावेळी पुरातन वस्तूंच्या पुनरुत्थापनाकडे महत्त्वाची वाटचाल होते. गॅस टंचाईमुळे चुली पुन्हा घरोघरी स्थापित होऊ लागल्या. स्थापत्यशास्त्रात पूर्वी चुलींना वगळून कोणत्याच घराची रचना दिसून येत नाही. आधुनिकीकरणानंतर समाधान चुली म्हणजे लांबलचक छतातून वर जाणाऱ्या धुराड्याच्या चुली आल्या, ज्या चुली आपले अस्तित्व घरोघरी धुरातून पसरवायच्या त्या लाजून धुराड्यातून धूर बाहेर लोटू लागल्या. अगदी घराच्या वरपर्यंत बाहेर! नंतर रॉकेलवर पेटणारे या उपकरणांना चालवण्यासाठी इंधनाची गरज असते. चुली लाकडाशिवाय, स्टोव्ह रॉकेल शिवाय, गॅस शेगड्या एल. पी. जी., सी.एन.जी., बायोगॅस शिवाय चालत नाहीत आणि इलेक्ट्रिक उपकरणे विजेवर चालतात. त्याशिवाय दुसरे पर्याय उपलब्ध नाहीत. पर्यायी इंधन हे त्या त्या वेळच्या गरजेनुसार आणि परिस्थितीनुसार प्रक्रियेने निर्माण केले गेले. त्यासाठी उपलब्ध गोष्टींचा आणि टाकाऊ आणि पुन्हा वापरात येण्यासारख्या वस्तूंचा विचार केला गेला. हे इंधन बनविण्यासाठी प्रयोग केले गेले. शास्त्रज्ञ विकसित तंत्रज्ञानावर लक्ष देत त्रुटींवर अभ्यास करू लागले. याचा परिणाम म्हणजे वेळेचे व्यवस्थापन आणि आधुनिकीकरणाला हातभार यावर झाला. धक्काधक्कीच्या जीवनात माणसांची विशेषतः स्त्रियांची काबाडकष्टांपासून सुटका होत गेली आणि त्याही आधुनिकीकरणातली स्थित्यंतरे सोबत घेऊन समाजात पुरुषांच्या बरोबरीने आर्थिकदृष्ट्या सक्षम बनून स्थिरावत आहेत. व्यवसायनिर्मिती ही घरापासूनच होते. छोट्या छोट्या गरजांतून करण्याचे व्यवस्थापन आणि व्यावसायिकीकरण हे एक महत्त्वाचे समीकरण घरापासूनच चालू होते.

कचऱ्याचा सर्वात मोठा हिस्सा व्यवसायाचा भाग बनलेला आहे गृहिणींच्या स्वयंपाक क्रियेतून. याचा एवढा मोठा साठा बनत असतो की, विल्हेवाट लावणे म्हणजे एक प्रक्रियेचा हिस्सा बनलेले आहे. हा सेंद्रिय कचरा प्रत्येक घरातून जाऊन महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाकडे व्यवस्थापनासाठी गोळा केला जातो. रोजचा कचरा फक्त साठवणे म्हणजे तेवढी जागा विस्तारित करणे निव्वळ निष्क्रिय बाब आहे. त्यातून शोध लावणे, मुळात विल्हेवाट लावणे गरजेचे झाले. शोध प्रक्रिया ही गरजेतून निर्माण झाली. या सेंद्रिय कचऱ्यामध्ये वेगवेगळे टाकाऊ घटक समाविष्ट असतात. स्वयंपाक घरातील, हॉटेलांतील ओला-सुका कचरा, खेडोपाडी जनावरांचे शेण, तसेच कागद, पालापाचोळा, शिवाय मेलेली जनावरे हा कचरा वेगवेगळ्या ऋतूंनुसार बदलणारा असतो. या कचऱ्यातून मिथेन तयार होते. या कचऱ्यापासून वीजनिर्मिती केली जाते आणि वाहतुकीच्या इंधन निर्मितीसाठी त्यावर वेगळी प्रक्रिया केली जाते. यामध्ये कोंबड्यांची विष्ठाही समाविष्ट असते. सेंद्रिय कचऱ्यापासून मिथेन आणि बायोगॅस सोबत बायोमास आणि बायोपेट्रोलचीही निर्मिती होते. सेंद्रिय कचऱ्यापासून पुढील काही प्रक्रियेत इंधने जी रोजच्या उपयोगात आणली जातात आणि त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो....

बायोगॅसनिर्मिती ही ओल्या सेंद्रिय कचऱ्यावर म्हणजे शेण आणि कुजलेले अन्न बारीक करून त्यात पाणी मिसळले जाते. एका बंद टाकीत ऑक्सिजनच्या अनुपस्थितीत सूक्ष्म जीवांद्वारे प्रक्रिया करून जो मिथेन वायू तयार होतो, तो स्वयंपाकासाठी आणि वीजनिर्मितीसाठी वापरला जातो. बायोमास पॅलेटस्ची निर्मिती- कृषी अवशेष भुसा आणि पालापाचोळा यांपासून हायड्रॉलिक मशिनद्वारे कडक इंधन कांडी (पॅलेटस्) बनतात, ज्याचा वापर बॉयलर किंवा भट्ट्यांमध्ये इंधन म्हणून होतो. बायो इथेनॉल डिझेल बनवण्यासाठी जैविक प्रक्रियेद्वारे सेंद्रिय पदार्थांचे रूपांतर द्रव इंधनात केले जाते. ते वाहनांसाठी वापरले जाते.या सर्व प्रक्रियांचा फायदा म्हणजे लँडफिल मधला कचरा कमी होण्यास मदत होते. पर्यावरणाला पूरक नूतनीकरण क्षमतेची ऊर्जानिर्मिती होण्यास मदत होते. यापासून तयार होणारा मिथेन म्हणजेच बायोगॅस स्वयंपाकासाठी अत्यंत स्वस्त किंवा मोफत गॅस म्हणता येईल. त्यातून शिल्लक राहणारा उर्वरित गाळ किंवा चिखल सेंद्रिय खत म्हणून शेतातील पिकांना उपयुक्त असतो. मानवी शरीरातील तीन सेंद्रिय कचरा म्हणजेच, युरिया, युरिक, आम्ल आणि क्रियेटिन यांचाही सेंद्रिय खतनिर्मितीमध्ये समावेश होतो.

कचरायुक्त इंधन म्हणजे रिफ्यूज-डिराईव्हड फ्यूएल- कचऱ्यापासून बनवलेले इंधन, जे घरगुती आणि व्यावसायिक या संमिश्र कचऱ्यापासून तयार केले जाते, ज्यामध्ये जैव विघटन तसेच प्लास्टिकचा समावेश असतो. जगातील बहुतेक प्लास्टिक कचरा ७९ टक्के इतका कचरा यार्डमध्ये आणि एकूण निसर्गाच्या कवेत पहुडलेला आहे. सुमारे १२ टक्के प्लास्टिक जाळून टाकण्यात आले, तर १० टक्क्यांपेक्षा कमी प्लास्टिक कचऱ्यातून पुनर्वापरात आणलेले आढळते. काच आणि इतर धातू जे ज्वलनशील नाहीत त्यांना वेगळे केले जाते. उर्वरित पदार्थ बारीक केले जातात, ज्यामुळे इंधननिर्मितीची प्रक्रिया बाधित होत नाही.

इंधनाचा सर्वात स्वच्छ प्रकार म्हणजे हायड्रोजन वायू. जे इंधन स्वच्छ मानले जाते, यामागचे कारण म्हणजे हे जळताना हवेत पाण्याची वाफ तयार होते. त्यामुळे ते प्रदूषणरहित इंधन आहे. ते संकुचित वायूच्या स्वरूपात किंवा द्रवस्वरूपात साठवले जाते.

२ जी इथेनॉल वाहतूक इंधनात वापरतात जे पेट्रोल आणि डिझेलऐवजी वापरता येते. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ते पेट्रोलमध्येदेखील मिसळतात.

ई २० पेट्रोल हे एक इंधन मिश्रण आहे, ज्यामध्ये ८०टक्के पेट्रोल आणि २० टक्के इथेनॉल असते. इथेनॉल मका किंवा ऊस यांसारख्या वनस्पती आधारित पदार्थांपासून मिळते. नंतर त्यावरआंबवण्याची प्रक्रिया होते.

अशा विविध प्रकारे इंधननिर्मिती विविध कारणांच्या दृष्टीने विचार करून केली जाते. कचऱ्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे पाणी त्याच बरोबर माती प्रदूषित होते. जागतिक तापमान वाढ शिवाय आर्थिक भार वाढतो. आंतरराष्ट्रीय सहकार्याने तांत्रिक प्रगतीमधील बाधा नाहीशी होऊन प्रगती वाढीस लागते. हल्ली सेंद्रिय खतनिर्मिती मोठ्या प्रमाणात चालू आहे. कारण, इंधन निर्मितीनंतर उरलेला कचरा व्यवस्थापित करण्यासाठी शेतीमध्ये तो खत म्हणून वापरला जातो. त्यामुळे तो पुन्हा मातीत मिसळतो नव्या उद्देशाने. या सेंद्रिय खतामध्ये शेणखत, गांडूळ खत, कंपोस्ट खत, निंबोळी पेंड, ताग आणि धेंचाची खते, कोंबडी खत, माशांचे खत, हाडांचा चुरा आणि गोमूत्र यांचा समावेश आहे.

हल्लीच जैविक कचऱ्यापासून आयआयटीच्या रुटॅग विभागाने काड्याचे इंधन बनविण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. काड्या इंधन म्हणून वापरता याव्यात म्हणून सुधारित गॅसिफायरची निर्मिती करण्यात आली. आणखी एक व्यवसाय उदयास आला. या गॅसिफायरचा उपयोग समाईक स्वयंपाकगृहासाठी जास्त उपयुक्त ठरतो. उदाहरणार्थ, वसतिगृहे जिथे स्वयंपाक मोठ्या प्रमाणात केला जातो, अन्न भोक्त्यांची दैनंदिन संख्या जास्त असते तिथे गॅसिफायर आपले स्वयंपाक उरकण्याचं कार्य इतर साधनांपेक्षा चोख बजावतो. या गॅसिफायरसाठी लाकूड खर्च आणि झाडतोडीला आळा घालण्यासाठी वनस्पती काड्या पालापाचोळा गोळा करून कांड्या बनवण्यात यश आले. अत्यंत कमी खर्चात म्हणजे निम्म्या खर्चात हे इंधन तयार होते. गॅसिफायरचा व्यवसाय गाव पातळीवर बचत गटांना सहायक ठरेल असा आहे. इंधन तयार करण्यासाठी सोबत नवनिर्मित उपकरणे आणि साधनेही तयार होत आहेत. हे पर्यायी यश म्हणायला हरकत नाही; पण त्यातूनही मोठा फायदा मिळवून देणारे आहे.

**शरयू माने**

# प्रकरण खरातचे; पण आरसा समाजाचा!!



नाशिकमधील तथाकथित भोंदू अशोक खरात प्रकरण सध्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. या प्रकरणातील सर्वात भयावह बाब म्हणजे अनेक महिलांवर झालेला छळ, फसवणूक आणि लैंगिक शोषण. त्यामुळेच या प्रकरणाला मोठे बातमीमूल्य प्राप्त झाले आहे. मात्र या प्रकरणाची समाजमाध्यमांवरील चर्चा पाहिली असता आपल्या समाजाच्या संवेदनशीलतेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित होतात.या प्रकरणात पीडित महिलांची मानसिक अवस्था काय असेल, त्यांच्या मनात किती भीती, अपराधगंड, असुरक्षितता आणि वेदना असतील यावर गंभीर चर्चा व्हायला हवी होती. परंतु प्रत्यक्षात तशी संवेदनशीलता दिसून येत नाही. उलट काही व्हिडिओ आणि फोटो अधिक स्पष्ट करून, कोणताही विचार न करता मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांवर व्हायरल केले जात आहेत. चेहेरे ओळखू येतील अशा पद्धतीने ते प्रसारित केले जात आहेत आणि त्यावर टवाळ, अश्लील व अत्यंत असंवेदनशील टिप्पण्या केल्या जात आहेत.

हे पाहताना मन सुन्न होते. कारण हा विषय मनोरंजनाचा नाही; हा अत्यंत गंभीर सामाजिक चिंतनाचा विषय आहे. मात्र समाजातील एका मोठ्या घटकाने त्याला केवळ चघळण्याचा विषय बनवलेले दिसते.समजा या प्रकरणातील एखादी स्त्री पीडित असेल; परंतु स्वतःची अब्रू आणि कुटुंबाचा सन्मान जपण्यासाठी तिने अजून पुढे येण्याचे धाडस केले नसेल. तिच्या मनात या क्षणी किती भयंकर वादळ सुरू असेल याची आपण कल्पना करू शकतो का?

कदाचित तिच्या कुटुंबीयांना एवढे तरी माहिती असेल की ती कधीतरी त्या व्यक्तीकडे गेली होती. त्यामुळे त्यांच्या मनातही संशयाची सावली असू शकते.तिलाही काही भयंकर अनुभवाला सामोरे जावे लागले असेल का? तिच्यावरही अत्याचार झाला असेल का? घरातील लोकांना कदाचित थेट विचारण्याची हिंमत होत नसेल; पण त्यांच्या मनातही प्रचंड गोंधळ आणि अस्वस्थता निर्माण झाली असेल.

अशा असंख्य प्रश्नांच्या ओझ्याखाली एखादी स्त्री किती भयानक मानसिक ताण सहन करत असेल याची आपण कल्पना तरी करतो का?क्षणभर आपण स्वतःला एक साधा प्रश्न विचारायला हवा – जर या महिलांपैकी एखादी आपली आई, बहीण किंवा मुलगी असती, तर आपण अशीच वागणूक दिली असती का? तिचे फोटो-व्हिडिओ समाजमाध्यमांवर टाकून त्यावर टिप्पणी करत बसलो असतो का? कदाचित नाही. मग इतर कोणाच्या आई-बहिणीबद्दल आपण इतके कठोर आणि असंवेदनशील कसे होतो?

या प्रकरणातील एक महत्त्वाची गोष्ट समाजाने समजून घेतली पाहिजे-या महिला दोषी नाहीत; त्या पीडित आहेत. त्या फसवलेल्या आहेत, दिशाभूल झालेल्या आहेत, काही वेळा ब्लॅकमेल केलेल्या आहेत आणि काही वेळा दहशतीखाली ठेवलेल्या आहेत. अशा तथाकथित बुवांकडून अनेकदा भावनिक, मानसिक आणि कधी कधी शारीरिक दबाव टाकून स्त्रियांना वश केले जाते. परंतु समाज त्यांच्या वेदना समजून घेण्याऐवजी त्यांच्या चारित्र्यावरच संशयाची सावली टाकतो.

ही मानसिकता बदलल्याशिवाय अशा घटना थांबणार नाहीत. कारण सत्य हे आहे की अशा घटनांमध्ये केवळ एखादा व्यक्ती दोषी नसतो; समाजाच्या मानसिकतेचाही त्यात काही अंश असतो. ज्या समाजात स्त्रियांना दोष देण्याची सवय आहे, जिथे त्यांच्या वेदनांपेक्षा त्यांच्या 'चुका' शोधल्या जातात, जिथे त्यांच्या सन्मानापेक्षा त्यांच्या बदनामीची भीती मोठी असते – त्या समाजात पीडित स्त्रिया पुढे येण्यास घाबरतात. आणि त्या भीतीतूनच अशा विकृत लोकांचे धाडस वाढते.

म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्याच्या रूपात पाहणे पुरेसे नाही. हा प्रसंग समाजाला स्वतःकडे पाहण्याची संधी देणारा आहे. आपल्या संवेदनशीलतेचा, आपल्या स्त्रीदृष्टीचा आणि आपल्या सामाजिक जबाबदारीचा हा एक आरसाच आहे.आज सर्वात मोठी गरज आहे ती संवेदनशीलतेची. पीडितांकडे कुतूहलाने नव्हे, तर करुणेने पाहण्याची. त्यांच्या वेदना समजून घेण्याची. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रीच्या सन्मानाला आपल्या समाजजीवनाचा केंद्रबिंदू मानण्याची.

कारण शेवटी प्रश्न फक्त एका प्रकरणाचा नाही; प्रश्न आहे आपण कसा समाज घडवतो आहोत याचा.

**प्रफुल्ल मंदा श्रीधर,**
जिल्हा कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती
मो. ९६६५१८५४२८

# नराधम अशोक खरात



महाराष्ट्राच्या इतिहासातील अशोक खरात या नालायक नराधमाने विकृतीची हदपार करून भयावह कृत्य केले आहे ज्याची कल्पना करणे कठीण आहे आणि ही आता महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स झाली आहे.त्यामुळे ही संपूर्ण चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून व्हायला पाहिजे.आज आपण मिडियाच्या माध्यमातून पहातो की नालायक अशोक खरात सोबत अनेक दिग्गज नेत्यांचे फोटो आहेत.याचाच अर्थ असा की,या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांचा अशोक खरात सोबत कुठेतरी काहीतरी अवश्य संबंध असायलाच पाहिजे.रुपाली चाकणकर ह्या महिला आयोगाच्या जबाबदार अध्यक्षा होत्या.महिला आयोगाचे पद महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अत्याचाराच्या दृष्टीकोनातून निराकरण करण्यासाठी निर्णय देणारे उच्च पद आहे जेणेकरून पिडित महिलांना योग्य न्याय मिळावा व समाजात सर्व काही सुरळीत रहावे.परंतु रूपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय देण्याचे सोडून अशोक खरात सारख्या भोंदू बाबाच्या नादी लागून व त्यांचे पाय धुवून अनेक महिलांचे वाटोळे केले.अशोक खरात याचे १०० हुन अधिक अश्लील व्हिडिओ सामोर आले आहेत.

विकृतीची सिमा ओलांडणारा खरात यांच्या जवळ करोडोंची संपत्ती आली कोठून याची चौकशी करण्यासाठी त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी आवश्यक आहे.खरात हा राज्यासह देशाचा मोठा गुन्हेगार आहे, महिलांचा गुन्हेगार आहे,पिडीतांचा गुन्हेगार आहेत, सर्वसामान्यांचा गुन्हेगार आहे आणि अनेकांची संपत्ती हडपण्याचे काम खरात यानी केले आहे. त्यामुळे त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे.

ज्या-ज्या महिलांवर अत्याचार झाले आहेत किंवा खरातनी ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न केले आहे अशा सर्वांनी पोलीस यंत्रणेला मदत करून या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला पाहिजे जेणेकरून असे घृणास्पद कृत्य भविष्यात कोणीही करू शकणार नाही.भोंदू खरातने नरबळी व पशुबळी दिल्याचेही सांगितले जाते. त्यामुळे खरात विकृत,नालायक आहेच सोबतच सर्वसामान्यांचा मोठा हत्यारा सुध्दा आहे. त्यामुळे त्याच्या सोबत असणाऱ्यांचा किंवा फोटोंमध्ये असणाऱ्यांची कसून चौकशी व्हायलाच पाहिजे. राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि अस्तित्वासाठी भोंदूबाबांना सुध्दा जवळ करतात.जोपर्यंत भोंदूबाबा प्रकरणात राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा चौकशी होत नाही तोपर्यंत समाजाला व सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळणार नाही. महाराष्ट्राला खरातच्या कलंकांपासून वाचविण्यासाठी अशोक खरातची फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून संपूर्ण उलघडे करावेत व लवकरात लवकर अशोक खरातच्या गळ्यात फाशीचा दोर पडावा सोबतच खरात सोबत संबंध ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९

# लैंगिक (संबंध) शिक्षणाचे 'देहभान'

## एक टक नाटक
### समीक्षण





महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सवात स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज अमरावती येथे 'देहभान' या दोन अंकी सामाजिक नाटकाचा प्रयोग २१ वे नाटक कामगार कल्याण केंद्र रामनगर वाशिम कडून सादर झाले.ज्येष्ठ नाटककार अभिराम भडळमकर लिखित 'देहभान' या नाटकाला राजन टोंगी व अनिकेत बेगडे यांनी दिग्दर्शन केले.

१९५० मध्ये जनसेवा संस्थेच्या आश्रमातील काल्पनिक घटनेची वास्तववादी कथेची नाट्यमय कृती करण्याचा प्रयत्न, महाविद्यालयातील शताब्दीमहोत्सवाचे निमित्ताने कॉलेज स्टूडेंट करवी करावे असा प्रस्ताव साधना प्राचार्य दमयंती मॅडम कडे ठेवते.यावेळी वारणानगरच्या शालीचे खास वाखाणणे व मॅडमचो शहारने.सोहनी सरांचा प्रवेश दार ठोठावताना वाड्याच्या दारासारखं वाटले पार्श्वध्वनीचा इफेक्ट. साधना नाटकाचे सादरीकरण करण्यासाठी देहभान नावाची संहिता वाचायला देते.त्यातून नाटकाचे सादरीकरण तालीम करणारी शिल्पा, किरण,मनोज, साधना व सोहनी सर अशा चारित्र्याची निवड. नाटकाची संहिता वाचन करण्यासाठी प्रत्येकाने विचार विनिमय करून भूमिका निवडावे अशी साधना सूचना दिग्दर्शक म्हणून करते.

नाटकाचा विषय १९५० मध्ये शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री पुरुष संबंधाचे दर्शन घडवणारे असते. जनार्दन गुरुजींच्या आश्रमात (जनसेवा संस्थेत) वसुधा ही जयप्रकाश नारायण यांच्या भाषणाने प्रभावित होऊन आजन्म अविवाहित राहून जनसेवेला वाहून जाण्याची प्रतिज्ञा करते.संस्थेचे पदाधिकारी दादासाहेब व आप्पासाहेब वसुधा हिच्या संकल्पाचा सन्मान करून ती या संस्थेच्या संचालक मंडळात अग्रणी.विद्या गोपाळ व मावशी संस्थेत कार्यस्थ.पोस्टमास्टर पोस्टातील पत्र वाचून पती पत्नीचे खाजगीतले बोलणे किंवा भाव प्रगट करणे ह्यावर वसुधाकडे मावशी तक्रार करते.संस्थेत विषय निघतो.दादासाहेब आप्पासाहेब या कृत्यासोबतच शाळेतील मास्टर दहावीच्या मुलीना आरोग्य शिक्षणातून शारीरिक शिक्षण देत असल्याचा आक्षेप आणि मास्तरचा राजीनामा घ्यावा अशी फिर्याद.वसुधा मास्तर येताच त्याला घटीत प्रसंग विचारून विरोध दर्शविते.पोस्ट मास्टर समजून त्याला खडसावते. मात्र ते संस्थेतील शिक्षक असल्याचे लक्षात आल्यावर यांच्या शैक्षणिक दृष्टीचे समर्थन करून आगामी शिक्षणासाठी त्यांच्या विचाराची दखल घेतल्या जाईल अशी मनोभावना वसुधा बाळगत मास्तरांच्या जवळ येते.प्रेमाची झलक प्रसंगातून दाखवत नाटकाचा गाभा स्त्री पुरुषाचे एकत्र असण्याने होणारे देहाकर्षणचे देहभान पद्मनाभ व दमयंती यांच्या प्रसंगातून दर्शवते.

पद्मनाभ चित्रकार व दमयंती त्याची चाहती वारणा नगर येथे भेटीस जाण्याचे व शाल व स्पेशल कॉफी चे रहस्य येथे उलगडते. शिल्पा व किरण तालीम दरम्यानचा संवाद अमेरिकेतील मुलगा लग्नाला मागणी पण संपत्तीपेक्षा समजुतिला शिल्पाचे प्राधान्य, कथेतील गोपाळ देहाचं पतन होऊ नये या आश्रमी शिकवणुकीतून विद्या (पोस्टमन) हरण! व रेड लाईन मध्ये किरणला मन्याने घेऊन गेल्यावर बारा वर्षाच्या बालेवर मन खिन्न, घाबरलेला किरण.मावशीचे वसुधा वरील प्रेम व दादा साहेब यांचा आश्रमातील वावर ती एकेरी भाषेत सांगताना 'संबंध' यावर लक्ष केंद्रित.

मास्तर व वसुधा यांनी लैंगिक शिक्षणाची गरज समाजापुढे मांडताना त्यांना झालेल्या विरोधात वसुधाची कसोटी व दमयंती कुलगुरू पदावर निवड झाल्यावर करिअरच्या आडून केलेल्या अप्रत्यक्ष व्यभिचाराची जाणीव देहभान ठेऊन लैंगिक संबंध सावरणारी कथा शेवटी महाविद्यालयात सादर करण्याची परवानगी. त्या तयारीत सादरीकरणाचा दिवस मास्तर 'देहभान' सादर करतो. उत्तम स्वरूपाची संहिता कलावंत आपल्या देहबोलीतून सादर करताना मावशी-दमयंती शिल्पा बेगडे, शिल्पा -विद्या शांभवी पांडे, वसुधा - साधना प्रिया काकूडकर,पद्मनाभ- मास्तर ज्ञानेश्वर गटकर,किरण-गोपाळ अनिकेत बेगडे, आबासाहेब - मनोज श्रेयस गुल्हाने,दादासाहेब - प्रा.सोहनी राजन टोंगो.

शिल्पा हुबेहुब चंचल,साधना तटस्थ, मावशी तत्कालीन व दमयंती एकत्र च राहिल्याने बेरिंग साधले नाही.मनोज टपोरी पेक्षा वेंधळ, किरण सालस हवा तेवढा झाला नाही. दादा साहेब भरीव पण प्राध्यापक अकड प्राचार्य स्पर्धेनुसार दिसली नाही.एकंदर नाटकाचे कथानक सामाजिक वास्तवातील गांधी विचारतील संस्थेचे नैतिक शिक्षणावरील प्रयोगातील विषय.दोन काळात दाखवताना करडा रंग वापरणे राहून गेले.कारण भूमिका द्विभाविक होत्या.त्यामुळे करडेपनाचे आयुष्य संस्थेच्या व महाविद्यालयाचे नेपथ्यातून प्रकाश योजनेमार्फत दाखवता आले असते.संगीत साजेशी होती.प्रॉपर्टी योग्य पण कंदील लावला नाही,प्राचार्य केबिनमध्ये वकीलचे ग्रंथ,खांबावर रंग चिकटले नव्हते,कॉफीचे कप व मग कायम. अभिनय, संवाद, चेहरे दमयंती व मावशीचे ठिकाणी वय साधण्यात (नगण्य)समतोल, अशा विषयान्वये गतिमान नाटकाचं संगीत सुव्यवस्थित.रंग व वेशभूषांचे दुहेरी भूमिकेतील तंतोतंत साकारणे एकदम खास. अशा थाटात एकटक नाटक बघताना दर्शकांना नक्कीच आवडले. अशीच नाटक २९ मार्च पर्यंत बघायला विसरू नका असे आवाहन कामगार कल्याण मंडळ तर्फे केल्या गेले.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# कंत्राटदारांची मनमानी की राजकीय छत्रछाया ?

## मंजुरीशिवाय बोर्डीत रस्ता खोदकाम ; ग्रामस्थ संतप्त, चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील मौजे बोर्डी येथे रस्ता बांधकामाच्या नावाखाली गंभीर अनियमितता उघडकीस आली असून कंत्राटदारांच्या मनमानीमुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. वॉर्ड क्रमांक २ मधील हनुमान मंदिरासमोरील मुख्य रस्ता कोणतीही अधिकृत मंजुरी अथवा वर्क ऑर्डर नसताना जेसीबीद्वारे खोदून ठेवण्यात आल्याने नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे.

स्थानिक आमदारांच्या निधीतून सुमारे दहा लाख रुपयांचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता मंजूर झाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात मंजुरी कोणत्या रस्त्यासाठी आहे, नकाशा काय आहे आणि कामाचा अधिकृत आदेश कुठे आहे, याबाबत संपूर्ण अंधार असल्याचे चित्र आहे. परिणामी, खोदण्यात आलेला रस्ता आणि मंजुरी प्रक्रियेत असलेला रस्ता यामध्ये स्पष्ट तफावत असल्याचे समोर आले आहे.

गावातील धार्मिक आणि सामाजिक जीवनावरही या प्रकाराचा परिणाम झाला आहे. हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य मार्ग उखडून ठेवण्यात आल्याने तेरवी, अकरावे, लग्न समारंभ यांसारख्या कार्यक्रमांसाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या लग्नसराई सुरू



असताना वरात काढण्यासाठीचा हा प्रमुख मार्गच खोदून ठेवल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. शाळकरी मुलांनाही रोज धोकादायक मार्गाने ये-जा करावी लागत आहे.

दरम्यान, बांधकाम विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार मूळ मंजूर रस्ता अनिल ताडे यांच्या घरापासून राम भालतिलक यांच्या घरापर्यंत होता. जागेअभावी तो बदलून अरुण आतकड ते रवी जयस्वाल, आठवडी बाजारपर्यंत असा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात खोदण्यात आलेला रस्ता वेगळाच असल्याने या संपूर्ण प्रकरणात गंभीर विसंगती उघड झाली आहे.

या पार्श्वभूमीवर 'कोणत्या अधिकारावर रस्ता खोदला?', 'वर्क ऑर्डर नसताना काम कसे सुरू झाले?' असे प्रश्न उपस्थित करत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर संगनमताचा आरोप केला आहे.

### संतप्त ग्रामस्थांची आक्रमक प्रतिक्रिया

अकोट मतदारसंघात कंत्राटदारांची दादागिरी आणि हुकूमशाहीच चालली आहे का? कोणाच्या भरोशावर ही मनमानी सुरू आहे? मंजुरी नाही, वर्क ऑर्डर नाही, तरीही रस्ता खोदण्याची हिंमत कशी झाली? गावकऱ्यांच्या जीवाशी खेळ करून आमदार निधीचा पैसा गिळंकृत करण्याचा हा प्रकार तर नाही ना ? अपघात झाला किंवा जीवितहानी झाली तर याला जबाबदार कोण राहणार ? यांसह अनेक प्रश्न उपस्थित करीत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

### बोर्डीत तणावपूर्ण स्थिती; आंदोलनाचा इशारा

सध्या बोर्डी गावात परिस्थिती तणावपूर्ण बनली असून ग्रामस्थ आक्रमक पवित्र्यात आले आहेत. हा रस्ता नेमका कोणी खोदला, जेसीबी कोणाची होती, मुरूम कोणी आणला, मजूर कोण होते, आणि मंजुरी नसताना खर्च कोठून करण्यात आला, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

हा रस्ता मंजूर नसताना व या रस्त्याची वर्क ऑर्डर नसताना कोणत्या कंत्राटदाराने काम सुरू केले याची आम्हालाही माहिती नाही. कंत्राटदाराने एवढी घाई का केली हे स्पष्ट नाही. सदर रस्त्यासाठी शासनाकडे मंजुरीसाठी नवीन प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

**मोनाली कडव,**
अभियंता, बांधकाम विभाग, अकोट

हा रस्ता कोणी खोदला, कोणत्या कंत्राटदाराने चुकीचा रस्ता उखडला, त्यांच्याकडे वर्क ऑर्डर आहे का, एवढ्या मनमानीने काम का केले, याची माहिती आम्हालाही नाही.

**अनंत मोहोकार,** सचिव, बोर्डी



## उन्हाच्या तडाख्यात 'माठ' ठरला गरीबांचा खरा फ्रिज!

### गुढधी परिसरात महिला कॉंग्रेसचा अभिनव उपक्रम

### घराघरात शीतल पाण्याची सोय

■ प्रतिनिधी | अकोला ■

एप्रिलपूर्वीच उन्हाने कहर सुरू केला असून तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढत आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी ग्रामीण महिला कॉंग्रेसने पुढाकार घेत गुढधी परिसरात 'माठ वाटप' हा थेट जनतेच्या गरजेचा आणि वास्तवाला भिडणारा उपक्रम राबवला. महागड्या फ्रिजच्या आवाक्याबाहेर असलेल्या कुटुंबांसाठी 'माठ'च खरा नैसर्गिक फ्रिज ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले



आहे.

उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना थंड पाण्याची सोय करणे कठीण झाले आहे. विजेचे वाढते दर आणि फ्रिजची महागाई यामुळे अनेक कुटुंबे अडचणीत सापडली आहेत. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण महिला कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पूजा काळे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

गुढधी परिसरात घरोघरी जाऊन गरजू कुटुंबांना माठाचे वाटप करण्यात आले. या माठांमुळे वीजेचा खर्च शून्य आणि पाणी मात्र थंड ; अशी दुहेरी सोय नागरिकांना मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे जोरदार स्वागत करत महिला कॉंग्रेसच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

दरम्यान, 'फक्त आश्वासनं नाही, तर थेट जनतेच्या गरजांवर उपाय देणे हाच आमचा उद्देश आहे,' असे स्पष्ट करत भविष्यातही अशाच लोकहिताच्या योजना राबविण्याचा निर्धार पूजा काळे यांनी व्यक्त केला. या उपक्रमाला युवा समाजसेवक विजय गावंडे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी सोनाली मोरे, जया देशमुख, प्रगती देशमुख, विजयाताई शिरसाट, सुषमा मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

एकूणच, राजकीय आश्वासनांच्या पलीकडे जाऊन थेट जनतेच्या घरापर्यंत पोहोचणारा हा उपक्रम ठरला असून, उन्हाच्या झळांमध्ये 'माठ'च गरीबांचा खरा आधार ठरत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## जय बजरंग परीवाराच्या वतीने प्रेरणा पुरस्काराचे वितरण

**अकोला :** ज्ञान, कला व क्रीडा ही ब्रीद घेऊन कसरती, कवायती, चित्रपट कलावंत, लेखक, दिग्दर्शक, विचारवंत तथा, कृषी, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रातील अष्टपैलू कामगीरी करणारे अजातशत्रु व्यक्तीमत्व लोकनेते स्व.प्रा. तुकारामभाऊ बिडकर यांचे जयंतीनिमित्त प्रेरणा पंधरवडा साजरा करण्यात आला होता, त्यानिमित्ताने जय बजरंग माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, कुंभारी येथे ज्ञान, कला व क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांचे हस्ते संपन्न झाला असुन, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला.

## पोटहिस्सा मोजणी प्रकल्पाला गती ; मूर्तिजापुर तालुका पथदर्शी योजनेत

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर; जमिनीच्या अचूक नोंदींसाठी मोठे पाऊल

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

केंद्र शासनाच्या 'विशेष सहाय्य योजना २०२४-२५' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या पोटहिस्सा मोजणी व नकाशे अद्यावतीकरणाच्या पथदर्शी प्रकल्पाला अखेर गती मिळाली असून, मूर्तिजापुर तालुक्याचा या महत्त्वाकांक्षी योजनेत समावेश करण्यात आला आहे. जमिनीच्या सध्याच्या धारकांनुसार अचूक मोजणी करून नोंदी अद्ययावत करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून तीन तालुके अशा एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली असून, त्यात मूर्तिजापुरचा समावेश झाल्याने तालुक्यासाठी ही मोठी संधी मानली जात आहे. निविदा प्रक्रियेद्वारे सहा खाजगी संस्थांची नियुक्ती करण्यात आली असून, ११ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

या प्रकल्पांतर्गत एकसमानता राखण्यासाठी मानक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. आधुनिक मोजणी तंत्रज्ञानाचा वापर करून कोर्स व जीएनएसएस रोव्हर्सच्या सहाय्याने जीआयएस आधारित मोजणी केली जाणार आहे. विविध सॉफ्टवेअरच्या मदतीने क्षेत्रफळाची अचूक परिगणना होणार असल्यामुळे जमीन मोजणीतील त्रुटींना आळा बसणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, हा पथदर्शी प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात कार्यान्वित होणार असून, नागरिकांनी सहकार्य करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मूर्तिजापुर तालुका भूमि अभिलेख उपअधीक्षक भास्कर सदार यांनी केले आहे.

## श्रीरामनवमीनिमित्त विशाल शोभायात्रा; पालकमंत्र्यांचा सहभाग



■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज श्रीरामनवमीनिमित्त शहरात आयोजित भव्य शोभायात्रेत सहभागी होऊन येथील मोठे श्रीराम मंदिर येथे प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घेतले व पूजन केले.

अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिर परिसरातून शोभायात्रेला सुरूवात झाली. आमदार रणधीर सावरकर, आमदार हरिश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. शोभायात्रेत विविध संघटनांतर्फे देखावे, ढोलताशा पथके, भजनी मंडळ यांच्यासह हजारो भाविक सहभागी झाले होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी शोभायात्रेत सहभागी होऊन मोठे राम मंदिरात दर्शन घेतले व पूजन केले. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने आसमंत निनादून गेले होते. विविध मंडळांतर्फे ठिकठिकाणी स्वागत, भाविकांसाठी पेयजल आदी व्यवस्था करण्यात आली होती. विविध संघटनांतर्फे वाहनांवर रामायणातील प्रसंगांवर देखावे प्रदर्शित केले.



## एआय आणि सायबर सुरक्षा यासारख्या विषयांवर करण्यात आली चर्चा

**अकोला :** महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे असे गौरवोद्गार भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे काढले. मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा नुकताच रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.महाराष्ट्राचे मुख्यंमत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र भवन वास्तूच्या विस्तारासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याबाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसच्या दोन दिवसीय दौऱ्यात उच्चस्तरीय मान्यवरांच्या भेटीगाठी घेत भारत-मॉरिशस संबंध अधिक दृढ केले.


### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३६९/२०२६ — प्रोसेस नं.३०५३/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती नंदा शिवराजसिंग ठाकूर २. राहुलकुमार शिवराजसिंग ठाकूर, ३. रितेशसिंग शिवराजसिंग ठाकूर सर्व रा. रणपिसे नगर, सिध्दिविनायक मंगल कार्यालय, रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिवराजसिंग मोहनसिंग ठाकूर
**पत्ता :-** रा. रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिवराजसिंग मोहनसिंग ठाकूर यांचे दि. १३/०३/२०१८ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१०९/२०२६ — प्रोसेस नं.३३७२/२०२६
चौ.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : ११/०३/२०२६

**अर्जदार :** १) सुनिता संतोष गाडगीळ २) रविंद्र देविदास महाजन ३) रेखा सुरेश गाडगीळ सर्व रा. गोधळीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. ४) खिलेश्वरी महेश देशमुख रा. ०१, गोंधळी पुरा, भवानी मंदिर जवळ, बोरगाव मंजू, अकोला, ता. जि. अकोला ५) निलेश देविदास महाजन रा. भवानीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १) दिनकर सिताराम महाजन २) देविदास दिनकर महाजन
**पत्ता :-** रा. भवानी पुरा, बोरगाव मंजू, अकोला ता. व जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क्र. १) दिनकर सिताराम महाजन यांचे दि. १४/१२/१९७५ रोजी व मयत क्र. २) देविदास दिनकर महाजन यांचे दि. १०/०६/२०१३ रोजी बोरगाव मंजू ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३६०/२०२६ — प्रोसेस नं.३७०५/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ — दिनांक : १७/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती जया किशोरकुमार शेतीजा २. सतीश किशोरकुमार शेतीजा ३. दीपक किशोरकुमार शेतीजा ४. पुजा किशोरकुमार शेतीजा सर्व रा. एस. एस. डी. धाम जवळ, संतानी गल्ली, सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला.
ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : किशोरकुमार करमचंद शेतीजा
**पत्ता :-** रा. संतानी गल्ली, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किशोरकुमार करमचंद शेतीजा यांचे दि. १४/०२/२०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६८/२०२६ — प्रोसेस नं.१७६८/२०२६
चौ.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : ०९/०२/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती नैना नवीनचंद्र डेडिया २. सेजल निकुंज सेठीया रा. परळी, ता. परळी, जि. बीड ३. अस्मिता नवीनचंद्र डेडिया अर्जदार क्र. १ व ३ रा. आनंद भवन, आळशी प्लॉट, जोगी भवनजवळ अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नवीनचंद्र विसन डेडिया
**पत्ता :-** रा. आनंद भवन, आळशी प्लॉट, जोगी भवनजवळ अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नवीनचंद्र विसन डेडिया यांचे दि. १४/०७/२०२२ रोजी राहते घरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३८३/२०२६ — प्रोसेस नं.३३८३/२०२६
चौ.ता. २४/०४/२०२६ — दिनांक : ११/०३/२०२६

**अर्जदार :** १. लिना प्रशांत सराफ २. श्रीकांत प्रशांत सराफ अर्जदार क. १ व २ तात्पुरता पत्ता - रा. फ्लॅट नं. १, गोरे अपार्टमेंट, आकाशवाणीच्या मागे, अमानखा प्लॉट, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला. कायमचा पत्ता-रा. हनुमंत अपार्टमेंट, २ रा माळा, जी.एम.डी मार्केट जवळ, राम नगर, अमानखा प्लॉटस, अकोला. ता. जि. अकोला. ३. कौस्तुभ प्रशांत सराफ रा. हनुमंत अपार्टमेंट, २ रा माळा, जी. एम.डी मार्केट जवळ, राम नगर, अमानखा प्लॉटस, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रशांत पुरूषोत्तम सराफ
**पत्ता :-** रा. हनुमंत अपार्टमेंट, २ रा माळा, जी.एम.डी मार्केट जवळ, राम नगर, अमानखा प्लॉटस, अकाला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रशांत पुरूषोत्तम सराफ यांचे दि. ०९/०१/२०२१ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१/२०२६ — प्रोसेस नं.११३७/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ — दिनांक : २७/०१/२०२६

**अर्जदार :** १. संतोष विश्वनाथ ठाकरे रा. सी-५-२०३, साकेत, सीएचएस लि. वीर सावरकर मार्ग, कालवा ब्रिज जवळ, माजीवाडा, ठाणे वेस्ट, मुंबई ४००६०१ २. सौ. प्रतिभा सतिष देशमुख उर्फ प्रतिभा विश्वनाथ ठाकरे रा. देशमुख आय हॉस्पिटल, खापर्डे शाळेजवळ, दौलत बिल्डिंग, खापर्डे गार्डन, अमरावती. ४४६०२ ३. दिलीप विश्वनाथ ठाकरे रा. पुष्प विश्व, डॉ. सपकाळ यांच्या दवाखान्यासमोर, सिव्हिल लाइन, अकोला. ४४४००१ ४. सौ. सुमती दिपक वाघमारे उर्फ सुमती विश्वनाथ ठाकरे रा. १,१९,७३४, अनंत आशा, बाबा नगर, नांदेड, महात्मा फुले शाळेसमोर, नांदेड, महाराष्ट्र ४३१६०२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विश्वनाथ अर्जुनजी ठाकरे २. श्रीमती पुष्पा विश्वनाथ ठाकरे
**पत्ता :-** रा. सी-५-२०३, साकेत, सीएचएस लि. वीर सावरकर मार्ग, कालवा ब्रिज जवळ, माजीवाडा, ठाणे वेस्ट, मुंबई ४००६०१

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विश्वनाथ अर्जुनजी ठाकरे यांचे दि. ०३/०८/२०१० रोजी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत श्रीमती पुष्पाताई विश्वनाथ ठाकरे यांचे दि. ०९/१०/२००९ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बाकडी नदीच्या पुनर्जीवनाला मुख्यमंत्र्यांकडून मंजूरी

## ९ कोटी ५९ लाख खर्चून होणार नदीचे पुनर्जीवन, नदीतून ८ लाख २३ हजार क्युबीक मीटर गाळ काढणार

**वर्धा/जनमाध्यम**

आर्वी तालुक्यातील बाकडी नदीच्या पुनर्जीवनाचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुर केला आहे. आ. सुमित वानखेडे यांच्या संकल्पनेतून आणि सातत्याच्या पाठपुराव्याने मंजुर झालेल्या या कामामुळे बाकडी नदीचे जवळजवळ १३ किलोमीटरचे काम होणार आहे. तर ९ गावातील शेतकऱ्यांना याचा लाभ होईल. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने काम होणार असून यामुळे तालुक्यातील जलसंधारण व शेती विकासाला मोठा हातभार लागणार आहे.

नदी व धरणांची पाणी धारण, वहन व सिंचन क्षमता वाढविण्यासाठी त्यातील गाळ काढणे व हा सुपिक गाळ शेतात पसरविण्यासाठी शेतकऱ्यांना विनामुल्य उपलब्ध करून देण्यासाठी जलसंधारण विभागाच्यावतीने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आर्वी तालुक्यातील बाकडी नदीच्या पुनर्जीवनासाठी गाळ काढणे तसेच नाला खोलीवकरण व रुंदीकरणाच्या कामास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. आ.सुमित वानखेडे यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला



**आ.सुमित वानखेडे यांच्या पाठपुराव्याला यश**

होता.तालुक्यातील महादपुर, हरिशवाडा, बेलोरा, जळगाव, देव्हाडा, शिरपुर, एकलारा, माटोडा व नांदपूर या गावांच्या दरम्यान बाकडी नदीतील गाव काढण्याचे काम होणार आहे. जवळजवळ ८ लाख २३ हजार २०३ क्युबीक मीटर इतका गाळ काढण्यात येणार आहे. त्यात महादपुर येथे ३९ हजार १८४ क्युबीक मीटर, हरिशवाडा ३२ हजार ४४० क्युबीक मीटर, बेलोरा ३७ हजार ८७५ क्युबीक मीटर, जळगाव १ लाख १७ हजार ४७ क्युबीक मीटर, देव्हाडा ६६ हजार ८७७ क्युबीक मीटर, शिरपुर २ लाख २१ हजार ५४४ क्युबीक मीटर, एकलारा १ लाख १९ हजार ८० क्युबीक मीटर, माटोडा ९४ हजार १०९ क्युबीक मीटर तर नांदपूर येथे ९५ हजार ४४ क्युबीक मीटर इतका गाळ काढण्यात येणार आहे.

हा सर्व सुपिक गाळ शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.तसेच चिस्तुर ते नांदपुर या गावांच्या दरम्यान नदीवर जवळजवळ १३ किलोमीटर क्षेत्रात खोलीकरण व रुंदीकरणाचे काम होणार आहे. या सर्व कामावर साधारणपणे ९ कोटी ५९ लक्ष रुपयांचा खर्च होणार आहे. त्यात राज्य शासनाचा वाटा ४ कोटी ९० लाख तर टाटा ट्रस्ट या संस्थेचा सामाजिक दायित्व अंतर्गत वाटा ४ कोटी ६९ लाख इतका आहे. कामाच्या या खर्चास देखील मंजूरी देण्यात आली आहे. नदी परिसरातील ९ गावातील शेतऱ्यांच्या १ हजार ९६१ क्षेक्टर क्षेत्रावर याचा लाभ होणार आहे.

या कामामुळे नदीची पाणी वहन क्षमता वाढणार असून पावसाळ्याच्या दिवसात निर्माण होणाऱ्या पुरस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित होणार आहे. परिसरातली शेतकऱ्यांना लाखो मेट्रीक टन गाळ वनिामुल्य उपलब्ध होणार असल्याने त्यांच्या उत्पादकतेत वाढ होण्यास मदत होईल. तसेच सिंचनासाठी देखील नदीच्या पाण्याचा वापर होणार आहे. राज्य शासन व टाटा ट्रस्टच्या संयुक्त खर्चातून प्रकल्प मार्गी लागणार आहे. तर पुणे येथील बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार आहे.

### नदी परिसरातील शेतकऱ्यांना फायदा होईल-आ.सुमित वानखेडे

बाकडी नदी आर्वी तालुक्यातील महत्वाची नदी आहे. गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने नदीची वहन आणि पाणी धारण क्षमता कमी झाली. त्यामुळे पावसाळ्यात पुराचा देखील धोका निर्माण होतो. नदी परिसरातील शेतकऱ्यांना नदीच्या पाण्याचा तसेच सुपिक गाळाचा उपयोग व्हावा यासाठी नदीच्या पुनर्जीवनाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी सातत्याने मी पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावास मान्यता दिल्याने नदी काठावरील ९ गावांच्या हजारो शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होणार आहे.

# राम मंदिरातील चांदीची छत्री चोरी; २४ तासांत अट्टल चोर गजाआड

## ठाणेदार राजेश जोशी व पथकाची झंझावाती कारवाई

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

गुढीपाडव्याच्या पवित्र दिवशीच श्रद्धेच्या स्थानी डल्ला मारत राम मंदिरातील चांदीची छत्री चोरणाऱ्या अट्टल चोरट्याला आष्टी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत गजाआड करून धाडसी कामगिरी बजावली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती, मात्र पोलिसांच्या तत्परतेमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

तालुक्यातील लहान आर्वी फाट्यावर असलेल्या राम मंदिरात ही घटना घडली. मंदिराचे पुजारी सुभाष विश्वनाथ देशमुख यांनी १८ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या निमित्ताने मूर्तीवरील कपडे बदलण्यासाठी ते शिवणकामासाठी नेले होते. मंदिर व्यवस्थित बंद करून ते गेले होते. मात्र रात्री साडेआठच्या सुमारास परत आल्यावर गजानन महाराजांच्या मूर्तीवरील सुमारे ७०० ग्रॅम वजनाची, अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किंमतीची चांदीची छत्री चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.घटनेची



तक्रार १९ मार्च रोजी आष्टी पोलीस ठाण्यात दाखल होताच ठाणेदार राजेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपपोलीस निरीक्षक निलेश भलावे व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. परिसर पिंजून काढत तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला.अखेर अवघ्या २४ तासांत अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील पांढरघाटी येथे लपून बसलेल्या गोपाल मोहन युवनाते (वय ४२) या अट्टल चोरट्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण चांदीची छत्री जप्त करण्यात आली आहे. आरोपीविरुद्ध अपराध क्रमांक १०४/२०२६ अंतर्गत संबंधित कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या झपाट्याने केलेल्या कारवाईमुळे आष्टी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी धार्मिक स्थळे व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आवाहन ठाणेदार जोशी यांनी नागरिकांना केले आहे.

### छतावरून पडून युवकाचा मृत्यू

**पुलगाव**-दुसऱ्या मजल्यावरून पडल्याने युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना भीमनगर भागात घडली. मोहम्मद मुशीर नासीर (वय २९) असे मृताचे नाव आहे. अपघात नेमका कसा घडला याबाबत स्पष्टता नसली तरी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### तलवारीच्या धाकात घरावर हल्ला; सहा जणांवर गुन्हा

**वर्धा**-किरकोळ पैशांच्या वादातून पुलगावातील रमाई नगर परिसरात सशस्त्र हल्ल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. एका व्यक्तीस मारहाण सुरू असताना त्याने शेजारील घरात आश्रय घेतला. यामुळे संतप्त झालेल्या हल्लेखोरांनी काठी व तलवारीच्या सहाय्याने घरावरच हल्ला चढवला. त्यांनी खिडक्यांच्या काचा फोडून बाहेर उभ्या असलेल्या दुचाकींची तोडफोड केली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. किरकोळ वादातून वाढत चाललेली हिंसक प्रवृत्ती चिंतेचा विषय ठरत आहे.

### जावयाचा सासूवर हल्ला; महिला जखमी

**आर्वी** - कौटुंबिक वादातून जावयाने सासूवर हल्ला केल्याची घटना धनोडी बहाद्दरपूर येथे घडली. जेवणाच्या कारणावरून संतापलेल्या जावयाने सासू शोभा कळसाईत यांच्यावर पावशीने हल्ला केला. या हल्ल्यात त्या जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेनंतर आर्वी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घरगुती वादातून वाढणाऱ्या हिंसाचाराच्या घटनांमुळे समाजात चिंता व्यक्त होत आहे.

### शेतातून कुटार व हरभरा चोरीला

**वर्धा** - धोत्रा रेल्वे शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्याला आर्थिक फटका देणारी चोरी केली. शेतातील कुटार व हरभऱ्याचा मातेरा अज्ञातांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शेतकरी राहुल देशमुख यांनी याबाबत सावंगी पोलिसांत तक्रार दाखल केली. घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या वेळी शेतमाल सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शेतीमाल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त होत आहे.

### पानटपरी फोडून सिगारेट व रोकड लंपास

**वर्धा** - शहरातील वंजारी चौक परिसरात अज्ञात चोरट्यांनी




पानठेल्यावर डल्ला मारत सिगारेट व रोख रक्कम लंपास केली. हरिष आकरे यांच्या पानठेल्याचे कुलूप तोडून चोरट्यांनी विविध कंपनीच्या सिगारेटसह सुमारे १० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. विशेष म्हणजे पोलिस ठाण्याजवळच ही घटना घडल्याने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# हातात पदवी, पण निवडला व्यवसाय; ग्रामीण तरुणांचा स्वाभिमानी निर्णय

**सेलू जनमाध्यम**

नोकरीची काय शाश्वती? या प्रश्नाने आजच्या ग्रामीण तरुणांच्या मनात खोल घर केले आहे. शेतीच्या अनिश्चिततेने आणि वाढत्या बेरोजगारीने त्रस्त झालेल्या सेलू तालुक्यातील तरुणाईने आता परिस्थितीसमोर हात टेकण्याऐवजी स्वतःच्या कष्टावर उभे राहण्याचा निर्धार केला आहे.

कालपर्यंत नोकरीच्या आशेने शहरांची वाट धरणारी ही तरुणाई आज गावातच स्वतःचा व्यवसाय



**नोकरी नको, स्वतःचा धंदा हवा!'**

उभा करत आहे. पानटपरी, अंडाभूर्जी गाडे, आमलेट सेंटर, थंडपेय व भेल स्टॉल्स अशा छोटेखानी व्यवसायातून ते स्वाभिमानाने दोन पैसे कमावत आहेत. कमी भांडवल, पण मोठी जिद्द आणि मेहनत या जोरावर त्यांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग निवडला आहे.विशेष म्हणजे, या बदलत्या चित्रात महिलाही मागे नाहीत. गृहउद्योग, किरकोळ विक्री, तसेच छोटे व्यवसाय सुरू करून त्या कुटुंबाच्या आर्थिक घड्याळाला हातभार लावत आहेत.पूर्वी व्यवसाय सुरू करताना कागदपत्रांचा अडथळा मोठा होता. मात्र, आता ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेमुळे काही मिनिटांत व्यवसायाला कायदेशीर मान्यता मिळू लागली आहे. यामुळे बँक कर्ज, शासकीय योजना आणि अनुदानाचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले आहे.सेलूच्या या बदलत्या वास्तवात एक गोष्ट स्पष्ट दिसते

नोकरीच्या प्रतीक्षेत आयुष्य घालवण्यापेक्षा, स्वतःचा व्यवसाय करून स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग तरुणांनी स्वीकारला आहे. एका नवउद्योजक तरुणाचे शब्द या बदलाचे सार सांगून जातात गावातच अंडाभूर्जीचा गाडा सुरू केला.

आज दोन पैसे कमावतो, पण डोकं उंच ठेवून सेलूच्या मातीत आता केवळ पिकं नाही, तर स्वप्नंही उगवत आहेत, आणि ती स्वप्नं स्वतःच्या कष्टाने फुलत आहेत.

# वंचित लाडक्या बहिणींच्या अर्जांची पडताळणी करा

## पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची मागणी

**आर्वी/जनमाध्यम**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांच्या अर्जांची तातडीने पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा, अशी मागणी आर्वी नगरपरिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती भारती दिलीप पोटफोडे यांनी केली आहे.

२४ मार्च २०२५ रोजी त्यांनी जिल्हा महिला व बाल कल्याण विभाग, वर्धा येथे भेट देत प्रलंबित अर्जांचा प्रश्न उपस्थित केला. इंदिरा चौक येथील जनसंपर्क कार्यालयात



प्राप्त झालेले अर्ज त्यांनी संबंधित विभागाकडे सुपूर्द केले. या अर्जांची छाननी करून पात्र महिलांना योजनेचा लाभ देण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.परिविक्षा अधिकारी दडमल व भरणे यांच्याशी झालेल्या चर्चेत सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी २७ जानेवारी २०२५ रोजी सादर केलेल्या अर्जांवर प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.मात्र, अद्याप काही महिला लाभापासून वंचित राहिल्याने त्यामागील कारणे तात्काळ कळवावीत, अशी मागणी करण्यात आली. कारणे समजल्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून पात्र महिलांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे पोटफोडे यांनी स्पष्ट केले.महायुतीचे आ. सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने महिला व बाल कल्याण विभागाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

# नवोदय परीक्षेत प्रणय ठरला अव्वल

**आंजी (मोठी)/जनमाध्यम**

येथील सरस्वती विद्यामंदिरचा विद्यार्थी प्रणय जितेंद्र चिंचखेडे याने केंद्रीय नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ९७.५० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



प्रणयने अत्यंत परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले. नियमित अभ्यास, शिस्तबद्ध दिनचर्या आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्याने ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.त्याच्या यशामागे काळबांडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच आजी, आई-वडील यांचे आशीर्वाद आणि सततचे प्रोत्साहन याचाही मोठा वाटा आहे.प्रणयच्या या यशाबद्दल आंजी मोठी येथील माजी सरपंच दीपक बावणकर, जगदीश संचेरिया, डॉ. गाडेगोने, योगेंद्र देशमुख तसेच गावातील नागरिकांनी त्याचे अभिनंदन करून कौतुक केले आहे.प्रणयच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### रेती माफियांवर कारवाई

**वर्धा**-समुद्रपूर पोलिसांनी रामनगर परिसरात रेती चोरीविरोधात मोठी धडक कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकत विना रॉयल्टी रेतीची वाहतूक करणाऱ्यांना पकडले. या कारवाईत दोन ट्रॅक्टर, ट्रॉली व जेसीबी असा सुमारे ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेतीच्या अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असल्याने प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

### हिंगणीत गांजा जप्त

**सेलू**-हिंगणी येथे पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई करत गांजा जप्त केला. संशयितांच्या घराची झडती घेतली असता १ किलो ६० ग्रॅम गांजा व मोबाईल असा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी त्वरित कारवाई करत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे खळबळ उडाली.

# निकृष्ट कामाला लगाम लावा

## आर्वी-शिरपूर रस्त्यावरून खासदारांचा इशारा

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी ते शिरपूर या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या कामात होत असलेल्या निकृष्ट दर्जाबाबत आता जनतेचा संताप उफाळून आला असून, या प्रकरणी खासदार अमर काळे यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे धाव घेतली आहे. रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसारच व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे. सी.आर.एफ. निधीतून मंजूर झालेला आर्वी-शिरपूर मार्ग हा अमरावती-नागपूर या प्रमुख मार्गाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. नुकतेच या रस्त्याचे भूमिपूजनही पार पडले; मात्र काम सुरू होताच दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी कंत्राटदाराकडून होत असलेल्या कामावर नाराजी व्यक्त करत तक्रारी खासदारांकडे केल्या. जनतेच्या भावना ओळखून काळे यांनी तात्काळ हस्तक्षेप करत संबंधित यंत्रणेला धारेवर धरले. हा रस्ता केवळ प्रवासाचा मार्ग नाही, तर विकासाची जीवनरेषा आहे, असा ठाम संदेश देत त्यांनी गडकरी यांना पत्र लिहून कामाची गुणवत्ता सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली.दरम्यान, आपल्या तक्रारीची दखल घेतल्याबद्दल नागरिकांनी खा. काळे यांचे आभार मानले आहेत. आता केंद्राकडून कोणती ठोस कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पीडित महिलेचे अश्लील व्हिडिओ प्रसारित करू नका; अन्यथा कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

नाशिक येथील अशोक खरात या भोंदू बाबाविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्हे दाखल असून, या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर काहींकडून प्रसारित होत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत.

याबाबत विशेष तपास पथकाने नागरिक, सोशल मीडीया इन्फ्लुएन्सर, तसेच न्यूज चॅनल्स व ऑनलाइन पोर्टल्सना कडक इशारा देत आवाहन केले आहे. पीडित महिलेची ओळख उघड होईल अशी कोणतीही माहिती, फोटो, व्हिडिओ अथवा एआय जनरेटेड किंवा मॉर्फ केलेली सामग्री प्रसारित करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.सायबर विभाग, महाराष्ट्र पोलीस सोशल मीडियावरील प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून आहे. संबंधित व्हिडिओ किंवा माहिती कोणाकडे असल्यास ती तात्काळ हटवावी, अन्यथा संबंधित व्यक्तींसह ग्रुप ॲडमिनवरही गुन्हा दाखल करून अटक केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.दरम्यान, ही बाब अत्यंत संवेदनशील असून, नागरिकांनी जबाबदारीचे भान ठेवत कायद्याचे पालन करावे, असे आवाहन विशेष तपास पथक प्रमुखांकडून करण्यात आले आहे.

# सिमरण प्रजापतीचा ग्रामपंचायतीकडून गौरव

**आष्टी(शहीद)/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील लहान आर्वी गावाने एका मुलीच्या यशाने अभिमानाने उंच भरारी घेतली आहे. वडिलांचे छत्र हरवूनही खचून न जाता जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर सिमरण नंदकीशोर प्रजापती हिने पोलीस विभागात निवड मिळवत आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचा मान उंचावला आहे. तिच्या या यशामुळे गावात आनंद, अभिमान आणि प्रेरणेची लहर पसरली आहे.

या यशाचा गौरव करण्यासाठी लहान आर्वी ग्रामपंचायतीचे सरपंच सुनिल साबळे यांनी सर्व सदस्यांसह सिमरणच्या घरी जाऊन तिचा



**जिद्दीचा विजय**

सत्कार केला. फुलांचा वर्षाव, शुभेच्छांचा वर्षाव आणि टाळ्यांचा कडकडाट यामध्ये सिमरणचा सन्मान करण्यात आला.लहानपणापासून पोलीस दलात जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सिमरणने अभ्यासाबरोबरच शारीरिक तयारीवर विशेष भर दिला. बांबल सर यांच्या अकॅडमीतून सुरुवात करून, पुढे वायबीआर अकॅडमीत जयकुमार वानखडे, रविंद्र साखरकर आणि जीवन कोरके यांच्या मार्गदर्शनाखाली तिने आपले ध्येय गाठले.सिमरण घरी परतताच कुटुंबीयांनी आनंदाश्रूंनी तिचे स्वागत केले. आई विजयालक्ष्मी प्रजापती यांच्या डोळ्यातील अभिमान आणि आनंद गावकऱ्यांच्या हृदयाला स्पर्शून गेला.

यावेळी सरपंच सुनिल साबळे यांनी सिमरणचे अभिनंदन करत तिच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या या यशामुळे गावातील तरुणाईमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अनेकांनी स्पर्धा परीक्षांसाठी झटण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.या कार्यक्रमाला ग्रामपंचायत अधिकारी अनुराधा धारपुरे, सदस्य सागर नागापुरे, कुसुम सरदार, ज्योती गायकी, सोनाली राऊत, भाग्यश्री निंभोरकर, रेश्मा माथने, डाकपाल प्रविण निंभोरकर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

नगरपालिकेची मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी

# अभय योजना अंतर्गत १ कोटी ८० लाख कर जमा

## -३१ मार्च पर्यंत मुदतवाढ

### जनतेला लाभ घेण्याचे नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्माचे आवाहन

**चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे नगरपरीषद नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांच्या प्रयत्नाने नगरपालिका क्षेत्रातील सर्वच मालमत्ता धारकांसाठी एक दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. 'अभय योजना २०२५-२६' अंतर्गत नगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीवर आकारण्यात येणाऱ्या दंडावर ५० टक्क्यांची सवलत जाहीर करून २० मार्च पर्यंत १ कोटी ८० लाख रूपयाची कर वसूली करत सदर योजनेला ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात



आली. या अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन पत्रकार परिषदेतून करण्यात आले आहे.

चांदूररेल्वे नगरपरिषद निवडणूकीच्या दरम्यान करण्यात आलेली वचनपूर्ती म्हणून नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करत मालमत्ता धारकांसाठी एक दिलासादायक योजनेचा लाभ स्थानिक मालमत्ताधारकांसाठी करून घेतला. या 'अभय योजना २०२५-२६' अंतर्गत नगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीवर आकारण्यात येणाऱ्या दंडावर ५० टक्क्यांची सवलत जाहीर करून २० मार्च पर्यंत १ कोटी ८० लाख रूपयाची कर वसूली करत सदर योजनेला मुदतवाढ मिळावी म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्र व्यवहार करत ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ मिळून घेतली असल्याची माहिती पत्रकार परिषदेतून देण्यात आली. शहरातील जनतेने या अभय योजनेचा व मुदतवाढीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या पत्रकार परिषदेला नगरसेवक हर्षल वाघ, सुमेद सरदार, अरिहंत गेडाम, अनिस सौदागर, डॉ निलेश विश्वकर्मा, राजू लांजेवार, राजिक शेख उपस्थित होते.

# महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलसाठी ७५ टक्के मतदान

## -२२०० पैकी १२०१ वकिलांनी पार पाडले कर्तव्य

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र अँड गोवा बार कौन्सिल व केंद्रशासित प्रदेश दादर व नगर हवेली, दमन दीवच्या २५ नवनिर्वाचित सदस्यांसाठी मंगळवार २४ मार्च रोजी जिल्हा न्यायालय परिसरात मतदान घेण्यात आले. मतदान प्रक्रियेला वकिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्हा बार असोसिएशनचे २२०० वकील सदस्यांमधून १२०१ वकिलांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. एकूण ७५ टक्के मतदान झाले आहे. निवडणुकीचा निकाल दोन महिन्यानंतर समोर येणार आहे. माहिती नुसार महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलमध्ये एकूण २५ सदस्य होते. यामध्ये १८ सामान्य श्रेणी पुरुष, ५ महिला





आणि २ नामित महिला सदस्यांचा सहभाग आहे. हे सदस्य संपूर्ण राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करतात. परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड ही या निर्वाचित सदस्यांमधून केली जाते. तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाचे एका प्रतिनिधीची निवड पण केली जाते. यंदा राज्यभरातून निवडणुकीसाठी १५५ उमेदवार रिंगणात आहे. जिल्ह्यातून एकही उमेदवार निवडणूक लढतींत नाही. परिषदेचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो. यामुळे निवडणुकीसाठी वकिलांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. निवडणुकीसाठी मंगळवारी न्यायालय परिसरात विशेष बुथ बनविण्यात आले होते. जेथे वकिलांनी मतदान केले. सर्व बॅलेट बॉक्स मुंबईमध्ये एकत्रित होणार आहे. यानंतर मतमोजणी प्रक्रिया सुरू होणार असून निकाल घोषित केले जाणार आहेत.

# दर्यापूर शहरात पेट्रोल-डिझेल पंपांवर रांगा

## - शेतकऱ्यांसमोर इंधन संकट

**खल्लार/प्रतिनिधीः-** जागतिक युद्धाचा परिणाम संपूर्ण भारतावर पडला असून दर्यापूर मध्ये सुद्धा पेट्रोल पंपावर डिझेल पेट्रोल मिळवण्यासाठी रांगा लागल्या असल्याचे दिसून आले. सध्या शेती मशागतीची लगबग मोठ्या प्रमाणात सुरू झाली असून लहान शेतकऱ्यांना व कास्तकारांना डिझेल मिळणे थोडे कठीण झाले आहे. शहरातील ठराविक पेट्रोल पंप बंद झाले असून ज्या ठिकाणी डिझेलची विक्री सुरू आहे. त्याच ठिकाणी गर्दी बघायला मिळाली. दर्यापूर शहरात सध्या पेट्रोल व डिझेल पंपांवर वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसत असून, डिझेलच्या कमतरतेमुळे नागरिकांसह शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. ऐन शेती मशागतीच्या हंगामातच इंधन



टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

माहितीनुसार मागील काही दिवसांपासून डिझेलचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने पंपांवर तुटवडा जाणवत आहे. परिणामी, शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व इतर शेती अवजारे चालवण्यासाठी आवश्यक डिझेल मिळणे कठीण झाले आहे. अनेक शेतकरी रिकाम्या हाताने परतत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शेतीची मशागत, पेरणीपूर्व तयारी यासाठी डिझेल अत्यावश्यक असल्याने ही टंचाई शेतकऱ्यांसाठी मोठे संकट ठरत आहे. एकीकडे नैसर्गिक अडचणी, तर दुसरीकडे इंधनाची कमतरता यामुळे शेतकरी चारही बाजूंनी अडचणीत सापडला आहे.दरम्यान, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून जोर धरत आहे. दरम्यान आणखी परिस्थिती चिंताजनक होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

# चोरीची दुचाकी विकायला निघालेला थेट पोलिसांच्या जाळ्यात!

**अमरावती/प्रतिनिधीः-** चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी निघालेल्या आरोपीला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. सुफीयान युसुफअली शाहा (वय २४, रा. साबनपुरा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

शहरात वाढत्या दुचाकी चोरींना लगाम घालण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशावरून गुन्हे शाखा ॲक्शन मोडमध्ये आली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत गाडगे नगर पोलीस ठाण्यातील एका चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना २५ मार्च रोजी मोठी माहिती पोलिसांच्या हाती लागली. एक इसम चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी बस डेपोकडून सुंदरलाल चौकाच्या दिशेने निघाल्याची खबर मिळताच गुन्हे शाखेने पोलीस मुख्यालय मैदानासमोर सापळा रचला. काही वेळातच संशयित तेथे येताच पोलिसांनी झडप घालत त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव मोहम्मद सुफीयान युसुफ अली शाहा (वय २४, रा. साबनपुरा) असे सांगितले. त्याच्याकडील एमएच २७ एक्यू ९०५२ क्रमांकाची दुचाकी चोरीची असल्याचे स्पष्ट झाले.

पुढील चौकशीत त्याने पंचवटी चौक येथील पी.डी.एम.सी. हॉस्पिटलसमोरून सुमारे २० दिवसांपूर्वी ही गाडी लंपास केल्याची कबुली दिली. पोलिसांनी २० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करत आरोपीला गाडगे नगर पोलिसांच्या ताब्यात दिले.

# सामाजिक उपक्रमांतून 'तेरवी'ला दिला मानवतावादी अर्थ

**तिवसा/प्रतिनिधी:-** तिवसा तालुक्यातील लीलादेवी माणिकराव माहोरे (वय ६२) यांचे मुंबई येथील रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने माहोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असला, तरी त्यांनी जपलेले विचार आणि संस्कार आज समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

लीलादेवी माहोरे या केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नव्हत्या, तर त्या बुद्ध–फुले–आंबेडकर विचारांच्या परिवर्तनवादी परंपरेतून घडलेल्या एक जागरूक, संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे आयुष्य हे संघर्ष, त्याग, करुणा आणि समाजसेवेच्या मूल्यांनी उजळलेले होते. त्यांच्या वर्तनातून आणि विचारांतून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश सतत प्रकट होत असे.

त्यांच्या निधनानंतर माहोरे कुटुंबाने पारंपरिक तेरवी विधी टाळून, समाजोपयोगी कार्यातूनच त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा स्तुत्य आणि परिवर्तनवादी निर्णय घेतला आहे. दुःखाच्या क्षणातही समाजासाठी काहीतरी देण्याची ही भावना त्यांच्या विचारांची खरी ओळख करून देते.

स्मृतिप्रीत्यर्थ विविध सामाजिक उपक्रमांची प्रभावी मालिका राबविण्यात येत आहे. यामध्ये भजन, देहदान संकल्प, रक्तदान, अनाथ मुलांच्या संस्थेत भोजनदान, वृद्धाश्रमात फळवाटप, बुद्ध विहारास वॉटर कूलर भेट, जखमी पशूंवर उपचार करणाऱ्या संस्थेला आर्थिक मदत अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. त्याचबरोबर आरोग्य तपासणी शिबिरे, हृदयरोग निदान शिबिर, रक्तगट व नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे तिवसा तालुक्यात एक नवा आदर्श निर्माण झाला असून, 'श्रद्धांजली म्हणजे केवळ विधी नव्हे, तर समाजासाठी केलेले कार्य' हा संदेश ठळकपणे समोर आला आहे. अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी या उपक्रमांचे मनापासून कौतुक करत, हा उपक्रम समाजाला दिशा देणारा असल्याचे मत व्यक्त केले आहे.



लीलादेवी माहोरे यांच्या जाण्याने एक ममत्वपूर्ण आई, कुटुंबवत्सल स्त्री आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व हरपले असले, तरी त्यांनी दिलेले संस्कार आणि विचारांचा वारसा त्यांच्या कुटुंबाच्या कार्यातून सतत जिवंत राहणार आहे. त्यांच्या स्मृतींना खऱ्या अर्थाने जिवंत ठेवणारा हा सामाजिक उपक्रमांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आज त्यांच्या आठवणींनी डोळे पाणावतात, पण त्याचवेळी त्यांच्या विचारांनी मनाला नवी दिशा मिळते. त्यांनी दाखवलेला मार्ग हा केवळ कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणेचा दीपस्तंभ आहे.

त्या प्रवीण उर्फ राज माहोरे यांच्या मातोश्री होत, तसेच माणिकराव माहोरे यांच्या सहचारिणी होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# महानगरपालिकेत जनगणना संदर्भात सविस्तर आढावा

## 'जनगणनेचे काम गांभीर्याने करा' - आयुक्त सौम्या शर्मा

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभरात लवकरच सुरू होणाऱ्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत आज जनगणना तयारीसंदर्भात सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत जनगणनेच्या सर्व टप्प्यांवरील तयारीचा व्यापक आढावा घेण्यात आला असून प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक नियोजन व उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक उपस्थित होत्या. यावेळी विविध विभागांचे अधिकारी व संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी जनगणनेचे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व अधोरेखित केले. यावर्षीची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने, मोबाईल ॲपच्या माध्यमातून पार पडणार असल्याने प्रशिक्षण घेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाची सखोल माहिती आत्मसात करण्याचे निर्देश त्यांनी दिले. डिजिटल प्रणालीमुळे काम अधिक वेगवान व अचूक होणार असले तरी त्यासाठी सजगता व तांत्रिक कौशल्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनगणना ही कायद्याच्या अधीन असलेली प्रक्रिया



असल्याने प्रत्येक नागरिकाने अचूक माहिती देणे बंधनकारक आहे. नागरिकांकडून माहिती संकलित करताना विश्वास निर्माण करणे, योग्य मार्गदर्शन करणे तसेच माहितीची गोपनीयता कायम राखणे याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

यावेळी यंदा जातनिहाय जनगणना होणार असल्याने संबंधित नोंदी अत्यंत काळजीपूर्वक व अचूकपणे घेण्याचे निर्देश देण्यात आले. सुमारे १६ वर्षानंतर होत असलेली ही जनगणना देशाच्या सामाजिक, आर्थिक व लोकसंख्यात्मक स्थितीचे अद्ययावत चित्र समोर आणणार असून भविष्यातील विकास आराखडे, पायाभूत सुविधा, कल्याणकारी योजना व विविध धोरणे निश्चित करण्यासाठी ही माहिती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या अनुषंगाने घरभेटींचे सविस्तर नियोजन करण्यात आले असून प्रत्येक भागासाठी स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष जनगणना प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.

# अचलपूरात अज्ञात वृद्धाचा संशयास्पद मृत्यू

## -देवळी चौक परिसरातील घटना

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शहरातील देवळी चौक परिसरात एका अज्ञात वृद्ध इसमाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अचलपूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २.३० वाजताच्या सुमारास देवळी चौक परिसरात एक वृद्ध इसम गंभीर अवस्थेत पडल्याची माहिती दूरध्वनीवरून पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संबंधित इसम अंदाजे ७० वर्षांचा असून तो बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. पोलिसांनी त्याला तत्काळ उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. दरम्यान, मृत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून नातेवाईकांचा शोध सुरू आहे.



मृतदेहावर कोणत्याही प्रकारच्या जखमा आढळून आल्या नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

मृत इसमाची उंची सुमारे ५ फूट असून रंग गोरा, बांधा मध्यम आहे. त्याची दाढी व केस पांढरे असून अंगात फिकट रंगाचा शर्ट व पँट परिधान केलेली होती.

ओळख पटेपर्यंत मृतदेह उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास अचलपूर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**नगर परिषद कार्यालय, मोर्शी, जि.अमरावती**
**ई-निविदा सुचना**

क्र.नपामो/जाक्र./बांध/१६८७/२०२६ — दिनांक २३.०३.२०२६

सर्वसाधारण माहितीकरीता प्रसिध्द करण्यात येते की, नगर परिषद, मोर्शी ने सन २०२६-२७ वर्षाकरीता वार्षिक निविदा आमंत्रित केलेल्या आहेत. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे पंजिबध्द कंत्राटदारांनी आपली निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

नगर परिषद वार्षिक एकुण कामे-३ — Tender Id No.2026 - DMA_1289714 - 1 to 3

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | - | २४.०३.२०२६ दुपारी ३.०० वाजेपासून |
| ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त (End) | - | ३०.०३.२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यत |
| ई निविदा उघडण्याचा दिनांक (Technical) | - | ०१.०४.२०२६ सकाळी १०.०० वाजता (शक्य झाल्यास) |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. | | |

सदर निविदा ह्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर पहावयास मिळेल. निविदा ह्या ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाच्याआहेत. सदर निविदेतील अनामत रकमेचा व निविदा प्रपत्राचा भरणा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. काही अडचणी उद्भवल्यास क्रमांक ०७२२८-२२२२४९ व mcmorshi@gmail.com यावर संपर्क करावा.

स्वाक्षरी/- (श्री.अमन गायकी) सभापती, बांधकाम समिती, न.प.मोर्शी
स्वाक्षरी/- (सौ.प्रतिक्षा गुल्हाने) अध्यक्षा नगर परिषद, मोर्शी
स्वाक्षरी/- (श्री.शिवदास मुसळे) मुख्याधिकारी नगर परिषद, मोर्शी

**पाहिजे**

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

**पाहिजे**

गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत. तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

माझी ग्राहक सौ. ज्योती रहुपाल नाखले या मौजा– राजापेठ, ता. व जि. अमरावती येथील मालमत्तेच्या मालक आहेत. सदर मालमत्ता अमरावती महानगरपालिका हद्दीत येत असून नाझूल शीट क्र. ५४ँ, नाझूल प्लॉट क्र. ४७ मधील असून एकूण क्षेत्रफळ ३२४.२० चौ. मी. आहे. त्या ठिकाणी 'शांती पॅलेस' नावाची बहुमजली इमारत बांधलेली असून दुसऱ्या मजल्यावरील ब्लॉक क्र. ४ हा २८९.०० चौ. फूट बांधकाम क्षेत्रफळाचा असून त्यास अविभाजित हिस्सा आहे.

सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत:
पूर्व: रस्ता,
पश्चिम: नाझूल मालमत्ता,
उत्तर: डॉ. माशंकर यांचे घर,
दक्षिण: श्री. साने यांचे घर,

सौ. ममता उमाशरण त्रिवेणी यांनी दिनांक २४/०७/२०१८ रोजी दस्त क्र. २९०४/२०१८ अन्वये, नोंदणी कार्यालय अमरावती येथे, दुसऱ्या मजल्यावरील ब्लॉक क्र. ४ (क्षेत्रफळ २८९.०० चौ. फूट) हा सौ. ज्योती रहुपाल नाखले यांच्या नावाने विक्रीखताद्वारे हस्तांतरित केला आहे.

माझ्या ग्राहकांचा दिनांक १७/०७/२००२ रोजीचा मूळ लिंक विक्रीखत (दस्त क्र. २४००/२००२) हरवलेला आहे. माझ्या ग्राहकांनी ऊप एँइण ङ्. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे. म्हणून सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा सदर मूळ लिंक विक्रीखत कोणास सापडल्यास, या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

सिव्हील सी-II क्र.६३५१/२०२६
दिनांक २५.०३.२०२६

**नोटीस**

**मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर**
**दिवाणी याचिका** क्र.४२/२०२३ (निकालीत)
मधील
किरकोळ दिवाणी अर्ज स्टॅ.क्र.१२३३७/२०२५ (पुनर्विचार करण्यासाठी)
मधील
दिवाणी अर्ज क्र.७८५/२०२५ (विलंब माफी साठी)

**वादी** — **हाजी सयद नियाज अली करामत आणि ईतर**
**-- विरुध्द --**
**प्रतिवादी** — **मोहम्मद आयुब मोहम्मद युसूफ,** रा.मौलापुरा, नागपुरी गेटजवळ, अमरावती आणि ईतर

प्रति,
**प्रतिवादी क्र.४** - ॲड.एस.एम.झेड.रहेमान, झिनत मंजिल, यंकय्यापुरा, कॅम्प अमरावती, ता.जि.अम.

वरील प्रतिवादी यांना सुचित करण्यात येते की, वादी हाजी सयद नियाज अली करामत आणि ईतर यांचा दिवाणी याचिका क्र.४२/२०२३ पुनर्विचार करण्यासाठी किरकोळ दिवाणी अर्ज स्टॅ.क्र.१२३३७/२०२५ (पुनर्विचार करण्यासाठी) मधील आणि दिवाणी अर्ज क्र.७८५/२०२५ (विलंब माफी साठी) हा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल केला आहे व तो या न्यायालयाने पंजीबध्द करुन प्रतिवादीस नोटीस जारी केली आहे.

उपरोक्त किरकोळ दिवाणी अर्ज स्टॅ.क्र.१२३३७/२०२५ मधील आणि दिवाणी अर्ज क्र.७८५/२०२५ ची पुढील सुनावणी ही नोटीस प्रकाशित केल्यापासून दि.०६.०४.२०२६ किंवा न्यायालयाच्या सवडीनुसार होईल.

यास्तव तुमच्या तर्फे तुम्ही स्वतः किंवा तुमच्या वकीलामार्फत किंवा तुम्ही नेमुन दिलेल्या प्रतिनिधीद्वारे वरील निर्दिष्ट याचिकेच्या सुनावणी दरम्यान या न्यायालयात उपस्थित न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करुन हे न्यायालय आपला निर्णय जारी करेल.

यास साक्ष **श्री.चंद्रशेखर,** मुख्य न्यायाधिश, मुंबई आज दिनांक १२.०३.२०२६

शिक्का

न्यायालयाच्या आदेशान्वये
स्वाक्षरी/-
**(श्री.देवदत्त परांजपे)**
सहायक प्रबंधक,
मुंबई उच्च न्यायालय,
नागपूर खंडपीठ, नागपूर

प्रो.नं.५५६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२०.०२.२०२६

वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./९१/२०२६ — दिनांक २७.०४.२०२६

**जाहीर नोटीस**

**अर्जदार** - १. मनकर्णा शंकरराव मुरकुटे
वय ६९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सांगळूद, ता.दर्यापूर, जि.अमरावती
--- **विरुध्द** ---
गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **शंकर सखाराम मुरुकुटे उर्फ मुरकुटे** हे दिनांक **२९.०७.२०१४** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

# घरकुल लाभार्थ्यांना हप्ते न मिळाल्यास पंचायत समितीवर 'धडक मोर्चा'

**तिवसा/वार्ताहर**

राज्यात एकीकडे सर्वांना हक्काचे घर देण्याच्या घोषणा राज्य सरकार करतात. मात्र, तिवसा तालुक्यातील ग्रामीण भागात मात्र घरकुल योजनेचा बोजवारा उडाला आहे. अनुसूचित जाती, जमाती, बंजारा, पारधी आणि भराडी समाजासाठी असलेल्या घरकुल योजनांचे उद्दिष्ट संपल्याचे कारण पुढे करून शेकडो लाभार्थ्यांना हक्काच्या घरापासून वंचित ठेवले जात आहे. या अन्यायाविरोधात आता तिवसा तालुक्यातील नागरिक आक्रमक झाले असून, येत्या १० दिवसांत प्रलंबित हप्ते न मिळाल्यास पंचायत समितीवर धडक मोर्चा काढण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी दिला आहे.

राज्य आवास योजनेअंतर्गत येणाऱ्या रमाई आवास योजना, छबरी आवास योजना, पारधी आवास योजना यासारख्या इतरही घरकुल योजना राज्य सरकारने बंद केल्या आहे. त्यामुळे तिवसा तालुक्यासह शिरजगाव मोझरी, शिवणगाव, शेंदोळा बुद्रुक, शेंदोळा खुर्द, धोत्रा, वऱ्हा, मार्डी यासह अनेक गावांमधील लाभार्थ्यांनी आपल्या घरांची बांधकामे प्रलंबित आहे.

घरकुल मंजुरीच्या प्रतिक्षेत अनेकांनी आपले जुनी घरे पाडून नवीन बांधकामाला सुरुवात केली आहे. मात्र, शासनाकडून घरकुलाचा पहिला हप्ता अद्याप मिळालेला नाही.



भर उन्हाळ्यात हप्त्यासाठी पंचायत समितीचे उंबरठे झिजवावे लागत असल्याने लाभार्थ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

येत्या ७ जूनपासून मृग नक्षत्रासह पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. जर पावसाळ्यापूर्वी घरांचे बांधकाम पूर्ण झाले नाही, तर ज्यांनी जुनी घरे पाडली आहेत, अशा कुटुंबांचे संसार उघड्यावर येण्याची भीती निर्माण झाली आहे.

प्रशासनाकडून 'लक्ष्यांक संपला' असे तांत्रिक कारण दिले जात असले तरी, सर्वसामान्य नागरिकांनी पावसाळ्यात राहायचे कुठे? असा संतप्त सवाल या निवेदनातून विचारण्यात आला आहे.

यावेळी स्वप्नील तुरकाने, पंकज वानखडे, मंगेश पाचघरे, विजय डोंगरे, दिपक वाडीभसमे, अनिल मेश्राम, अमोल वावरे, जयंत कावरे, गंगाधर भालेराव, वंचितचे पदाधिकारी सागर भवते यांच्यासह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

# पथदिवे दुरुस्तीच्या नावाखाली गायब; नागरिक अंधारात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरातील मुख्य सिमेंट काँक्रीटिकरण रस्त्यावर सुरू असलेल्या कामांदरम्यान रस्त्यावरील पथदिव्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय नागरिकांना भेडसावत आहे.

रस्त्याच्या दुभाजकाजवळ बसवलेले पथदिवे दुरुस्तीच्या नावाखाली संबंधित ठेकेदारांनी उचलून नेले असून ते शहरातील BMC कार्यालयात जमा केल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे. मात्र, दुरुस्ती करून पुन्हा बसवण्याचे काम झालेले नसल्याने संपूर्ण रस्ता अंधारातच राहतो आहे.

संध्याकाळनंतर या मार्गावरून मोठ्या वाहनांची ये-जा सुरू असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. प्रकाशव्यवस्था नसल्याने नागरिक, वाहनचालक आणि पादचारी यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. स्थानिक व्यापारी व रहिवाशांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या असूनही दुरुस्ती केलेले दिवे पुन्हा बसवण्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून अद्याप सुरू झालेले नाहीदरम्यान, रस्त्यावरील सौंदर्यीकरण व काँक्रीटिकरणाची कामे सुरू असून, गतिरोधक, पथदिवे नसल्यामुळे रात्री काम करणाऱ्या कामगारांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

प्रकाशव्यवस्था सुरळीत करण्याची मागणी नागरिकांनी प्रशासनाला केली आहे. संबंधित विभागाने पथदिव्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करून ते पुन्हा बसवावेत, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.संबंधित विभागाने पथदिव्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करून ते पुन्हा बसवावेत, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. स्थानिकांनी प्रशासनाला इशारा दिला असून, कामे तातडीने सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

ठप्प कामे, अपूर्ण नाली आणि प्रकाशव्यवस्था नसल्यामुळे नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कामे पूर्ण करावीत, अशी मागणी केली आहे. .

# दिव्यांगांना प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ देण्यात यावी

### *नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांची मागणी*

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

निराधार योजने अंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना २५ मार्चपूर्वी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य होते, परंतु प्रमाणपत्र मिळविण्याकरिता एक ते दोन महिन्याचा कालावधी लागतो त्यामुळे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करण्यासाठी २५ मार्च ची मुदत वाढवून देण्यात यावी अशी मागणी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. अपंग निराधार योजनेच्या लाभात वाढ करण्यात आली असून अनुदान थेट लाभ हस्तांतरण द्वारे देण्यात येणार आहे तेव्हा या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सर्व दिव्यांग प्रमाणपत्र अपडेट करणे अनिवार्य करण्यात आले आहे आणि ज्या लाभार्थ्यांना ऑनलाइन युडी आयडी नाही त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय येथून सदर प्रमाणपत्र अपडेट करून तहसील कार्यालयात २५ मार्चपर्यंत सादर करण्याचे शासनाचे निर्देश होते. मात्र सदरचे प्रमाणपत्र अपडेट करून मिळविण्याकरिता महिन्याचा कालावधी लागतो त्यामुळे सदर योजनेला मुदत वाढ देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आले. तहसीलदार यांना निवेदन देते वेळी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपाध्यक्ष जोस्तना धवसे, प्रकाश मारोटकर, सभापती वासुदेव लोखंडे, कांता लोमटे, मो रियाज मो साजिद, वाडेकर, मो हारुन, निलेश इखार इत्यादी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनी

**कुऱ्हा -** व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपूर द्वारा संचालित विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हा येथे सहशालेय उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शनीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. प्रदर्शनी मध्ये इयत्ता ५ वी ते ११ वी च्या एकूण ५४ विद्यार्थ्यांनी आपल्या वैज्ञानिक प्रतिकृतीचे सादरीकरण केले. या प्रसंगी श्री गुरुदेव विद्यामंदिर, गुरूदेवनगर येथील विज्ञान शिक्षक सुनिल साबळे तसेच सनराईज इंग्लिश स्कूल तिवसा येथील प्रगती शिखरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांचे मूल्यांकन करून मोलाचे सहकार्य केले. इयत्ता ५ वी ते ७ वी या गटामधून संभवि भगोले, देव्याणी शेंडे, उन्नति वैद्य यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. श्रावणी इंगोले, भूमिका ढोले यांना प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आले. तसेच इयत्ता ८वी ते ११ वी या गटामधून गौरी सहारकर व ईश्वरी चौकटे, यश लोहे, सानिध्या खैरकार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. अबोली पवार व श्रावणी पाखरे यांना प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आले. या प्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नलिनी कन्नाके यांनी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे विशेष कौतुक करून विद्यार्थ्यांना भावी यशासाठी शुभेच्छा दिल्या. प्रदर्शनीच्या यशस्वितेसाठी सहाय्यक शिक्षिका सुनिता सुने, नम्रता सोनारकर, माया देशमुख, शितल तेटु, राणी दासवत, श्वेता आमले, रेशम लांबाडे, अंजली नाहाटे तसेच प्रा. श्रीकांत जगताप, सहाय्यक शिक्षक विनोद शिंगाणे, जयंत पंडित, सुनील धांदे आदींनी परिश्रम घेतले.



### ए.आय.एस.एफ च्या वतीने शहीद दिवस साजरा

**कुऱ्हा -** शहीद दिनानिमित्त कुऱ्हा, ता.तिवसा येथे ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या वतीने शहीद भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांच्या अभिवादनाचा कार्यक्रम गावकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये अतिशय यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाला संबोधित करताना प्रा.ओम पाखरे यांनी शहीद भगतसिंह यांच्या जीवनावर प्रकाश टाकत आजच्या परिस्थितीमध्ये त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच युवानेते देवेंद्र बावणे यांनी क्रांतिकारी गीते सादर केली. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. सिद्धेश तिंतूरकर, ऋषिकेश निंबर्ते, अक्षय नारळे, वैभव बावणे, निखिल वाढोनकर इत्यादींच्या प्रयत्नांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.



### तबला वादन परीक्षेत देवांशु खोडे द्वितीय

**तिवसा -** आझाद चौक, तिवसा येथील देवांशू यशवंत खोडे याने तबला - मध्यमा प्रथम परीक्षेमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करून तालुक्यात नावलौकिक मिळवलेले आहे. गंधर्व निकेतन ब्रह्मपुरी द्वारा संचालित अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मिरज द्वारा आयोजित 'मध्यमा प्रथम' तबला या विषयावर स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये देवांशु याने अतिशय प्रशंसनीय तबलावादन करून द्वितीय येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. देवांशुला तबलावादनाचे धडे त्याचे गुरु महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तबलावादक निलेश इंगळे गुरुदेव नगर यांच्याकडून मिळाले. तो आपल्या यशाचे सर्वश्रेय गुरु निलेश इंगळे, वडील यशवंत खोडे, आई अर्चना खोडे आणि बहीण भक्ती खोडे यांना देत आहे.



### लता वानरे यांचा राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे सत्कार

**अमरावती -** बहुजन नायक माननिय कांशीरामजी यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे आनंद सेलिब्रेशन हॉल कठोरा नाका अमरावती येथे पार पडलेल्या कार्यक्रमांमध्ये शिक्षक लता शंकरराव वानरे पद्मणे यांचा शाल सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. लता वानरे पद्मणे या सामरा इंग्लिश हायस्कुल रवीनगर अमरावती शाळेच्या शिक्षिका असून त्यांना बी.द. चेंज. फाउंडेशन तर्फे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार १ फेब्रुवारी २०२६ ला शिर्डी येथे मिळाला असून दि.७ मार्च रोजी नागपूर येथे मिडिया ग्रुप तर्फे 'स्विफ्ट अन् लिफ्ट' राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. यावेळी पी.बी.वनस्कर, पांडुरंग गोंडेकर भास्कर भटकर, प्रकाश शेलापुरकर, उत्तम तायडे, योगेश पखाले, जगदेव रेवस्कर, नंदकिशोर खंडारे, अरुण शेगेकर, रंग गव्हाळे, विजय वानरे, देविदास दायदार, अशोक तायडे, नरसिंह परमार, सुखदेव नाथे, युवराज मालखेडे, क्रिष्णा गव्हाळे, डॉ रणजित पानझाडे, सागर काकडे, आदिंसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार

## मेळाव्यात ३८ उमेदवारांना संधी

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच. आर. देशमुख आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली नाही तर खचून जाऊ नका, उलट नव्या जिद्दीने पुन्हा सुरुवात करण्याचा संदेश दिला. डॉ. कोळी यांनी तरुणांना केवळ नोकरी मिळवणारे न होता, नोकरी देणारे (उद्योजक) बनण्याचे आवाहन केले. या मेळाव्यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ही कंपनी होती. प्रास्ताविक करताना डॉ. राजीव बोरकर यांनी सांगितले की, टीसीएस मध्ये काम करण्याचे अनेकांचे स्वप्न असते, जे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.



या मेळाव्यात २०० रिक्त पदांसाठी एकूण २८८ उमेदवारांनी सहभाग नोंदविला होता. निवड प्रक्रियेअंती ११२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर ३८ उमेदवारांना अंतिम निवडीचे पत्र देण्यात आले. सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आभार मानले.

# महाटीईटी २०२६ परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

### आजपासून ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २१ जून रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तसेच परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज व परीक्षा शुल्क २७ मार्च ते १६ एप्रिल या कालावधीत भरता येणार आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चौथे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व मंडळा च्या, सर्व माध्यमांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

इयत्ता पहिली ते पाचवीसाठी पेपर १, इयत्ता सहावी ते आठवीसाठी पेपर २ या पध्दतीने परीक्षा घेतली जाते. त्यानुसार दि. २१ जून रोजी सकाळी साडेदहा ते एक यावेळेत पेपर १ तर दुपारी २.३० ते पाच या वेळेत पेपर २ ची परीक्षा घेतली जाणार आहे. ऑनलाईन अर्ज भरणे, परीक्षा शुल्क व अन्य माहिती परीक्षा परिषदेच्या htttps://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रवेशपत्राची ऑनलाईन प्रिंट ९ जून ते २१ जून दरम्यान उपलब्ध करुन दिल्या जाईल. प्रशासकीय अडचणींमुळे वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थ्यांसाठी अद्ययावत माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल, याची परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे परीक्षा परिषदेव्दारे कळविण्यात आले आहे.

# अमरावती मुख्य पोस्ट ऑफिसच्या वेळेत वाढ

### रात्री ७.३० वाजेपर्यंत पोस्टाचे व्यवहार करता येणार!



**अमरावती/का.प्र.**

भारतीय डाक विभागाने अमरावतीकरांसाठी एक मोठा दिलासादायक निर्णय घेतला असून, श्याम चौक येथील प्रधान डाकघराच्या कामकाजाच्या वेळेत मोठी वाढ करण्यात आली आहे. २५ मार्च २०२६ पासून आता नागरिकांना रात्री ७.३० वाजेपर्यंत आपली आर्थिक कामे पूर्ण करता येतील. नोकरदार, व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांची कार्यालयीन वेळेतील अडचण ओळखून डाक सेवा संचालक डॉ.सुधीर जाखरे यांच्या मार्गदर्शनात ही 'नाईट पोस्ट' सुविधा सुरू करण्यात आली आहे.

या विस्तारित वेळेत बचत खात्यातील व्यवहार, नवीन खाते उघडणे आणि पोस्टाच्या सर्व बचत योजनांशी संबंधित कामे होतील.

आज प्रवर अधीक्षक गेडाम आणि सुजितकुमार लांडगे यांच्या उपस्थितीत या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. कामावरून घरी परतताना आपले आर्थिक व्यवहार पूर्ण करू इच्छिणाऱ्या सर्वसामान्यांसाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# हायवेवरील डिझेलसाठी लागल्या ट्रकांच्या रांगा

**तिवसा/वार्ताहर**

दोन दिवसांपूर्वी तिवसा तालुक्यातील अनेक पेट्रोलपंपवर पेट्रोलसाठी दुचाकीच्या रांगा लागल्या होत्या, पेट्रोलचा तुटवडा निर्माण झाल्याने दुचाकीधारकांची भटकंती निर्माण झाल्याची स्थिती होती तर आज तिवसा नजीकच्या हायवेवर डिझेलसाठी चक्क ट्रकच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले.

सध्या अमेरिका-इराण चे युद्ध सुरू आहे, ज्यामुळे भारतात अनेक समस्या निर्माण होत आहे. तेल संकट व गॅस संकट अधिक गंभीर वळणावर गेले असून यामुळे विविध चर्चेला उधाण आले आहे. सर्वत्र पेट्रोलपंपवर पेट्रोलसाठी दुचाकी च्या तर डिझेलसाठी मोठमोठ्या ट्रकच्या रांगा लागल्याचे चित्र समोर येत आहे. तिवसा तालुक्यातील ३ ते ४ पेट्रोलपंप संध्या पेट्रोल-डिझेलचा साठा संपल्याने बंदावस्थेत पडले आहे. तर दुसरीकडे घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत असल्याने ४५ दिवसाच्या बुकिंगवर सिलेंडर उपलब्ध होत असल्याने अनेक चहा टपरी, हॉटेल, मंगल कार्यालय यासह घरोघरी गॅस सिलेंडर ला घेऊन चिंता व्यक्त केल्या जात आहे.



अनेक पेट्रोलपंप बंदावस्थेत

अमरावती ते नागपूर हायवेने अनेक मोठमोठी वाहने ही ये-जा करीत असतात.

हायवेवर अनेक पेट्रोलपंप व डिझेलपंप आहे मात्र याच दरम्यान तिवसानजीक असलेल्या काही पंपावर डिझेल उपलब्ध नसल्याने एकाएकी आज गुरुकुंज मोझरी जवळील राष्ट्रसंत पेट्रोलियम येथे आज सकाळपासून पेट्रोलसाठी दुचाकी च्या व डिझेलसाठी ट्रक च्या देखील रांगा पाहायला मिळाल्या.

गरजेनुसार सर्वांना पेट्रोल-डिझेल उपलब्ध व्हावे, यासाठी स्वतः पेट्रोलपंप धारक उपस्थित राहून जातीने लक्ष देऊन परिस्थिती हाताळत असल्याचे दिसून येते आहे.

# क्यूआरटी जवानाची गोळी झाडून आत्महत्या

## कारण अस्पष्ट, शहर पोलिस आयुक्तालयातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलिस आयुक्तालयातील क्यूआरटी (क्विक रिस्पॉन्स टीम)चे जवान विजय दिलीपराव नागापुरे (वय ३२) यांनी गुरूवारी (दि.२६) स्वतःवर गोळी झाडून जीवन संपवले. यामुळे पोलिस दलात हळहळ व्यक्त होत आहे.

गोळीबाराचा आवाज होताच परिसरातील कर्मचाऱ्यांनी घटना स्थळाकडे धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. सर्वप्रथम पोलीस कर्मचारी आकाश दिलीप अंबरते यांच्या ही घटना लक्षात आली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर संपूर्ण यंत्रणा अलर्ट झाली.त्यांचा मृतदेह पुढील तपासासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

घटनेनंतर आयुक्तालय परिसरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकाराने सहकाऱ्यांना धक्का बसला. ड्युटी संपल्यानंतर इतर जवान शस्त्रे जमा करण्यासाठी गेले असताना विजय मात्र मागेच थांबला आणि काही वेळातच गोळीबाराचा आवाज आला. आत धाव घेतल्यावर☞(पान २ वर)





### ■ २०१४ मध्ये पोलीस खात्यात रुजू

विजय नागापुरे हे मूळचे मोर्शी तालुक्यातील धामणगाव काटपूर येथील रहिवासी होते. सध्या ते अमरावती शहरात कुटुंबासह राहत होते. ते २०१४ च्या बॅचमध्ये पोलीस खात्यात रुजू झाले होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय असून त्यांचा भाऊ शाम नागापुरे हे देखील शहर पोलीस दलात कार्यरत आहेत. दरम्यान, आत्महत्येमागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून पोलीस विभागाकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली आहे. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### ■ भावाला शेवटचा फोन

माहितीनुसार विजय नागापुरे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी आपले भाऊ श्याम नागापुरे यांना फोन करून सांगितले की ते पेट्रोल भरण्यासाठी आले आहे. पेट्रोल पंपावर भरपूर गर्दी आहे. त्यामुळे त्यांना थोडा उशीर होणार आहे. भावाला केलेला हा कॉल त्यांच्या आयुष्यातील शेवटचा कॉल होता. कर्तव्यावर असताना विजय नागापुरे यांनी इतका टोकाचा निर्णय नेमका का घेतला, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. परंतु शेअर बाजार



# कारची उभ्या ट्रकला मागून धडक,एकाचा मृत्यू

## मोझरी बायपासवर भीषण अपघात

**तिवसा/प्रतिनिधीः-** नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील मोझरी बायपास टर्निंगवर रात्री उभ्या असलेल्या ट्रकला स्विफ्ट डिझायर कारने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एका अनोळखी प्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दुसरा प्रवासी गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक एमएच ०५ बीजे १६९६) नागपूरकडून अमरावतीच्या दिशेने येत होती. कार चालक आणि मालक उमेश श्रीकृष्ण यादगिरे (वय ३५, पार्वती नगर, अकोली रोड, अमरावती) यांनी रवी नगर परिसरातून दोन प्रवासी गाडीत बसवले होते. २४ मार्चच्या मध्यरात्री सुमारे २:३० ते ३:०० वाजताच्या दरम्यान, चालकाला झोपेची डुलकी लागल्यामुळे त्याचे वाहन नियंत्रणाबाहेर गेले आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला कारने जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच ☞(पान २ वर)




### लोन देण्याच्या नावावर

# व्यापा-याची १४ लाखांनी फसवणुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** लोन देण्याच्या नावावर सक्कर साथ येथील सुप्रसिद्ध व्यापा-याला १४ लाखांने फसविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. व्यापारी सुधीर भंडारी यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहिती नुसार व्यापारी सुधीर भंडारी यांना एका फायनान्स कंपनीचा प्रतिनिधी म्हणून फोन करण्यात आला. भंडारी यांनी काही वर्षांपूर्वी आदित्य बिर्ला कंपनी मधून लोन घेतले होते. हे लोन त्यांनी पूर्ण भरले आहे. आरोपीने त्यांना आदित्य बिर्ला कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे सांगीतले आणि त्यांना ३० लाख रुपयाचे लोन मिळत आहे असे सांगितले. आरोपीने त्यांना नियमित कॉल करून व्हॉट्सअप वर त्यांचे कागदपत्र ही बोलवून घेतले. लोन ☞(पान २ वर)

# घरफोडीचे आरोपी ताब्यात चोरीची सोने जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नागपुरीगेट पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने घरफोडी प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेऊन चोरी केलेला मुदेमाल जप्त केला आहे. मो. जावेद शेख नईम (वय १९, अबुबकर कॉलनी) आणि आदील खान अकील खान (वय १८, अलीमनगर) अशी आरोपींची नावे आहेत.



फिर्यादी राहीश सबा शेख इमराण (वय २८, ताजनगर) यांनी २३ मार्च २०२६ रोजी नागपुरीगेट पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली होती. त्यानुसार, त्यांच्या घरातील अलमारीतून तीन सोने-पटया प्रत्येकी १.५ ग्रॅम वजनासह, किंमत ३१,५००; एक सोने-पेंडॉल, वजन २ ग्रॅम, किंमत १४,०००; दोन सोने-आवळे, एकूण वजन ☞(पान २ वर)

# राम नवमी निमित्य निघाली भव्य शोभायात्रा








### -राजकमल चौकात महाआरती

**अमरावती/प्रतिनिधीः-** विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने श्री रामनवमी निमित्य भव्य शोभायात्रा आज गुरुवार २६ मार्च रोजी सायंकाळी बालाजी प्लॉट येथील सिताराम बाबा मंदिराच्या प्रांगणातून काढण्यात आली. शोभयात्रा निघण्यापूर्वी श्रीराम पूजन आणि आरती मुख्य यजमान श्यामा व भगीरथ अहरवार, सरोज व केशव कुशवाह यांच्या हस्ते करण्यात आली. शोभायात्रेमध्ये विविध देखावे आकर्षणाचे केंद्र ठरले. जय श्रीरामच्या घोषाने नगरी दुमदुमली.



शोभयात्रा निघण्यापूर्वी जितेंद्रनाथ महाराज, स्वामी राजेश्वराचार्य, महंत मनमोहनदास, डॉ. संतोष नवलानी, सचिनदेव महाराज, श्यामसुंदर निचित, रामप्रिया माई, कवर राजेश साई, मोहन बाबा कारंजेकर यांनी भक्तांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. बालाजी प्लॉट येथून निघालेली ही शोभायात्रा राजापेठ, राजकमल चौक, श्याम चौक होत गांधी चौक मध्ये जय फोटो स्टुडिओ जवळ समापन झाले. ढोल पथक, डीजे , झांज पथक यांनी सर्वांचे लक्ष वेधले. जागोजागी शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. भक्तांमध्ये अपार उत्साह दिसला. नाचत वाजत भक्त शोभायात्रे☞(पान २ वर)



# 'जय श्रीराम! कब मिलेगा हिंदू किसान को दाम?'

## बच्चू कडूंच्या उपोषणाच्या पोस्टरची जोरदार चर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकरी व शेतमजुरांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली असून, यासंदर्भातील पोस्टर सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आले आहे.

'जय श्रीराम! कब मिलेगा हिंदू किसान को दाम?' या ठळक घोषवाक्यासह प्रसिद्ध करण्यात आलेल्या पोस्टरमध्ये एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाची घोषणा करण्यात आली आहे. हे उपोषण शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पोस्टरमध्ये शेतकऱ्यांच्या न्यायासाठी प्रतीकात्मक चित्रण करण्यात आले असून,






स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे फोटोही झळकत आहेत. या पोस्टरमुळे आंदोलनाबाबत उत्सुकता वाढली असून, सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. या उपोषणाबाबत स्पष्ट करण्यात आले आहे की, हे आंदोलन केवळ सरकारविरोधी नसून महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजुरांच्या ☞(पान २ वर)

# चंद्रशेखर पाठक यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** धारणी ग्रामीण पोलीस विभागात कार्यरत असलेले चंद्रशेखर मनोहरराव पाठक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांची अंतिमयात्रा अमरावती येथील अकोली स्थित त्यांच्या राहत्या घरून काढण्यात आली. यावेळी बराच मोठा जनसमुदाय उपस्थित होता. चंद्रशेखर पाठक यांना गुढीपाडव्याच्या दिवशी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यांना अमरावती स्थित एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालविली. त्यांच्या अकाली जाण्यामुळे पाठक परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



# श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोर्शीत अभूतपूर्व शोभायात्रा

**मोर्शी/प्रतिनिधीः-** विश्व हिंदू परिषद, बजरंग दल प्रखंड मोर्शी व श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या न भूतो न भविष्यती अशा अभूतपूर्व शोभायात्रा रॅलीने मोर्शीनगरी दुमदुमली.यावेळी मोर्शी शहरात साक्षात बजरंग बली प्रगटले व घोड्यावर स्वार झाशीच्या राणीने मोर्शीकरांचे लक्ष वेधून घेतले.

या रॅलीत ट्रॅक्टरवर सजवलेल्या झॉक्या,वारकरी संप्रदाय दिंड्या, हिंदकेसरी बँड पथक, ढोल ताशा पथक तसेच जयस्तंभ चौक येथील गंगा आरती,शिवाजी ☞(पान २ वर)








# मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम नवमी जन्मोत्सव

## आमदार सुलभा खोडकेंनी केली विश्वमांगल्याची प्रार्थना

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रभू श्रीरामांना ' मर्यादा पुरुषोत्तम ' असे संबोधले जाते, कारण त्यांच्या जीवनातील प्रत्येक नातेसंबंधात त्यांनी मर्यादा, शिस्त आणि आदर्श आचरण जपले. ते केवळ एक महान राजा नव्हते, तर एक आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श भाऊ, आदर्श मित्र आणि आदर्श शासक होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात कर्तव्यनिष्ठा, सत्यनिष्ठा, त्याग, धैर्य आणि करुणा यांचा सुंदर संगम दिसतो.



आधुनिक विज्ञान युगात माणसाकडे प्रचंड माहिती आणि तांत्रिक सामर्थ्य उपलब्ध असले, तरी योग्य मूल्यांची कमतरता अनेकदा जाणवते.आजच्या काळात व्यक्तीच्या हातात तंत्रज्ञान आहे. पण त्याच्या वापरासाठी आवश्यक असलेले नैतिक मार्गदर्शन अनेकदा कमी पडते. प्रभू श्रीरामांचे जीवन आपल्याला सांगते, की कोणत्याही युगात मानवी जीवनाची खरी उंची ही नैतिकता, संयम आणि कर्तव्यभावना यांवर अवलंबून असते, असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

गुरुवार दिनांक २६ मार्च २०२६ रोजी श्रीराम नवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यादरम्यान अमरावती ☞(पान २ वर)